CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


धाराशिव | गुरुवार, ३० एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ५३ | पाने १२ | किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com




## आज श्री नृसिंह जयंती



## विनम्र अभिवादन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आज जयंती

## विचारपुष्प



आपले तत्त्वज्ञान आत्मसाक्षात्कारावर आधारित आहे, अनुमानांवर नाही. आमचा मार्ग आत्मविकासाचा आहे. त्यामुळे परमसुख हे गंतव्य स्थान आहे. भौतिकवादी मार्ग हा आत्मसंकोचाचा आहे. त्यामुळे परमदु:ख हेच त्याचे गंतव्य स्थान आहे. कोणत्या मार्गाने पुढे जायचे याचा विचार आपण केला पाहिजे.

**- स्व. दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# दीदी दमदार, पण भाजपाचे सरकार

## ● कलचाचण्यांत बंगालमध्ये सत्तांतराचा अंदाज ● आसाम-पुडुचेरीतही रालोआ ● तामिळनाडूत द्रमुकची सत्ता कायम ● केरळात काँग्रेसच्या नेतृत्वातील यूडीएफ येणार



◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**
बंगालमधील दुसऱ्या टप्प्यातील मतदान पूर्णम होताच सायंकाळी विविध कलचाचण्यांचे निष्कर्ष समोर आले. यात संपूर्ण देशाचे लक्ष वेधलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस दमदार कामगिरी करेल, पण सरकार भाजपाचेच येईल, असा अंदाज कलचाचण्यांमध्ये वर्तवण्यात आला. आसाम आणि पुडुचेरीत रालोआची, तर तामिळनाडूत द्रमुकची सत्ता कायम राहील. केरळात काँग्रेसच्या नेतृत्वातील यूडीएफ सत्तेत येणार असल्याचा अंदाज आहे.

राज्यातील एकूण २९४ विधानसभा जागांपैकी १५०-१६० भाजपाला मिळतील, तर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल काँग्रेसला १३०-१४० जागा मिळतील, असा अंदाज चाणक्य स्ट्रॅटेजीजच्या कलचाचणीत काढण्यात आला. इतर पक्ष सहा ते १० जागा जिंकण्याचा अंदाज आहे.

बंगालमध्ये भाजपा १४६ ते १६१ जागा जिंकत आहे, तर तृणमूल १२५ ते १४० जागा जिंकेल, असा अंदाज मॅट्रिझने वर्तवला.

मॅट्रिझच्या अंदाजानुसार, पश्चिम बंगालमध्ये इतर पक्ष विधानसभेच्या ६ ते १० जागा जिंकतील. पोल डायरीने घेतलेल्या कलचाचणीनुसार, भाजपाला १४२ ते १७१ विधानसभा जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला. ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला ९९ ते १२७ जागा मिळतील, असे दाखवण्यात आले आहे. इतर राजकीय पक्षांना पाच ते नऊ विधानसभा जागांवर विजय मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. (वृत्तसंस्था)

**पश्चिम बंगाल** — एकूण जागा : २९४ | बहुमत : १४८

| संस्था | तृणमूल काँग्रेस | भाजपा | इतर |
|---|---|---|---|
| मॅट्रिझ | १२५-१४० | १४६-१६१ | ६-१० |
| चाणक्य स्ट्रेटीज | १३०-१४० | १५०-१६० | ०-५ |
| पीपल्स पल्स | १७७-१८७ | ९५-११० | १-४ |
| पोल डायरी | ९९-१२७ | १४२-१७१ | ५-९ |

**आसाम** — एकूण जागा : १२६ | बहुमत : ६४

| संस्था | भाजपा | काँग्रेस | इतर |
|---|---|---|---|
| इंडियाटुडे-एक्सिस | ८८-१०० | २४-३६ | ०-३ |
| मेट्रिझ | ८५-९५ | २५-३२ | ६-१२ |
| पीपल्स पल्स | ६८-७२ | २२-२६ | ३-५ |
| चाणक्य स्ट्रॅटेजीज | ८८-९८ | २२-३२ | ३-५ |

**केरळ** — एकूण जागा : १४० | बहुमत : ७१

| संस्था | एलडीएफ | यूडीएफ | इतर |
|---|---|---|---|
| व्होट व्हाईब | ५८-६८ | ७०-८० | ०-४ |
| ॲक्सिस माय इंडिया | ४९-६२ | ७८-९० | ०-३ |
| मॅट्रिझ | ६०-६५ | ७५-८५ | ३-५ |
| पीपल्स पल्स | ५५-६५ | ७०-८५ | ०-३ |

**तामिळनाडू** — एकूण जागा : २३४ | बहुमत : ११८

| संस्था | द्रमुक | अण्णाद्रमुक | टीव्हीके |
|---|---|---|---|
| पीपल्स प्लस | १२५-१४५ | ६५-८० | १८-२४ |
| मॅट्रिझ | १२२-१३२ | ८७-११० | १०-१८ |
| ॲक्सिस माय इंडिया | ९२-११० | २२-३२ | ९८-१२० |
| चाणक्य स्ट्रॅटेजीज | १४५-१६० | ५०-६५ | ०-० |

**पुडुचेरी** — एकूण जागा : ३० | बहुमत : १६

| संस्था | रालोआ | काँग्रेस | इतर |
|---|---|---|---|
| पीपल्स पल्स | १६-१९ | १०-१२ | १-२ |
| ॲक्सिस माय इंडिया | १६-२० | ६-८ | ३-७ |
| पोल ऑफ एक्झिट पोल्स | १७ | ९ | ३ |

## बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यात ९१ टक्के मतदान

### ४ मे रोजी मतमोजणी

◆ **कोलकाता, २९ एप्रिल**
पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, १४२ जागांसाठी बुधवारी ९१.७ टक्के इतके विक्रमी मतदान झाले. काही भागांत हिंसाचाराच्या घटनांमुळे तणाव निर्माण झाला, मात्र सुरक्षा दलांनी बळाचा वापर करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दोन टप्प्यात झालेल्या निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहे.

पूर्व बर्धमान जिल्ह्यात सुरुवातीच्या १० तासांत सर्वाधिक ९२.४६ टक्के, तर कोलकाता दक्षिण जिल्ह्यात सर्वात कमी ८६.११ टक्के मतदानाची नोंद झाली. काही भागांत किरकोळ चकमकी आणि तणावाच्या घटना समोर आल्या, मात्र इतर सर्व मतदारसंघांत मतदान शांततेत पार पडले. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भवानीपूर मतदारसंघात ८५.५१ टक्के मतदानाची नोंद झाली. या मतदारसंघात त्यांच्याविरोधात भाजपाचे शुभेंदू अधिकारी मैदानात आहेत. (वृत्तसंस्था)

**फाल्टा मतदारसंघात फेरमतदान**

**फाल्टा मतदारसंघात इव्हीएम मशीनवरील भाजपाच्या पर्यायासमोर टेप लावण्यात आल्याची तक्रार भाजपाने केली. तक्रारीची दखल घेत, पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज अग्रवाल यांनी तेथे फेरमतदान घेण्यात येणार असल्याचे सांगितले. भाजपाचे सहप्रभारी अमित मालवीय यांनी यासंदर्भात तक्रार केली होती. मात्र तृणमूल काँग्रेसने आरोप फेटाळला आहे. येथे भाजपाकडून दीपक कुमार, तर त्यांच्याविरोधात तृणमूलचे पन्ना लाल हलदर मैदानात आहे.** ■

## नास्तिकाला शबरीमला प्रवेशाचा अधिकार कसा सांगता येतो?

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**
उत्तर भारतातील एखादी नास्तिक व्यक्ती शबरीमला मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार कसा सांगू शकते, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी उपस्थित केला. मंदिरात प्रवेश करण्याच्या अधिकाराशी संबंधित मुद्यावर निर्णय घेताना, तो अधिकार एखाद्या भाविकाने मागितला आहे की नास्तिकाने, याची तपासणी करणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

केरळमधील शबरीमला मंदिरासह विविध धार्मिक स्थळी महिलांवर होणारा भेदभाव तसेच अनेक पंथांकडून आचरणात आणल्या जाणाऱ्या धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती आणि कक्षा यासंबंधीच्या याचिकांवर सुनावणी करताना नऊ न्यायमूर्तींचा समावेश असलेल्या घटनापीठाने हे निरीक्षण नोंदवले.

घटनापीठात सरन्यायाधीस सूर्य कांत, न्या. बी. व्ही. नागरत्ना, न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. अहसानुद्दीन अमानुल्ला, न्या. अरविंद कुमार, न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह, न्या. प्रसन्ना बी वराळे, न्या. आर. महादेवन आणि न्या. जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

## पेट्रोलमध्ये मिसळणार ८५ टक्के इथेनॉल

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**
रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक नवीन प्रस्ताव तयार केला आहे. त्यात पेट्रोलमध्ये मिसळल्या जाणाऱ्या इथेनॉलचे प्रमाण ८५ टक्क्यापर्यंत वाढविण्याचा उल्लेख आहे. वाढत्या पेट्रोलच्या किंमती आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलल्याची माहिती आहे.

केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये जास्त प्रमाणात इथेनॉल मिसळण्यासाठी नियम प्रस्तावित करणारा एक मसुदा जारी केला. त्यात ई-८५ इंधनाचा समावेश करण्याची तरतूद आहे, ज्यामध्ये पेट्रोलमध्ये ८५ टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिसळले जाईल. याव्यतिरिक्त, ई१०० चा देखील प्रस्ताव आहे, म्हणजेच वाहने केवळ इथेनॉलवर चालू शकतील. या बदलामुळे भारताच्या इंधन प्रणालीमध्ये मोठे परिवर्तन घडून येऊ शकते. सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळले जात आहे. (वृत्तसंस्था)

### आसाम

## भाजपाच कायम



आसाममध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआ सत्ता कायम राखण्याच्या स्थितीत आहे. भाजपाला ८८ ते १०० जागा मिळतील, असा अंदाज ॲक्सिस माय इंडियाने वर्तवला. काँग्रेसला २४ ते ३६ जागा मिळतील. राज्यात विधानसभेच्या १२६ जागा आहेत. जेव्हीसीने भाजपासाठी ८८ ते १०१ जागा आणि काँग्रेससाठी २३ ते ३३ जागांचा अंदाज वर्तवला. त्यांनी एआयडीडीएफला शून्य ते दोन जागा आणि इतरांना तीन जागा मिळतील असे म्हटले आहे. ■

### पुडुचेरी

## पुन्हा रंगासामी



पुडुचेरीत ऑल इंडिया एनआर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील रालोआचा विजय होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला. पीपल्स पल्सच्या कलचाचणीनुसार या केंद्रशासित प्रदेशातील ३० जागांपैकी १६ ते १९ जागा रालोआच्या पारड्यात जातील. काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांना १० ते १२ जागा मिळतील असे यात नमूद करण्यात आले आहे. पीपल्स पल्सच्या अंदाजानुसार विजय यांच्या तमिळगा वेट्री कळघमला (टीव्हीके) पुडुचेरीत खातेही उघडता येणार नाही. ■

### तामिळनाडू

## स्टॅलिन कायम राहणार



तामिळनाडूत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील द्रमुकची सत्ता कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. पीपल पल्सच्या कलचाचणीनुसार, द्रमुकला १२४ ते १४५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. रालोआचा पाठिंबा असलेल्या अण्णाद्रमुकला राज्यातील एकूण २३४ विधानसभा जागांपेकी ६५ ते ८० मिळण्याचा अंदाज आहे. अभिनेता विजयच्या टीव्हीकेला केवळ दोन ते सहा जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली. ■

### केरळ

## विजयन् यांची हॅट्ट्रिक हुकणार



केरळात काँग्रेसच्यान नेतृत्वातील संयुक्त लोकशाही लोकशाही आघाडी (यूडीएफ) एका दशकानंतर सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीकडून केरळची सत्ता आपल्या ताब्यात घेईल, असे भाकीत कलचाचणीत वर्तवण्यात आले. मुख्यमंत्री पी. विजयन् यांच्या नेतृत्वातील एलडीएफची ताकद कमी होण्याची शक्यता आहे, तर दुसरीकडे आक्रमक प्रचार करूनही रालोआला राज्यात लक्षणीय प्रभाव पाडण्यासाठी संघर्ष करावा लागण्याची शक्यता आहे. ■

## गंगा एक्सप्रेस-वे विकासाचे इंजिन : पंतप्रधान

**हरदोई** : उत्तर प्रदेशातील सर्वात लांब गंगा एक्सप्रेस-वे राज्याच्या विकासाचे इंजिन असून, यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. ५९४ किलोमीटर लांबीचा हा मार्ग मेरठला प्रयागराजशी जोडेल. यामुळे मेरठ ते प्रयागराज हे अंतर केवळ ६ तासांत पूर्ण होईल. ३७,३५० कोटी रुपयांच्या खर्चातून या मार्गाची निर्मिती झाल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी हरदोई येथून सर्वात लांब गंगा एक्सप्रेस-वेचे उद्घाटन केले. यावेळी जनसभेला संबोधित करताना ते म्हणाले, मला आनंद आहे की सरकारने या एक्सप्रेस-वेचे नाव माँ गंगाच्या नावावर ठेवले आहे. यात विकासाची दृष्टीही दिसते आणि वारशाचेही दर्शन होते.

## आयपीएल रोमांचक, ही केवळ सुरुवात

**मुंबई** - इंडियन प्रीमियर लीगने (आयपीएल) २०२६ आतापर्यंत अपेक्षांची पूर्तता केली आहे. जरी या स्पर्धेची सुरुवात अत्यंत रो ंचक झाली असली, तरी स्पर्धे चा दुसरा टप्पा आणखीच तीव‘ आणि चुरशीचा असण्याची शक्यता आहे, असे मत भारताचा माजी यष्टिरक्षक किरण मोरे याने व्यक्त केले. अनेक संघ विजयाच्या प्रबळ दावेदारांच्या शर्यतीत आहेत आणि अद्याप कोणताही एक संघ स्पष्ट विजेता म्हणून समोर आलेला नाही. ही एक चांगली व रोंचक सुरुवात आहे. या हंगाम ाचा पहिला टप्पा अपेक्षांपेक्षाही कितीतरी अधिक समाधानकारक ठरला आहे. आपण अनेकदा २०० हून अधिक धावांचे स्कोअर पाहिले आहेत, ज्यामुळे ही स्पर्धा अधिकच रोंचक बनली आहे.

## महा-क्रांती! ‘एआय धोरण २०२६’ जाहीर



◆ **मुंबई, २९ एप्रिल**
जागतिक तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत महाराष्ट्राने आज एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर करण्यासाठी राज्य सरकारने ‘महाराष्ट्र एआय धोरण-२०२६’ ला मंजुरी दिली. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे धोरण जाहीर करण्यात आले असून, याद्वारे महाराष्ट्र हे देशातील ‘नैतिक एआय विकासाचे केंद्र’ म्हणून उदयास येणार आहे.

हे धोरण मुख्यत्वे सात स्तंभांवर आधारित आहे. यात राज्यव्यापी पायाभूत सुविधांचा विकास करताना किमान दोन हजार जीपीयू (जीपीयू) संगणन क्षमता निर्माण केली जाईल, मराठी भाषा, प्रादेशिक बोली आणि आदिवासी भाषांचे स्वतंत्र डेटासेट्स तयार करून भाषिक वारसा जपण्याचा प्रयत्न या धोरणातून होणार आहे.

लघु उद्योगांना एआयच्या प्रवाहात आणण्यासाठी ५ हजार ‘एमएसएमइ’ना २० टक्के अनुदान दिले जाईल. राज्यात ‘एआय परिसंस्था’ बळकट करण्यासाठी ५०० कोटींचा निधी उभारला जाणार आहे. यात सरकार आणि उद्योगाचा समसमान वाटा असेल. महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना १.२५ कोटींपर्यंत विशेष आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना २० टक्क्यांपर्यंत भांडवली अनुदान, १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी आणि १० वर्षांपर्यंत वीज दरात सवलत दिली जाणार आहे. (तभा वृत्तसेवा)



दोन दिवसांच्या उत्तरप्रदेशच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काशी विश्वनाथ मंदिराला भेट देऊन बाबा विश्वनाथ यांचे दर्शन घेतले. तसेच भगवान शिवाचे वाद्य डमरू आणि शस्त्र त्रिशूळ हाती घेत मंदिराला प्रदक्षिणा घातली

## दानवेंवरून ‘मविआ’त बेबनाव

### काँग्रेसकडून उमेदवार देण्याची घोषणा

◆ **मुंबई २९ एप्रिल**
विधानपरिषदेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत ताणतणाव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने (उबाठा) माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची उमेदवारी एकतर्फी जाहीर केल्यामुळे नाराज झालेल्या काँग्रेसने स्वतंत्र उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या आगामी वाटचालीवर प्रश्न निर्माण झाला असून प्रदेश काँग्रेसच्या भूमिकेकडे दिल्ली हायकमांड काय निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे.

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या नऊपैकी एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला मिळणार आहे. मात्र या एका जागेवरून महाविकास आघाडीतच घमासान निर्माण झाले आहे. मित्र पक्षाच्या मागणीकडे दुर्लक्ष करून उद्धव ठाकरे यांनी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना उमेदवारी देण्याबाबत निर्णय घेतला.





यामुळे नाराज झालेल्या काँग्रेस पक्षाने स्वतंत्र उमेदवार देणार असल्याचा निर्णय जाहीर केला. यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवारच अडचणीत येणार असल्याचे स्पष्ट आहे. विधानसभेतील महाविकास आघाडीकडे उबाठा २०, काँग्रेस १६ तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट १० इतके संख्याबळ आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गडालाउबाठा च्या शिवसेनेने समर्थन दिल्यामुळे विधान परिषदेच्या या निर्णयात शरद पवारांचा पक्ष उद्धव ठाकरेंच्या निर्णयासोबत राहणार असल्याचे बोलले जात आहे. शरद पवार यांच्या पाठिंब्यावर उद्धव ठाकरे यांचा उमेदवार विजयी होण्याची दाट शक्यता आहे. परंतु काँग्रेस पक्षाकडे केवळ १६ सदस्य असल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला अतिरिक्त १३ मतांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे संख्याबळ पाहता प्रदेश काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी केलेल्या घोषणेवर काँग्रेस पक्षातील पक्षश्रेष्ठी काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. (तभा वृत्तसेवा)

### ठाकरेंचे नाव चर्चेत असताना दानवेंना संधी

**विधानसभेतील विद्यमान संख्याबळाचा विचार करता महाविकास आघाडीकडून केवळ एकच उमेदवार रिंगणात उतरवला जाईल, असा अंदाज राजकीय वर्तुळात होता. काँग्रेस आणि शरद पवार गट या दोन्ही घटक पक्षांनी उद्धव ठाकरेंनीच उमेदवारी स्वीकारावी, अशी आग्रही भूमिका घेतली होती. मात्र ठाकरेंनी स्वतः न लढता दानवेंच्या नावाची घोषणा केली.** ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ३०० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प

## राज्यात हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

महाराष्ट्राला पूर्णपणे हरित बनवण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राज्य सरकारने आज एक क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत काळात, म्हणजेच २०४७ पर्यंत राज्यात तब्बल ३०० कोटी वृक्ष लागवडीचे महाकाय लक्ष्य गाठण्यासाठी 'हरित महाराष्ट्र आयोगा'च्या स्थापनेला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्याच्या वनाच्छादनाचे क्षेत्र २१ टक्क्यांवरून थेट ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचा मास्टर प्लॅन निश्चित करण्यात आला आहे.







राष्ट्रीय वनधोरणानुसार अपेक्षित असलेले ३३ टक्के हरित क्षेत्र गाठण्यासाठी हा आयोग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या आयोगाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षस्थानी स्वतः मुख्यमंत्री असतील, तर उपमुख्यमंत्री आणि संबंधित खात्यांचे मंत्री याचे कामकाज पाहतील. केवळ झाडे लावणे एवढाच मर्यादित हेतू न ठेवता, लावलेल्या झाडांचे जतन, हवामान बदलाशी दोन हात करण्याची क्षमता विकसित करणे आणि जमिनीचा पोत सुधारणे यावर आयोगाचा विशेष भर असेल. ३०० कोटी वृक्ष लागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता भासणार आहे. हे मोठे आव्हान पेलण्यासाठी राज्य सरकार आता जिल्हानिहाय 'लॅण्ड बँक' विकसित करणार आहे.

२०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे आमचे ध्येय केवळ एक सरकारी मोहीम नसून, ते येणाऱ्या पिढ्यांसाठीचे एक 'ग्रीन मिशन' आहे. हरित महाराष्ट्र आयोगाच्या माध्यमातून आम्ही नियोजनबद्ध पद्धतीने वनाच्छादित क्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढवणार आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)


### एकात्मिक अंमलबजावणी आणि रोजगार निर्मिती

आतापर्यंत विविध विभागांमार्फत स्वतंत्रपणे वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जात होत्या. मात्र, या आयोगामुळे आता निधी, संसाधने आणि जमिनीचा वापर एकात्मिक पद्धतीने करणे शक्य होणार आहे. या मोहिमेमुळे केवळ पर्यावरणच सुधारणार नाही, तर स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील. जलसंधारण आणि जैवविविधतेचे रक्षण करत 'हरित महाराष्ट्र' हे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. ■

## महत्त्वाचे

### 'भाजपाची लोकाभिमुख कार्यशैली जनतेपर्यंत पोहोचवा'

**मुंबई** : भाजपा परिवाराच्या विचारधारेचा प्रभावी प्रसार तसेच लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कार्यशैली जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयातील प्रदेश प्रवक्ता आणि विभागीय प्रसिद्धी प्रमुख यांच्या कार्यशाळेला मार्गदर्शन करताना रविंद्र चव्हाण बोलत होते. यावेळी प्रदेश कार्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, माध्यम प्रमुख गोविंद येतयेकर, प्रदेश सहमाध्यम प्रमुख ओमप्रकाश चौहान, नगरसेवक दिपेश म्हात्रे यांच्यासह प्रदेश प्रवक्ता, विभागीय प्रसिद्धी प्रमुख, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. ■



### ४३ बंडखोरांचे आत्मसमर्पण

**ऐझवाल** : लालमिंगथांगा सनाटे यांच्या नेतृत्वाखालील एचपीसी(डी) गटाचे एकूण ४३ सदस्य गुरुवारी मिझोरममध्ये शस्त्रे खाली ठेवल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मुख्यमंत्री लालदुहोमा आणि गृहमंत्री के. सपडांगा हे ऐझवालपासून सुमारे ४० किमी अंतरावर असलेल्या सेसावंग येथील पोलिस केंद्रीय प्रशिक्षण संस्थेत होणाऱ्या या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा स्वगृही परतण्याचा सोहळा १४ एप्रिल रोजी मिझोरम सरकार आणि ह्मार पीपल्स कन्व्हेन्शन (डेमोक्रॅटिक) यांच्यात झालेल्या शांतता करारानंतर होत आहे. यामुळे राज्यातील बंडखोरी प्रभावीपणे संपुष्टात आली आहे. अलीकडच्या वर्षांत मोठ्या प्रमाणात निष्क्रिय असला तरी, सनाटे यांच्या नेतृत्वाखालील एचपीसी(डी) गट हा मिझोरममधील शेवटचा शिल्लक राहिलेला वांशिक बंडखोर गट मानला जात होता आणि ह्मार-बहुल गावांमध्ये खंडणीसह अधूनमधून होणाऱ्या गुन्हेगारी कारवायांमध्ये तो कथितरित्या सामील होता. ऐझवाल जिल्ह्यातील साकवरदाई येथे जे सिनलुंग हिल्स कौन्सिलचे मुख्यालय आहे तिथे स्वाक्षरी झालेल्या या करारामध्ये, ह्मार-बहुल क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.


### व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष येणार भारत दौऱ्यावर

**नवी दिल्ली** : व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम पुढील आठवड्यात भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारतासोबतची सामरिक आणि लष्करी भागीदारी अधिक मजबूत करणे हा त्यांच्या भेटीचा उद्देश आहे. तथापि त्यांच्या भेटीचा उद्देश सुमारे ५,८०० कोटी रुपये (७०० दशलक्ष) किमतीचा प्रस्तावित ब्रह्मोस क्षेपणास्त्र करार असल्याची माहिती समोर आली आहे. प्रस्तावित करारामध्ये ब्राह्मोसच्या जहाजविरोधी आवृत्तीचा समावेश असू शकतो. ■

## महाराष्ट्र होणार देशाचे 'ग्रीन पॉवर' हाऊस!

**महाराष्ट्राला** शाश्वत आणि प्रदूषणमुक्त ऊर्जेच्या दिशेने नेण्यासाठी राज्य सरकारने आज 'मॅजेस्टिक' या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा केली आहे. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या १२ हजार ३०३ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार असून, २०३० पर्यंत एकूण वीज वापरापैकी तब्बल ५० टक्के वीज ही अक्षय ऊर्जेच्या स्रोतांपासून मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या भव्य प्रकल्पासाठी जागतिक बँकेचे मोठे सहकार्य लाभणार असून, एकूण खर्चाच्या ७० टक्के म्हणजेच सुमारे ८ हजार ६१६ कोटी रुपयांचे कर्ज





जागतिक बँकेकडून उभारले जाणार आहे. उर्वरित निधी राज्य सरकार आणि वीज कंपन्यांमार्फत उभारला जाईल. २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत ही योजना टप्प्याटप्प्याने राबवली जाणार आहे. ■

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पंखांना नवे बळ; शिष्यवृत्तीत १२ वर्षांनंतर मोठी वाढ

**राज्यातील** दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला गती देण्यासाठी आणि कोकणातील शैक्षणिक सुविधांचा विस्तार करण्यासाठी राज्य सरकारने आज दोन अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत तब्बल १२ वर्षांनंतर भरीव वाढ करण्यात आली आहे. दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. बदलत्या महागाईचा विचार करून सरकारने पदवी, पदव्युत्तर आणि डिप्लोमा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मासिक भत्त्यात मोठी वाढ केली आहे. गट १ मधील उच्च शिक्षण घेणाऱ्या निवासी विद्यार्थ्यांना आता पूर्वीच्या १२०० रुपयांऐवजी १७०० रुपये, तर अनिवासी विद्यार्थ्यांना ९०० रुपये भत्ता मिळणार आहे. केवळ भत्ताच नव्हे, तर अंध विद्यार्थ्यांसाठीचा वाचक भत्ताही आता दरमहा ३०० रुपयांपर्यंत वाढवण्यात आला आहे. ■

### आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बारा व चोवीस वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे आदिवासी विभागाच्या ५५६ अनुदानित आश्रमशाळांतील ७ हजार ५६२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. सध्या या अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दोन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. ■

## लंडनमध्ये आता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन'

**जगातील** अग्रगण्य शिक्षण संस्था असलेल्या 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये आता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर होणार आहे. महाराष्ट्र सरकारने या प्रतिष्ठित संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विशेष 'अध्यासन' स्थापन करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला असून, याद्वारे आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनाचे नवे दालन उघडले जाणार आहे.

ज्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकून बाबासाहेबांनी जगाला आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली, त्याच ठिकाणी आता त्यांच्या नावाने अध्यासन असणे ही राज्यासाठी गौरवाची बाब आहे. या अध्यासनासाठी महाराष्ट्र शासन ३० लाख पौंड (सुमारे ३७ कोटी रुपये) इतका निधी एकरकमी उपलब्ध करून देणार आहे.



केवळ अध्यासनच नव्हे, तर राज्यातील अनुसूचित जातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'पीएचडी' शिष्यवृत्तीची घोषणाही या निर्णयाचा एक मुख्य भाग आहे. महाराष्ट्र शासन आणि 'बार्टी' यांच्या समन्वयाने एकूण १० विद्यार्थ्यांना ही डॉक्टरेट शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना सुरू होत असून, यासाठीचा ५० टक्के खर्च 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' उचलणार आहे. ■

## परिषद दिली तर शिंदेंचा पाईक म्हणून काम करेन

### बच्चू कडू यांचे प्रतिपादन | प्रहार पक्ष विलीनीकरणाबाबत मात्र नकार

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी मंत्री बच्चू कडू यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली.



''उमेदवारी अर्जासोबत जोडायची कागदपत्रे माझ्या बॅगेतच आहेत. जर शिवसेनेने सन्मानाने उमेदवारी दिली, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पाईक म्हणून काम करण्याची माझी तयारी आहे,'' असे कडू यांनी सांगितले.

प्रहार पक्षाचे शिवसेनेत विलीनीकरण होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्याने कडू यांनी या पत्रकार परिषदेद्वारे स्पष्टीकरण दिले. विलीनीकरणाच्या बातम्या पाहून दुःख झाले, अशा चर्चा केवळ वावड्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

पदासाठी युती करणारा बच्चू कडू नाही, तर मुद्द्यांसाठी युती करणारे आहोत, असे त्यांनी सांगितले. प्रहार संघटनेचे एक लाखांहून अधिक सदस्य असून शिवसेनेच्या बंडखोरीतून विधान परिषद उमेदवारीचा प्रस्ताव त्यांना माध्यमांमार्फत कळल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री उदय सामंत यांच्यासोबत चर्चा झाली होती आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत भेट झाली होती, मात्र या विषयावर थेट चर्चा झाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. ◂(तभा वृत्तसेवा)

### अजून तळ्यात-मळ्यात ?

» शिवसेनेने सन्मानाने उमेदवारी दिल्यास शिंदे यांच्यासोबत काम करण्याची तयारी असली, तरी दिव्यांग बांधव, शेतकरी आणि शेतमजूर हेच आमच्यासाठी सर्वोच्च राहतील, असे कडू यांनी स्पष्ट केले. गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत पराभव झाला तरी आम्ही थकलो नाही. भाजपासोबत जाण्याचा निर्णय आपल्या मतदारांना आवडला नाही,असेही ते म्हणाले. ■

## दाभोळकर हत्याप्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

महाराषष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष दिवंगत नरेंद्र दाभोलकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी, सीबीआयच्या विशेष न्यायालायने दोन आरोपींना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

यामध्ये, सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दोषी ठरवण्यात आले. तर, इतर तीन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. मात्र, सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. यापैकी, दोषी शरद कळसकरला मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने आरोपी वीरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांना सबळ पुराव्याअभावी न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## अवैध गर्भपात केंद्राचा लागला छडा, पाच अटकेत

◆ **छ.संभाजीनगर, २९ एप्रिल**

रशीदपुरा भागात एका निवृत्त न्यायाधीशांचा बंगला भाड्याने घेऊन सुरू असलेल्या अवैध गर्भपात केंद्राचा पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकून छडा लावला. केंद्र चालवणारी शाहेदा परवीन गर्भपातानंतर गर्भ थेट खिडकीतून पाठीमागच्या नाल्यात फेकत होती.

भटक्या कुत्र्यांची तेथे असलेली टोळी गर्भाचे लचके तोडून विल्हेवाट लावत असल्याची बाब समोर आली आहे. एका महिलेने पोलिस आयुक्तांना फोन करून याबाबत माहिती दिल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणी चार जणांना अटक केली असून त्यांना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. शाहेदा परवीन सय्यद इर्शाद अहमद, सय्यद इर्शाद अहमद सय्यद गनी, नसरीन नजीर शेख आणि मीनाक्षी मंगेश थोरात अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. शाहेदा मूळची जुन्या शहरातीलच रहिवासी आहे. १५ वर्षांपूर्वी ती एका प्रसूतिगृहात दाई म्हणून डॉक्टरांच्या हाताखाली काम करायची.

### सोनोग्राफी मशीन घेऊन जायचे थेट घरी

या साखळीतील तोतया डॉक्टर पोर्टेबल सोनोग्राफी मशीन घेऊन थेट रुग्णांच्या घरी जायचे आणि लिंगनिदानासाठी ४५ ते ५० हजार रुपये उकळायचे. गर्भात मुलगी असल्याचे सांगत मीनाक्षी त्या गर्भवतीला शाहेदाकडे रशीदपुऱ्यात घेऊन यायची. शाहेदा गर्भपातासाठी १५ हजार रुपये घ्यायची. ◂(तभा वृत्तसेवा)

## आणखी एका आरोपीला अटक

### कोल्हापूर लैंगिक प्रकरण

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

राष्ट्रीय महिला आयोगाने बुधवारी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे महिला आणि अल्पवयीन मुलींच्या कथित मोठ्या प्रमाणावरील लैंगिक शोषणाच्या अहवालाची स्वतःहून दखल घेतली. दरम्यान या प्रकरणातील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, एका तरुणाला एका तरुणीला धमकी देऊन शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याप्रकरणी अटक केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. तिने नकार दिल्यास तो आत्महत्या करेल, अशी धमकी दिली होती. आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकांना तातडीने आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत, असे आयोगाने सांगितले.

राहटकर यांनी सर्व पीडितांची ओळख पटवणे, आरोपी आणि त्याच्या साथीदारांना अटक करणे, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून सर्व संबंधित आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्याची खात्री करणे आणि सखोल सायबर फॉरेन्सिक तपास करण्याचे निर्देशही दिले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## इमारतीची भिंत कोसळून ७ ठार



**बंगळुरू** : कर्नाटकची राजधानी बंगळूर येथील बोवरिंग रुग्णालयाजवळ बुधवारी सायंकाळी एका इमारतीची भिंत कोसळून झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला, तर ७ नागरिक जखमी आहे. मृतकांमध्ये रस्त्यावरील दुकानदार आणि पादचाऱ्यांचा समावेश आहे.

घटनेची माहिती मिळताच बचाव पथकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले आणि जखमींना रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी सात जणांना मृत घोषित केले, तर इतर सात जणांवर उपचार सरू केले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी संवेदना व्यक्त करत मृतकांच्या कुटुंबाला प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. घटनेच्या चौकशीचे आदेशही त्यांनी दिले आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, बोवरिंग आणि लेडी कर्झन मेडिकल कॉलेज अँड रिसर्च इन्स्टिट्यूटजवळ इमारतीची भिंत अचानक कोसळली. ढिगाऱ्याखाली रस्त्यावरील विक्रेते आणि पादचारी अडकले होते. ■

## आता प्रगती पुस्तकासोबत उत्तरपत्रिका दाखवणेही अनिवार्य

### राज्यासाठी शिक्षण विभागाचा निर्णय

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी यंदाचा निकाल १ मे २०२६ रोजी जाहीर होणार आहे. मात्र, यंदा केवळ निकाल जाहीर होणार नाही, तर शिक्षण विभागाने एक निर्णय लागू केला. यापुढे केवळ प्रगतीपुस्तक न देता, त्यांच्या उत्तरपत्रिकाही पालकांना दाखवणे अनिवार्य केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल १ मे रोजी प्रसिद्ध केला जाईल. यानंतर २ मेपासून राज्य मंडळाच्या सर्व शाळांना अधिकृतपणे उन्हाळी सुटी लागणार आहे. नव्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये सुसंगती राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. निकालाच्या दिवशीच विद्यार्थ्यांना प्रगतीपुस्तक दिले जाईल तसेच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकाही दाखवल्या जाणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे आवश्यक मानले जाते. याच अनुषंगाने शिक्षण संचालनालयाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पालकांना आपल्या मुलांनी परीक्षेत नेमके काय लिहिले, कोणत्या चुका केल्या आणि त्यांची संकल्पना कितपत स्पष्ट आहे, हे समजणे सोपे होणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### सर्व शाळांना नियम पाळणे बंधनकारक

» या संदर्भातील आदेश शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले असून, राज्यातील सर्व शाळांना हे नियम पाळणे बंधनकारक करण्यात आले. यामुळे आता पालकांना आपल्या मुलांच्या उत्तरपत्रिका प्रत्यक्ष पाहता येणार आहेत आणि शिक्षकांनी केलेले मूल्यमापनही समजून घेता येणार आहे. ■

## संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव

**बीड** : जिल्ह्यातील मस्साजोग गावातील सरपंचपदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाला. निडणुकीत स्वरुपानंद देशमुख यांचा ९२ मतांनी विजय झाला. माजी सरपंच संतोष देशमुख यांची ज्यापद्धतीने हत्या करण्यात आली, त्यावरून संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. देशमुख यांच्या हत्येमुळे सरपंचपदाची पोटनिवडणूक झाली. त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर निवडणूक बिनविरोध घेण्यासाठी प्रयत्न केले गेले. मात्र मागील निवडणुकीत संतोष देशमुख यांच्याकडून अवघ्या ९ मतांनी पराभूत झालेल्या स्वरूपानंद देशमुख यांनी पुन्हा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही लढत झाली. ■

## लोकप्रतिनिधी गुन्हेगार असल्यास प्रोटोकॉल गुंडाळा

● राज्य शासनाचा प्रशासनाला स्पष्ट आदेश ● 'उत्थापन' देऊन अभिवादन करण्याची गरज नाही

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या लोकप्रतिनिधींचा सन्मान राखणे हे प्रशासनाचे कर्तव्य असले, तरी फौजदारी गुन्ह्यात दोषी ठरलेल्या किंवा गंभीर चौकशीला सामोरे जाणाऱ्या नेत्यांच्या बाबतीत आता सरकारी शिष्टाचार (प्रोटोकॉल) पाळण्याची सक्ती नसेल. एखादा लोकप्रतिनिधी फौजदारी प्रकरणात दोषी ठरला असेल किंवा निवडणूक प्रक्रियेच्या कामासाठी कार्यालयात आला असेल, तर अशा वेळी सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना उभे राहून (उत्थापन देऊन) अभिवादन करण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय



दरबारी गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या नेत्यांना मिळणाऱ्या 'व्हीआयपी' वागणुकीला लगाम बसणार आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे. यापूर्वी विधानमंडळ किंवा संसद सदस्यांना सन्मानाची आणि सौजन्याची वागणूक देण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली होती. यामध्ये अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या दालनात लोकप्रतिनिधी आल्यावर आणि भेटीनंतर परत जाताना त्यांना उभे राहून सन्मान देणे अपेक्षित होते. मात्र, आता या नियमात सुधारणा करण्यात आली आहे. जर संबंधित लोकप्रतिनिधी फौजदारी प्रकरणात दोषी असेल किंवा सुनावणीसाठी पक्षकार म्हणून उपस्थित राहिला असेल, तर त्याला कोणताही विशेष दर्जा न देता सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच वागणूक देणे अपेक्षित आहे, असे शासनाने स्पष्ट केले आहे. केवळ फौजदारी गुन्हेच नव्हे, तर निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने म्हणजे नामनिर्देशन अर्ज सादर करणे, अर्जांची छाननी किंवा त्यासंबंधीच्या सुनावणीसाठी लोकप्रतिनिधी शासकीय कार्यालयात उपस्थित राहिले असतील, तरीही त्यांना विशेष शिष्टाचार लागू होणार नाहीत. कायद्यासमोर सर्व समान आहेत, हे तत्व अधोरेखित करण्यासाठी शासनाने हा बदल केला आहे. अशा प्रसंगी संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही भेदभाव न करता, कायदा आणि नियमांनुसार परिस्थितीनुरूप निर्णय घ्यावेत, असे निर्देश या शुद्धिपत्रकाद्वारे दिले आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### काय सांगते नवे शुद्धिपत्रक?

- दोषींना सवलत नाही: फौजदारी प्रकरणात दोषी ठरलेल्या लोकप्रतिनिधींना अधिकाऱ्यांनी उभे राहून अभिवादन करण्याची आता गरज नाही.
- निवडणूक कामासाठीही नियम: अर्ज छाननी किंवा सुनावणीसाठी कार्यालयात आलेल्या नेत्यांना विशेष वागणूक नसेल.
- सामान्य नागरिकत्व: अशा प्रसंगी लोकप्रतिनिधींना सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच वागणूक देणे अपेक्षित असून कायद्याचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ■

## तेल कंपन्यांना पेट्रोलवर १४ रुपये प्रति लीटर तोटा

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमती मर्यादित किरकोळ इंधन दरांपेक्षा जास्त झाल्यामुळे, विपणन नफ्यावर (मार्केटिंग मार्जिन) दबाव येत आहे. यामुळे तेल विपणन कंपन्या पेट्रोल आणि डिझेल अनुक्रमे प्रति लिटर १४ रुपये आणि १८ रुपये तोट्यात विकत आहेत. पेट्रोल आणि डिझेलवरील तोट्याव्यतिरिक्त, पश्चिम आशिया संकटानंतर वाढलेल्या ऊर्जा किमतींमुळे चालू आर्थिक वर्षात कंपन्यांना स्वयंपाकाच्या गॅस (एलपीजी) वर ८० हजार कोटी रुपयांची वसुली कमी होण्याची शक्यता आहे, तर खत अनुदान २.०५ ते २.२५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे.

## राजस्थानचा कर्णधार रियान पराग ई-सिगारेट पिताना दिसला

राजस्थान : आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग वादात सापडला आहे. पंजाब किंग्सविरुद्धच्या मंगळवारच्या सामन्यात तो ड्रेसिंग रूममध्ये 'ई-सिगारेट' पिताना कॅमेरात कैद झाला. लाइव्ह ब्रॉडकास्टची ही क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओ राजस्थानच्या फलंदाजीच्या १६व्या ओव्हरमधील आहे. यात पराग ध्रुव जुरेल आणि यशस्वी जयस्वाल यांच्या उपस्थितीत कथितरित्या ई-सिगारेट पिताना दिसत आहे. रियान परागचे हे कृत्य गंभीर मानले जात आहे. भारत सरकारने 'ई-सिगारेट प्रतिबंध कायदा २०१९ अंतर्गत वेप्स आणि ई-सिगारेटचे उत्पादन, विक्री, आयात आणि जाहिरातीवर बंदी घातली आहे. उल्लंघन केल्यास दंडासोबत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. अशा परिस्थितीत, एका उच्च श्रेणीच्या खेळाडूने आणि संघाच्या कर्णधाराने सार्वजनिक व्यासपीठावर याचा वापर करणे हे कायद्याचे आणि खेळाच्या प्रतिष्ठेचे उल्लंघन मानले जात आहे.

या प्रकरणी बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांच्याकडून प्रतिक्रिया मागवण्यात आली आहे. बोर्ड या प्रकरणाला गांभीर्याने घेईल असे मानले जात आहे. खेळाडूंसाठी वेपिंग आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. कारण त्यातील घटकांची स्पष्ट माहिती नसते. देशात हे प्रतिबंधित आहे आणि उच्च श्रेणीच्या खेळाडूंसाठी याचे सुरक्षा मानक निश्चित नाहीत. बीसीसीआय या प्रकरणी फ्रँचायझीकडून स्पष्टीकरण मागवू शकते.



विझलो आज जरी मी, हा माझा अंत नाही. पेटेन उद्या नव्याने, हे सामर्थ नाशवंत नाही. छाटले जरी पंख माझे, पुन्हा उडेन मी. अडवू शकेल मला, अजून अशी भिंत नाही. माझी झोपडी जाळण्याचे, केलेत कैक कावे. जळेल झोपडी अशी, आग ती ज्वलंत नाही.
**- संजय केनेकर,** भाजपा आमदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, ३० एप्रिल २०२६ ३




अमेरिका नसता, तर युरोपीय देश जर्मन बोलताना दिसले असते. जर आम्ही (ब्रिटिश) नसतो, तर तुम्ही लोक फ्रेंच बोलताना दिसले असते. जर अमेरिका मदतीसाठी आला नसता, तर आज तुम्ही लोक जर्मन आणि थोडे जपानी भाषेत बोलताना दिसले असता.
**- किंग चार्ल्स तिसरे**

# तृणमूल कार्यकर्त्यांचा धुडगूस

## • शुभेंदू अधिकारी यांच्यावर हल्ला • भाजपा उमेदवारांच्या वाहनाची तोडफोड

**अनेक जिल्ह्यांमध्ये हिंसक संघर्ष**

◆ **कोलकाता, २९ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानादरम्यान नादिया, हावडा आणि दक्षिण २४ परगणा यासह अनेक जिल्ह्यांमध्ये तृणमूल काँग्रेसच्या समर्थकांनी अक्षरशः उत्पात माजवला. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील बसंती परिसरात भाजपा उमेदवार विकास सरदार यांच्यावर हल्ला झाला. त्यांच्या वाहनाची तोडफोड करण्यात आली. दुसरीकडे भवानीपूरमध्ये विरोधी पक्षनेते आणि भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांना मारहाण करण्यात आली. पाणीहाटीमध्ये भाजपा आणि तृणमूल समर्थकांमध्ये झटापट झाली.

हुगळी जिल्ह्यातील रामचंद्रपूर येथील बूथ क्रमांक १४७ वर तृणमूल आणि आयएसएफ (इंडियन सेक्यूलर फ्रंट) समर्थकांमध्ये संघर्ष झाला. बनावट मतदान एजंटांच्या नियुक्तीच्या आरोपांवरून ही घटना घडली. भांगर जिल्ह्यातील प्रांगणगंज येथील बूथ क्रमांक २३३ वर आयएसएफ प्रमुख नौशाद सिद्दीकी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. दुसरीकडे बसंतीमध्ये भाजपा उमेदवाराच्या वाहनाची तोडफोड करण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. ही घटना मतदान केंद्र क्रमांक ७६ वर घडली. मतदान केंद्राला भेट देण्यासाठी आलले भाजपा उमेदवार विकास सरदार यांच्यावर तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. तृणमूल काँग्रेसने बोगस मतदान करण्यासाठी ७५० जणांना मतदान केंद्रावर आणले होते. यावर आक्षेप घेतल्यानंतर हल्ला झाला असा आरोप सुवेंदू अधिकारी यांनी केला. खोट्या बोटांच्या मदतीने निवडणुकीत फेरफार करण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. भवानीपूरमधील जनता बदल घडवण्यासाठी तयार आहे आणि आपल्या मताद्वारे ते चोख उत्तर देतील असेही प्रसार माध्यमांशी बोलताने ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*



हुबळी जिल्ह्यातील रामचंद्रपूर मतदान संघातील एका केंद्रावर तृणमूल काँग्रेस आणि आयएसएफ समर्थकांमध्ये अशी हाणामारी झाली

### मतदारयाद्या फाडण्यावरून वाद

हुगळी-चुचुरामध्ये रस्त्याच्या कडेला लावलेले तृणमूल काँग्रेसचे अनेक निवडणूक बॅनर हटवल्यावरून गोंधळ उडाला. मतदान केंद्र क्रमांक २७, २८ आणि २९ वर मतदार याद्या फाडण्यावरून वाद निर्माण झाला. याशिवाय, पाणीहाटी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक १४५ वर भाजपा आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. मतदानादरम्यान ही झटापट बराच वेळ सुरू होती, त्यानंतर सुरक्षा दलांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

### सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दुर्लक्षाचा आरोप

आयएसएफ प्रमुख नौशाद सिद्दीकी यांनी आरोप केला की, तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षा रक्षकांकडून शस्त्रे हिसकावून घेण्याचाही प्रयत्न झाला. सुरक्षा रक्षकांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी किंवा बचाव कार्यात मदत करण्यासाठी हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे परिसरातील तणाव आणखी वाढला.

### पोलिसांनी लाठीचार्ज

भवानीपूरमधील जय हिंद भवन मतदान केंद्रावर तणाव वाढल्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यानंतर सुरक्षा वाढवण्यात आली. पोलीस सध्या या प्रकरणाचा तपास करत असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. दरम्यान भवानीपूरसह बिधाननगरमध्ये राज्य मंत्री सुजीत बोस, कोलकाता पोर्टमध्ये फिरहाद हकीम, हावडा येथून ज्योतिप्रिया मल्लिक, दम दम मधून ब्रात्य बसु, बालीगंज मधून सोवंदेब चटोपाध्याय, उत्तरपाडातून मीनाक्षी मुखर्जी हे महत्त्वाचे उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत.



पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यातही ९२.२८ टक्के एवढे बम्पर मतदान झाले. कोलकाता शहरातील मतदान केंद्रांवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली, भाजपा नेते मिथुन चक्रवर्ती यांनी मतदानाचा हक्क बजावला. कोलकाता शहरातील एका मतदान केंद्रावर इस्कॉनच्या भाविकांनी वाजत गाजत जात मतदान केले.

### सुंदरगडमध्ये बस-ट्रकच्या धडकेत चार ठार

**सुंदरगड :** ओडिशातील सुंदरगड जिल्ह्यात घडलेल्या भीषण रस्ते अपघातात चार ठार झाले. चंडीपोश पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुसाबिरा भागात प्रवासी बस आणि मालवाहू ट्रक यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून, बारा पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# धार संस्थानने भोजशाळेला मशीद घोषित केले होते

### मुस्लिम पक्षाचा उच्च न्यायालयात दावा

◆ **इंदूर, २९ एप्रिल**

तत्कालीन धार संस्थानच्या न्यायालयाने २४ ऑगस्ट १९३५ रोजी अकराव्या शतकातील या वास्तूला मशीद घोषित केले होते, असा युक्तिवाद भोजशाळा मंदिर-कमल मौला मशीद वादाप्रकरणी मुस्लिम पक्षाने मध्यप्रदेश उच्च न्यायालयात केला.

धार जिल्ह्यातील भोजशाळेला हिंदू समाज देवी सरस्वतीचे मंदिर मानतो, तर मुस्लिम पक्ष त्यावर कमल मौला मशीद असल्याचा दावा करतो. हा वादग्रस्त परिसर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या संरक्षणाखाली आहे. ज्येष्ठ वकील शोभा मेनन यांनी मंगळवारी मुस्लिम समाजातील मुनीर अहमद आणि इतरांनी दाखल केलेल्या हस्तक्षेप अर्ज आणि रिट अपिलाच्या समर्थनार्थ उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठातील न्या. विजयकुमार शुक्ला आणि न्या. आलोक अवस्थी यांच्यासमोर सविस्तर युक्तिवाद सादर केला.

भोजशाळा प्रकरणी 'हिंदू फ्रन्ट फॉर जस्टिस' या संस्थेने कुलदीप तिवारी यांनी आणि आणखी एका व्यक्तीने दाखल केलेल्या दोन जनहित याचिकांवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'गोलमाल ५'चे चित्रीकरण सुरू



**मुंबई :** रोहित शेट्टीच्या कॉमेडी फ्रँचायझी गोलमालच्या पाचव्या भागाचे म्हणजेच 'गोलमाल ५'चे चित्रीकरण सुरू झाले आहे. चित्रपटाचा मुख्य अभिनेता अजय देवगनने समाज माध्यमावर चित्रपटाच्या चित्रीकरणाचा एक व्हिडीओ जारी केला आहे. ऊटीमध्ये सुरू असलेल्या चित्रीकरणाच्या या व्हिडीओमध्ये चित्रपटाची प्रसिद्ध ५ आसनी बाईक देखील दिसत आहे. यावेळी चित्रपटात अक्षय कुमारचीही एंट्री झाली आहे. दिग्दर्शक रोहित शेट्टींनी हाच व्हिडीओ शेअर करत मागील २० वर्षांपासून आम्ही सकारात्मक ऊर्जेने पुढे जात आहोत. या फ्रँचायझीचा पहिला चित्रपट २००६ मध्ये आला होता, असे त्यांनी लिहिले.

### ८ मे रोजी प्रदर्शित होणार 'जन नायक'



**मुंबई :** मागील अनेक महिन्यांपासून छत्रपती विजय थलपथीच्या बहुप्रतिक्षित 'जन नायकन' या चित्रपटाची चर्चा आहे. हा चित्रपट मुळात ९ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र सेन्सरशिपच्या अडचणींमुळे या चित्रपटाची तारीख पुढे ढकलावी लागली. केविन प्रोडक्शनची निर्मिती असणारा हा चित्रपट पॉलिटिकल थ्रिलर ॲक्शन ड्रामा आहे. चित्रपटगृहात प्रदर्शनाची तारीख अखेर निश्चित झाली असून ८ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. 'जन नायकन' चित्रपटाचे दिग्दर्शन विनोथ यांनी केले आहे. यात छत्रपती विजय या सुपरस्टारची मुख्य भूमिका आहे. तर बॉबी देवल खलनायक साकारला आहे. पूजा हेगडे चित्रपटात नायिका आहे.

### 'डुग डुग' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई :** ऋत्विक प्रतीक दिग्दर्शित 'डुग डुग' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. हा एक उपहासात्मक आणि विनोदी चित्रपट आहे. हा चित्रपट ऋत्विक प्रतीक यांनीच लिहिला आहे. अनुराग कश्यप, निखिल आडवाणी, विक्रमादित्य मोटवानी आणि वसन बाला यांसारखे चित्रपट निर्माते कार्यकारी निर्माते म्हणून या चित्रपटाला पाठिंबा देत आहेत. ही कथा दिग्दर्शकाने विनोदी आणि उपहासात्मक शैलीत दाखवली आहे. हा चित्रपट सत्य घटनांवर आधारित आहे. 'डुग डुग' चित्रपट ८ मे २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटात अल्ताफ खान, गौरव सोनी, योगेंद्र सिंह आणि दुर्गा लाल सैनी यांसारखे कलाकार मुख्य भूमिका साकारत आहेत. या चित्रपटाचे अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये खूप कौतुक झाले होते.

# मणिपुरात बंडखोरांचे १२ बंकर उद्ध्वस्त

### लुंगतार टेकड्यांवर सुरक्षा दलाची कारवाई

◆ **इंफाळ, २९ एप्रिल**

मणिपूरमधील सुरक्षा दलांनी मणिपूरच्या कांगपोकपी आणि उखरुल जिल्ह्यांतील डोंगराळ भागात शोधमोहीम राबवत १२ बेकायदेशीर बंकर उद्ध्वस्त केले. अलीकडील हिंसाचारानंतर कुकी आणि तांगखुल नागा समुदायांच्या सशस्त्र गटांनी हे बंकर बांधले होते. या हिंसाचारात आतापर्यंत किमान सात जणांचा मृत्यू झाला असून ३० हून अधिक घरे जाळण्यात आली आहेत.

पोलिसांनी बुधवारी एका निवेदनात म्हटले आहे की, ही कारवाई मंगळवारी विविध संवेदनशील भागांमध्ये करण्यात आली. कांगपोकपी जिल्ह्यातील सैकुल पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लुंगतार टेकडीवर तीन बेकायदेशीर बंकर उद्ध्वस्त करण्यात आले, तर टिंगपिबुंग आणि लेप्लान गावांमध्ये प्रत्येकी एक बंकर उद्ध्वस्त करण्यात आला. याव्यतिरिक्त, सुरक्षा दलांनी उखरुल जिल्ह्यातील लिटोन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील इतर सात बंकर उद्ध्वस्त केले. हे सर्व बंकर मोक्याच्या ठिकाणी, उंच आणि असुरक्षित भागांमध्ये वसलेले होते आणि त्यांचा वापर हल्ले व प्रतिहल्ले करण्यासाठी केला जात होता.



दरम्यान, एका वेगळ्या कारवाईत, सुरक्षा दलांनी चुराचंदपूर जिल्ह्यातील माओवोम गाव आणि आसपासच्या परिसरावर छापा टाकून मोठ्या प्रमाणात शस्त्रे जप्त केली. यात एक एके-४७ रायफल, तीन सिंगल-बॅरल बंदुका, एक पिस्तूल, दोन ग्रेनेड आणि एक ८१ मिमी मोर्टर यांचा समावेश होता. सुरक्षा यंत्रणांच्या मते, या शस्त्रांचा हिंमसाचार घडवण्यासाठी केला जात होता. *(वृत्तसंस्था)*

# बांगलादेशात गोवरचा कहर; २५० रुग्णांनी गमावला जीव

◆ **ढाका, २९ एप्रिल**

बांगलादेशात गोवर आजाराने धुमाकूळ घातला असून, एक महिन्यातच २५० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये लहान मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेने शेजारी देशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. विशेषतः बांगलादेशच्या सीमा भारताला लागून असल्याने भारतातही या संसर्गाचा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बांगलादेशातील ६४ पैकी ५८ जिल्ह्यांमध्ये गोवरचा प्रसार झाला आहे. बांगलादेशात लसीकरणाचा दर उच्च होता, परंतु गेल्या दोन वर्षांत, विशेषतः २०२५ मध्ये त्यात झालेली घट या मृत्यूंसाठी कारणीभूत ठरली आहे. यावर्षी १५ मार्चपासून २५ एप्रिलपर्यंत देशात २५० जणांचा गोवरने मृत्यू झाला आहे. एकूण रुग्णांपैकी ९१ टक्के मुले १ ते १४ वर्षे वयोगटातील आहेत. बीएनपी सरकारने सहा महिन्यांचा बालकांसाठी आपत्कालीन लसीकरण मोहीम सुरू करण्याचे आदेश जारी केले. *(वृत्तसंस्था)*

### माओवादी-सुरक्षा दलांत पश्चिम सिंगभूममध्ये चकमक

◆ **चायबासा, २९ एप्रिल**

झारखंडच्या पश्चिम सिंघभूम जिल्ह्यातील कोल्हान वनक्षेत्रात सुरक्षा दल आणि माओवाद्यांत बुधवारी चकमक झडली, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

गोईलकेरा आणि टोंटो पोलिस ठाण्याच्या हद्दीलगतच्या वनक्षेत्रात माओवाद्यांविरुद्ध जिल्हा पोलिस आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने राबवलेल्या शोधमोहिमेदरम्यान ही चकमक झडल्याची माहिती पश्चिम सिंघभूमचे पोलिस अधीक्षक अमित रेणू यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

गोईलकेरा आणि टोंटो पोलिस ठाण्यांच्या हद्दीवर असलेल्या बोरोईजवळ अधूनमधून गोळीबार सुरू आहे. सध्या या चकमकीत माओवाद्यांचा नेमका कोणता गट सहभागी आहे, हे निश्चित करणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले. या वर्षाच्या सुरुवातीला या भागातील चकमकींमध्ये अनेक वरिष्ठ माओवादी नेत्यांचा खात्मा झाल्यानंतर आता केवळ मिसिर बेसरा हा सदस्य उरला आहे. *(वृत्तसंस्था)*

# गाऊटच्या औषधांमुळे कमी होतो हृदयविकाराचा धोका

## • एक लाखांहून अधिक रुग्णांवर केला अभ्यास • हृदयविकारासह रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांमध्ये नऊ टक्के घट

◆ **लंडन, २९ एप्रिल**

दिवसेंदिवस हृदयविकाराचे रुग्णांमध्ये वाढ होते आहे. याला अनेक कारणे आहेत, मात्र त्यावर उपायही अनेक आहेत. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासानुसार गाऊटच्या म्हणजेच संधिवाताच्या औषधांमुळे हृदय विकाराचा धोका कमी हाते असल्याचे समोर आले आहे.




एक लाखांहून अधिक रुग्णांवर केलेल्या एका मोठ्या नवीन अभ्यासानुसार, गाउटवर उपचार करण्यासाठी वापरली जाणारी सामान्य औषधे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका देखील कमी करू शकतात. ज्या लोकांचा उपचार तितकासा प्रभावी नव्हता त्यांच्या तुलनेत, त्या गाउटग्रस्त लोकांनी योग्य मात्रेत युरेट-कमी करणारी औषधे घेतली त्यांच्यामध्ये पाच वर्षांच्या कालावधीत गंभीर हृदय विकार आणि रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांमध्ये नऊ टक्के घट झाल्याचे नॉटिंगहॅम विद्यापीठातील संशोधकांना आढळून आले. गाउट हा दाहक संधिवाताचा सर्वात सामान्य प्रकार आहे आणि एकट्या अमेरिकेतच सुमारे एक कोटी लोकांना याचा त्रास होतो, तर जगभरात आणखी लाखो लोकांना याचा संसर्ग आहे. रक्तामध्ये युरिक ॲसिड जमा झाल्यामुळे हा आजार होतो. यामुळे सांध्यांभोवती सुईसारखे स्फटिक तयार होतात आणि ते वेदनादायी असतात. युरिक ॲसिडची उच्च पातळी किडनी स्टोनला (मूत्रपिंडातील खडे) देखील कारणीभूत ठरू शकते. हा अभ्यास 'जामा इंटरनल मेडिसिन'मध्ये प्रकाशित झाला आहे.

या अभ्यासात ज्यांनी अलीकडेच युरेट कमी करणारी औषधे घेणे सुरू केले आहे, अशा रुग्णांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. ९९ टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये 'ॲलोप्युरिनॉल' या औषधाचा वापर करण्यात आला. शास्त्रज्ञांनी, ज्या रुग्णांची युरिक ॲसिडची पातळी पहिल्या वर्षात सहा एमजी/डीएल या शिफारस केलेल्या मर्यादेखाली आली. त्यांची तुलना हे लक्ष्य गाठू न शकलेल्या रुग्णांशी केली. गाउट असलेल्या लोकांना हृदयविकार आणि स्ट्रोकसारख्या आजारांचा धोका वाढतो. गाउटवर उपचार करण्यासाठी वापरली जाणारी 'ॲलोप्युरिनॉल'सारखी औषधे योग्य मात्रेत घेतल्यास हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका कमी करू शकतात, हे दर्शविणारा हा पहिलाच अभ्यास आहे. योग्य मात्रा प्रत्येक व्यक्तीनुसार बदलते आणि रक्तातील युरेटची पातळी ३६० मायक्रोमोल्स प्रति लिटर (६ मिग्रॅ/डीएल) पेक्षा कमी करण्यासाठी आवश्यक असलेली मात्रा म्हणजे योग्य मात्रा होय, असे स्कूल ऑफ मेडिसिनचे प्राध्यापक अभिषेक यांनी सांगितले.

युरिक ॲसिडची पातळी जितकी कमी असेल, तितकाच गाउटचा झटका कमी करण्यात आणि हृदयाशी संबंधित आजारांपासून संरक्षण करण्यात अधिक फायदा होतो, असे निकालांवरून दिसून आले. ज्या लोकांना आधीपासूनच हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी आजारांचा धोका जास्त होता, त्यांना सर्वाधिक संरक्षण मिळाल्याचे दिसून आले. *(वृत्तसंस्था)*

### औषधाची मात्रा योग्य असणे गरजेचे

हा संबंध केवळ युरिक ॲसिडच्या पातळीशी नसून, गाउटच्या त्रासासोबत येणाऱ्या तीव्र दाहकतेच्या झटक्यांशी असू शकतो, असा संशोधकांचा विश्वास आहे. उपचाराचे लक्ष्य गाठण्यासाठी रुग्णांना औधषाची योग्य मात्रा मिळणे किती महत्त्वाचे आहे, हे या निष्कर्षांनी अधोरेखित केले आहे, असे प्रमुख संशोधक प्राध्यापक अभिषेक म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## अग्रलेख...

# महाराष्ट्राचा ‘भगीरथ’ संकल्प

महाराष्ट्राच्या जलसंपदेला आणि समृद्ध संस्कृतीला नवजीवन देणारा एक अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे. ‘महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची’ स्थापना करून राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचा कायापालट करण्याचा हा संकल्प आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे गुदमरलेल्या नद्यांना पुन्हा मोकळा श्वास मिळवून देण्याच्या या प्रयत्नाचे स्वागत व्हायलाच हवे. राजा भगीरथाने कठोर तपस्या करून गंगा पृथ्वीवर आणली होती. भारतीय संस्कृतीत ‘भगीरथ प्रयत्न’ हा शब्दप्रयोग अशा कार्यासाठी वापरला जातो, जे अशक्य कोटीतले असते. परंतु, जिद्दीने आणि अथक परिश्रमाने ते पूर्णही केले जाते. राज्यातील नद्यांची आजची भीषण अवस्था पाहता, त्यांचे पुनरुज्जीवन करणे हे एखाद्या आधुनिक ‘भगीरथ’ कार्यापेक्षा काही कमी नाही. कणव असलेले राज्यकर्तेच असा निर्णय घेऊ शकतात हे खरेच. अन्यथा आजवर तो झाला असता. ज्यांनी संस्कृती जोपासली, त्याच नद्या मानवी हव्यासापोटी आज मरणासन्न अवस्थेत आहेत. नद्यांचे आता घाण पाणी वाहून नेणारे नाले झाले आहेत. कधी काळी या नद्या होत्या का, असा प्रश्न पडावा इतकी बिकट परिस्थिती आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ताज्या अहवालानुसार, देशातील सर्वाधिक ५४ प्रदूषित नदी पट्टे हे एकट्या महाराष्ट्रात आहेत. याकडे केवळ आकडेवारी म्हणून नाही, तर राज्याच्या पर्यावरणीय आरोग्याचा ‘डेथ वॉरंट’ म्हणून बघितले पाहिजे. मुळा-मुठा, गोदावरी, पवना आणि चंद्रपूरची इरई, झरपट वा मुंबईची मिठी नदी असो, या साऱ्यांची स्थिती पाहून अक्षरशः काळजाचे पाणी होते. जेव्हा एखादी नदी प्रदूषित होते, तेव्हा फक्त तिचे पाणी नासत नसते; तिच्या काठावरची संस्कृती, जैवविविधता आणि मानवी आरोग्यही ढासळते. खरे तर, देशातील सर्वाधिक प्रदूषित नदी पट्टे महाराष्ट्रात असणे, हीच चिंतेची बाब आहे.

नद्यांचा श्वास गुदमरतो; कारण वाढत्या शहरीकरणामुळे सांडपाणी थेट नद्यांत सोडले जात आहे. विकासाच्या नावावर नद्यांना रासायनिक गटार समजले जात आहे. रेतीचा अमर्याद आणि अवैध उपसा सुरू आहे. वाट्टेल ते नदीत टाकले जातेय. याविरुद्ध कायदे नाहीत का, तर नक्की आहेत. पण त्याची अंमलबजावणी करणारी इच्छाशक्ती दुर्मिळ झाली आहे. भ्रष्ट यंत्रणेचा गाळ सातत्याने नद्यांमध्ये साचतो आहे. वानगीदाखल चंद्रपूर जिल्ह्याची सर्वांत जुनी वसाहत ज्या नदीच्या उगमस्थानाजवळ आढळली अशी ‘झरपट’ आणि आजही जी या महानगराची जीवनदायिनी आहे अशी ‘इरई’ नदी घेऊ या. आज रोजी त्यांची रया गेली आहे. उघड्या डोळ्यांनी परिसरातील जनता या नद्यांचे मरण पाहत आहे. वेकोलिच्या पद्मापूर मिनगाव, भटाळी, हिंदुस्थान लालपेठ आदी कोळसा खाणींचा गाळ इरईच्या पात्रात वाहून येतो आणि त्यामुळे इरई नदीचे अनेक ठिकाणी नाल्यात रूपांतर झाल्याचे भयाण चित्र आहे. एका न्यायालयीन याचिकेच्या चौकशीतूनच हे सत्य अधोरेखित झाले आहे. तर वेकोलि खाणीच्या दूषणांनी आणि शहरातील सांडपाण्याने ‘झरपट’चीही गटारगंगा झाली आहे. तरीही कुणालाच त्याचे काही वाटत नाही, हे तेथील जनतेच्या अगतिकतेचे लक्षण म्हणावे लागेल. इरई व झरपट नद्या कमालीच्या प्रदूषित झाल्याची चिंता व्यक्त करीत माजी खासदार नरेश पुगलिया यांनी शेवटी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. जिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार समिती गठित करावी लागली. समितीच्या अहवालात पद्मापूर मिनगाव, भटाळी, हिंदुस्थान लालपेठ आदी खाणींचा गाळ या नदीपात्रात येत असल्याचे स्पष्टपणे नमूद केले गेले. नद्या प्रदूषित होऊ न देण्याची जबाबदारी ज्या प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आहे, त्यांच्याच लेखी वेकोलि आणि अन्य उद्योगांच्या प्रदूषणाच्या रसाळ कहाण्यांचे ढिगारे पडले आहेत. ज्या नदीच्या आडोशाला गोंडराजाचे साम्राज्य उभे राहिले, अंचलेश्वरसारखे ऐतिहासिक मंदिर आणि त्या अनुषंगाने पुढे येणारी आख्यायिका, ज्याने या नगरीचा इतिहास लिहिला, त्या झरपटला इतके वाईट दिवस यावेत आणि त्याची साधी दखलही कुणी घेऊ नये? नागपूरची नाग नदी अशीच नाल्यात रूपांतरित झाली. पुण्यातही तेच होतेय. देशभरात अशीच स्थिती आहे. थोड्या फार फरकाने राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचा इतिहास असाच काहीसा आहे. कुठे नगरातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी नद्या दूषित करीत आहेत तर कुठे कारखान्यांतील रसायने या नद्यांना विषाक्त करीत सुटले आहेत. जड यंत्रांनी आणि अवैध मार्गाने वाळू उपसल्याने नद्यांचे कंबरडे मोडले आहे, तर दुसरीकडे गावोगावी वाळू माफिया उभे ठाकले आहेत. नदी प्रदूषित करण्याचे उरलेसुरले काम नदीकाठी वसलेले आधुनिक नागरिक पार पाडत आहेत. ‘निर्माल्य’ असे गोंडस नाव देऊन नद्यांमध्ये कचरा टाकला जात आहे. बिल्डर्स आपल्या सदनिका थेट नद्यांच्या पात्रात उभारत आहेत. त्यामुळे एकीकडे नद्यांचे नाले होत आहेत, तर पात्रात होत असलेले अतिक्रमण पाहून नद्याही (पावसाळ्यात) जोरदार मुसंडी मारत, अवैधपणे वसलेल्या घरांमध्ये ‘गंगा माय’ बनून नाचून जात आहे. मग पुढारी त्यांच्या मदतीला पुढे येतात आणि पूररेषा आणखी कमी करतात. यावर उपाय म्हणून शासनाने प्राधिकरणाची घोषणा केली आहे. शिवाय नदी पुनरुज्जीवनासाठी निधीची कमतरता भासू नये म्हणून ‘मिश्र वित्त पुरवठा’ धोरणही जाहीर केले, जे शासनाची दूरदृष्टी दर्शवते. ही योजना यशस्वी झाली तर खरोखर गंगेत घोडे न्हाऊन निघणार आहे. या प्राधिकरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे नेतृत्व खुद्द मुख्यमंत्री करणार आहेत. पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असतील. वित्त, जलसंपदा, उद्योग आणि ग्रामविकास यासारख्या संबंधित विभागांच्या मंत्र्यांचाही यात समावेश असल्याने, धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होणार आहे, अशी आशा करू या.

या मोहिमेसाठी सुरुवातीला १०० कोटी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मिळणारे २ हजार कोटी तसेच गौण खनिजातील १० टक्के वाटा यामुळे निधीचा ओघ सतत सुरू राहील. नद्यांच्या प्रदूषणाची ‘रिअल-टाईम’ माहिती देणारा ‘डॅशबोर्ड’ तयार करणे, हाही एक आधुनिक आणि पारदर्शी उपक्रम आहे. त्यामुळे प्रदूषण करणाऱ्या घटकांवर अंकुश राहील. स्थानिक समुदाय आणि भागधारकांना यात सामील करून घेणे, हेही या योजनेच्या प्रारूपाचे यश म्हणावे लागेल. जोपर्यंत सामान्य नागरिक आपल्या नदीशी जोडला जात नाही, तोपर्यंत ती प्रवाही आणि स्वच्छ होऊ शकत नाही. आयआयटी मुंबई, नीरी (नागपूर) आणि टेरी यासारख्या नामांकित संस्थांना ‘नोडल एजन्सी’ म्हणून सोबत घेणे, हे या मोहिमेला शास्त्रीय आणि तांत्रिक अधिष्ठान प्राप्त करून देणारे ठरू शकते. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर दिलेला भर हाही या समस्येच्या मूळ कारणावर घातलेला घाव आहे. पण शेवटी, जोपर्यंत आपण नद्यांच्या काठावरील अतिक्रमण हटवत नाही आणि सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करून नदीत सोडत नाही, तोपर्यंत कितीही निधी ओतला तरी तो ‘पाण्यात’ जाणार आहे, हेही समजून घेतले पाहिजे. मोजके अपवाद वगळता आपली समस्त नोकरशाही अशा लोककल्याणकारी योजना अपयशी ठरवण्यात फार कर्तबगार आहे हे मुख्यमंत्री महोदयांना माहिती आहेच, असे गृहीत धरू. नदीचे पुनरुज्जीवन म्हणजे ‘ड्रेजिंग’ किंवा ‘काँक्रिटीकरण’ नव्हे, तर नदीचा नैसर्गिक प्रवाह राखणे होय. नद्यांना ‘मोकळा श्वास’ घ्यायचा असेल, तर त्यांना मोकळी जागा द्यावी लागेल. नद्या प्रदूषित करणाऱ्या घटकांवर केवळ दंड नव्हे, तर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावे लागतील आणि त्यांना दंडित करावे लागेल. नद्यांची ‘पवित्रता’ केवळ भाषणात असून चालणार नाही, ती वाहत्या पात्रात दिसायला हवी. त्यांना श्वास घेता आला, तरच येणारी पिढी जिवंत राहील. अन्यथा, अस्थिविसर्जनासाठीही नद्यांचे पाणी उरणार नाही. ‘नदी मंच’ ही संकल्पना कागदावर न राहता लोकचळवळ व्हायला हवी. लोकसहभागाशिवाय कोणताही प्रकल्प यशस्वी होत नाही. नदी ही लोकमाता आहे, असे आपण मानतो. तिची सेवा करण्यासाठी केवळ शासनाचे प्रयत्न पुरेसे नाहीत, तर त्यास जनचळवळीची साथही आवश्यक आहे. लोकांचा प्रत्यक्ष सहभाग आणि शासनाची तत्परता तसेच नियोजित निधीचा योग्य विनियोग झाल्यास, येत्या काही वर्षांत महाराष्ट्रातील नद्या खरोखरच निर्मळ आणि प्रवाही होतील, अशी आशा करायला हरकत नाही.

## तंत्रवेध

# व्हॉट्सॲप हॅकिंग टाळण्यासाठी...

**डॉ. दीपक शिकारपूर**

मोबाईल फोन आणि इंटरनेट ही फार प्रभावी साधने आहेत. त्यांच्यातील छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे वापर केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च आणि वेळ वाचतो आणि वापरकर्त्याच्या ज्ञानातही भर पडते. या तंत्राचा वापर करून डिजिटल व्यवसाय करता येतो, पण त्यासाठी सायबर सुरक्षेचा कळीचा मुद्दा लक्षात घेणे जरुरीचे आहे. पूर्वी सुरक्षा ही फक्त भौतिक गोष्टींची गणली जायची. आता सायबर सुरक्षा आणि सर्व संगणकीय भांडवलाची तसेच माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब झाली आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात व्हॉट्स ॲप हे ॲप आपल्या दैनंदिन जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग बनले आहे. कुटुंबीयांशी संवाद साधणे, मित्रमैत्रिणींशी संपर्क ठेवणे, व्यावसायिक व्यवहार करणे किंवा सामाजिक कार्याचे नियोजन करणे या सर्व बाबी आपण या माध्यमातून सहज करतो. परंतु जशी तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतसे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामध्ये व्हॉट्स ॲप हॅकिंग हा एक गंभीर आणि चिंताजनक प्रकार आहे. अनेक लोकांना याबाबत पुरेशी माहिती नसल्यामुळे ते फसवणुकीचे बळी ठरतात. अलिकडे हे वारंवार घडत आहे. व्हॉट्स ॲप हॅकिंग म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या खात्यावर त्याच्या परवानगीशिवाय दुसऱ्या व्यक्तीने ताबा मिळवणे होय. हा ताबा मिळवण्यासाठी गुन्हेगार अनेक पद्धती वापरतात.

व्हॉट्स ॲप हॅकिंगची सर्वांत सामान्य पद्धत म्हणजे एकदाच वापरायचा संकेतांक (ओटीपी) मिळवणे. आपण व्हॉट्स ॲप सुरू करतो, तेव्हा आपल्या मोबाईल क्रमांकावर एक संकेतांक येतो. हा संकेतांक कुणालाही सांगायचा नसतो. परंतु काही फसवे लोक आपण बँकेचे अधिकारी, ओळखीचे मित्र किंवा सरकारी कर्मचारी असल्याचे भासवतात आणि तो संकेतांक मागतात. आपण विश्वास ठेवून तो दिला, की ते लगेच आपल्या खात्यावर ताबा मिळवतात. दुसरी एक महत्त्वाची पद्धत म्हणजे संगणकावरून व्हॉट्स ॲप वापरण्याच्या सुविधेचा गैरवापर. व्हॉट्स ॲप संगणकावरही वापरता येते. यासाठी मोबाईलमधून एक क्यूआर कोड (संकेतचिन्ह) स्कॅन करावे लागते. कुणी आपला मोबाईल काही क्षणांसाठी घेतला आणि हे संकेतचिन्ह स्कॅन केले, तर त्याला आपल्या संदेशांवर नियंत्रण मिळते. अनेक वेळा लोक सार्वजनिक ठिकाणी किंवा इतरांच्या संगणकावर ही सुविधा वापरतात आणि नंतर बाहेर पडायला विसरतात. त्यामुळे त्यांचे खाते इतरांकडे खुले राहते. तिसरी पद्धत म्हणजे मोबाईल क्रमांकाशी संबंधित फसवणूक. काही गुन्हेगार मोबाईल सेवा देणाऱ्या कंपनीला चुकीची माहिती देऊन एखाद्याच्या नावावरील क्रमांकाचे नवीन सिम कार्ड काढतात. एकदा त्यांच्याकडे आपला क्रमांक गेला की त्या आधारे व्हॉट्स ॲप पुन्हा सुरू करून आपल्या खात्यावर ताबा मिळवला जातो. हा प्रकार थोडा गुंतागुंतीचा असला तरी वाढत चालला आहे. आणखी एक बाब म्हणजे अनेक व्यक्ती आपले आधार आणि पॅनकार्ड सोशल मीडियावर ठेवतात. ही महत्त्वाची वैयक्तिक माहिती आपली खरी ओळख असते. ती चुकीच्या व्यक्तीच्या हाती गेली की आपली फसवणूक करणे सोपे होते. कारण आपली ओळख वापरून मोबाईल क्रमांक मिळवता येतो.

काही वेळा बनावट दुवे रचून किंवा हानिकारक अनुप्रयोग करूनही धोका निर्माण केला जातो. एखादा आकर्षक संदेश, बक्षीस जिंकल्याचे आमिष किंवा तातडीचा इशारा देणारा संदेश आपल्याला पाठवला जातो. तो उघडला की आपली वैयक्तिक माहिती चोरीला जाऊ शकते किंवा आपल्या मोबाईलमध्ये हानिकारक सॉफ्टवेअर येऊ शकते. व्हॉट्स ॲप हॅक झाल्यावर काही स्पष्ट लक्षणे दिसतात. आपले खाते अचानक बंद होते किंवा पुन्हा सुरू करण्यास सांगितले जाते. आपल्या खात्यावरून आपण न पाठवलेले संदेश आपल्या ओळखीच्या लोकांना जातात. काही वेळा मित्र किंवा नातेवाईक फोन करून ‘तुम्ही पैसे का मागत आहात’ असे विचारतात. तसेच आपल्या खात्याला अनोळखी संगणक किंवा उपकरण जोडलेले दिसते. ही सर्व चिन्हे दिसल्यास लगेच कारवाई करणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत घाबरून न जाता तत्काळ उपाय योजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे खाते पुन्हा सुरू करावे. संकेतांक टाकल्यावर दुसऱ्या व्यक्तीचा प्रवेश आपोआप बंद होतो. त्यानंतर दोन स्तरांची सुरक्षा (दोन टप्प्यांची पडताळणी) सुरू करावी. यामुळे एक अतिरिक्त गुप्त क्रमांक ठेवता येतो आणि खाते अधिक सुरक्षित होते. तसेच आपल्या खात्याशी जोडलेली सर्व उपकरणे तपासून अनोळखी उपकरणे काढून टाकावीत. आपल्या सर्व संपर्कांना लगेच माहिती द्यावी की खाते काही काळासाठी धोक्यात होते, त्यामुळे कुणीही पैसे किंवा माहिती देऊ नये. मोबाईल क्रमांकाबाबत शंका असेल, तर मोबाईल सेवा देणाऱ्या कंपनीशी तातडीने संपर्क साधावा आणि तक्रार नोंदवावी.

व्हॉट्स ॲप हॅकिंग टाळण्यासाठी काही साधे पण प्रभावी उपाय आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या मोबाईलवर येणारा संकेतांक कोणालाही देऊ नये. अनोळखी दुवे उघडू नयेत. फक्त अधिकृत ठिकाणाहूनच अनुप्रयोग स्थापित करावेत. मोबाईलला सुरक्षित कुलूप ठेवावे. नियमितपणे सुरक्षा तपासणी करावी. भारतामध्ये सायबर गुन्ह्यांविरुद्ध तक्रार नोंदवण्यासाठी नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल ही अधिकृत व्यवस्था उपलब्ध आहे. येथे ऑनलाईन तक्रार करता येते. तसेच १९३० या क्रमांकावर फोन करून मदत मिळवता येते. जवळच्या सायबर पोलिस ठाण्यात जाऊनही तक्रार नोंदवता येते. तक्रार करताना आवश्यक कागदपत्रे, संदेशांचे छायाचित्र, व्यवहाराची माहिती देणे उपयुक्त ठरते. कायद्याच्या दृष्टीने हा गुन्हा गंभीर आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार ओळख चोरी, फसवणूक आणि बनावट ओळख वापरणे या गुन्ह्यांसाठी शिक्षा होऊ शकते. भारतीय दंड संहितेनुसारही फसवणुकीसाठी कठोर कारवाई केली जाते. त्यामुळे अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींना दंड आणि कारावास भोगावा लागू शकतो. आजच्या काळात तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि जागरूकता अत्यंत आवश्यक झाली आहे. अनेक वेळा लोक अज्ञानामुळे किंवा निष्काळजीपणामुळे फसतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण भागातील लोक आणि नव्याने तंत्रज्ञान वापरणारे लोक अधिक धोक्यात असतात. त्यामुळे समाजात सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने सर्वप्रथम एक बाब लक्षात घेतली पाहिजे की अगदी आदिम काळापासून कोणताही समाज किंवा संस्कृती गुन्हेगारीपासून कधीच पूर्णतः मुक्त नव्हती आणि यापुढेही नसेल. त्यामुळे (कोणत्याही प्रकारच्या) गुन्ह्यांचे स्वरूप व ते मुळात का केले जातात याचा विचार (प्रतिबंधक उपायांबरोबर) करावाच लागेल. तंत्रज्ञान वापरून आर्थिक गुन्हे करायचे अनेक नवीन मार्ग सायबर गुन्हेगार शोधत आहेत. इंटरनेट तंत्रज्ञानाला भौगोलिक सीमा नसल्याने असे गुन्हे उघडकीला आणणे पोलिसांसाठी अवघड ठरते. यामुळेच सायबर गुन्हे टाळण्याचे प्रयत्न जास्त महत्त्वाचे ठरतात. शेवटी असे म्हणता येईल की, व्हॉट्सॲप हॅकिंग हा एक टाळता येण्यासारखा धोका आहे. थोडी जागरूकता, सावधगिरी आणि योग्य वेळी केलेली कृती यामुळे आपण स्वतःला सुरक्षित ठेवू शकतो. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास ते आपल्यासाठी मोठे साधन ठरते, परंतु दुर्लक्ष केल्यास तेच संकट निर्माण करू शकते. त्यामुळे प्रत्येकाने सजग राहून सायबर सुरक्षिततेचे नियम पाळणे ही काळाची गरज आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

# सेंद्रिय शेतीसाठी गोवंशाचे संरक्षण

**नीलेश जोशी**

*‘गोमय, गोमूत्र मिळवून रात्रंदिसं, कायम होता भूमिचा कस ।*
*पेवे भरती गावागावास, धान्याची तेंव्हा ॥’*

ग्रामगीतेतील १५ व्या अध्यायातील ही १० वी ओवी. गोवंशामुळे भूमीचा कस कायम होता, सर्वत्र धनधान्याची समृद्धी होती या अर्थाच्या या ओव्या आहेत. कृषी आधारित ग्रामव्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था हे आपल्या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्यच नव्हे, तर आमच्या व्यवस्थेचा आत्मा आहे. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेचा १५ वा अध्याय गाय व गोवंशाचे महत्त्व सांगण्याकरिता खर्ची घातला.

*‘भारत कृषिप्रधान देश, शेतीसाठी हवा गोवंश,*
*गोरसा इतुका नसे सत्वांश, अन्यत्र शुद्ध’*

असेही याच १५ व्या अध्यायात वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अधोरेखित करतात. मात्र संत वचनाकडे आपण दुर्लक्ष करतो हेच खरे. कारण गत अनेक वर्षांपासून गोवंशाच्या संख्येत सातत्याने होणारी घट ही कुणालाही चिंतेची वाटत नाही. २१ व्या पशुगणनेची पूर्ण आकडेवारी अद्याप समोर आली नसली, तरी २० व्या पशुगणनेत देशी गायींची संख्या ४६ लाख १३ हजार ६३२ तर बैलांची संख्या ४७ लाख ७० हजार ९४३ इतकी होती. म्हणजे राज्यात एकूण गोवंशाची संख्या ९३ लाख ८४ हजार ५७४ इतकी नोंदविली गेली.



दुर्दैवाने १९ व्या पशुगणनेच्या आकडेवारीच्या तुलनेत २० व्या पशुगणनेत देशी गोवंशाच्या संख्येत तब्बल २४ लाख गोवंशाची घट नोंदविण्यात आली. टक्केवारीनुसार ही घट सुमारे २० टक्के इतकी आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पुढील काही दिवसात घोषित होणाऱ्या २१ व्या पशुगणनेत देशी गोवंश आणखी कमी झाला असण्याची शक्यता आहे. ही घट केवळ आकडेवारी नव्हे तर शेती, पर्यावरण आणि आपल्या सांस्कृतिक मुळांवर घाला आहे, असेच म्हणावे लागेल. एकीकडे गोवंशाची संख्या दिवसेंदिवस कमी होत असतानाच दुसरीकडे रासायनिक शेतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अन्नधान्याच्या मुबलकतेसाठी १९६० च्या दशकात हरित क्रांती करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणात रासायनिक खतं, कीटकनाशके यांचा वापर करण्यात आला. पुढे अधिकाधिक उत्पन्नाच्या हव्यासातून हा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आणि त्यातून विविध प्रश्न आता समोर उभे राहिले आहेत. शेतातील मातीची घसरलेली पोत, पाण्याचे प्रदूषण, शेती उत्पादनातून मिळणाऱ्या अन्नातील रासायनिक अंश आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या असे एका ना अनेक प्रश्न रासायनिक शेतीमुळे मानवासमोर निर्माण झाले आहेत. मुख्यतः वैद्यकशास्त्रासमोर दररोज नवनवीन आजारांची भर पडत असल्याचे दिसून येते. राज्यातच नव्हे, तर देशभरात वाढणारा कर्करोग, मधुमेह, स्थूलता, हार्मोनल असंतुलन या आजारांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होतो आहे. या सर्व समस्येचे मूळ फळ-भाज्या व शेतीतून निर्माण होणाऱ्या अन्नघटकात आढळणारे कीटकनाशकांचे अवशेष असल्याचे निरीक्षण वैद्यकीय तज्ज्ञांनी वारंवार नोंदविले तर यावर विषमुक्त अन्न हा एकमेव पर्याय असल्याचेदेखील स्पष्ट मत अनेकांनी व्यक्त केले आहे. एकीकडे मानवी जीवनाला घातक विषाक्त अन्न तर दुसरीकडे रासायनिक शेतीमुळे देशातील जमिनीची खालावत असलेली पोत हाही गंभीर प्रश्न कृषी तज्ज्ञांसमोर उभा ठाकला आहे. एकंदरीतच शेती-माती आणि मानवासमोर भस्मासुर म्हणून उभ्या असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे ही विषमुक्त शेतीद्वारे मिळू शकतात. त्यासाठी सेंद्रिय शेती या शिवाय दुसरा मार्ग नाही. सेंद्रिय शेती आणि त्यातही मुख्यतः गोवंश आधारित शेतीकरिता गोवंश संरक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते. मात्र, गत काही काळापासून सतत कमी होणारा गोवंश, वाढत असलेले रासायनिक खत आणि कीटकनाशकांचे प्रमाण ही भविष्यात धोक्याची घंटा ठरू शकते. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस सरकारने या पूर्वीच हा धोका ओळखून देशी गोवंशाचे संरक्षण, संवर्धन व्हावे म्हणून गोवंश हत्या बंदी कायदा केला आहे. पण ज्यांना जिभेचे चोचले पूर्ण करायचे असतात असा एक समुदाय गोवंश हत्या बंदी कायद्याला सतत धार्मिक रंग देतो. स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणविणारे राजकीय पक्ष दूरगामी परिणामांचा विचार न करता केवळ गठ्ठा मतांच्या लालसेपोटी गोवंशाची कत्तल करणाऱ्या समाजाचे समर्थन करतात, हे दुर्दैवच नव्हे का? शेतीतील मातीचे प्रदूषण थांबविण्यासाठी, विषमुक्त अन्नाच्या उत्पादनासाठी सेंद्रिय शेतीशिवाय पर्याय नाही. सेंद्रिय शेतीकरिता गोवंशा शिवाय पूर्णत्व नाही. म्हणूनच देशी गोवंशाचे संरक्षण, संवर्धन ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# ‘ऑपरेशन झाडू’मुळे केजरीवाल गलितगात्र

**श्यामकांत जहागीरदार**

राघव चड्ढा यांच्या नेतृत्वात आम आदमी पक्षामधील (आप) सात राज्यसभा सदस्यांचा एक गट मागील आठवड्यात भाजपात विलीन झाला. या घटनेमुळे आप तसेच आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना धक्का बसणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रात ऑपरेशन टायगरची चर्चा जोरात असताना भाजपाने दिल्लीत ऑपरेशन झाडू घडवून आणले. या ऑपरेशन झाडूची कुणकुणही भाजपाने कोणाला लागू दिली नाही. सर्व जण पूर्णपणे बेसावध असताना भाजपाने गनिमी काव्याने ते घडवून आणत आपले राजकीय कौशल्य दाखवून दिले आहे.

उत्पादन शुल्क घोटाळ्यात केजरीवाल दिल्ली उच्च न्यायालयात आपली बाजू स्वत:च मांडत असताना म्हणजे स्वत:चीच वकिली करत असताना आपच्या या सदस्यांनी त्यांना गुंगारा दिला आणि पक्षाला रामराम ठोकला. त्यातील सहा राज्यसभा सदस्य पंजाबमधील तर एक दिल्लीतील आहे. त्यामुळे या घटनेचा राजकीय परिणाम दिल्ली, गोवा, पंजाब आणि गुजरात या चार राज्यांतील आपच्या अंतर्गत राजकीय घटनाक्रमावर होणार आहे. राघव चड्ढा, स्वाती मालिवाल, संदीप पाठक, हरभजनसिंग, अशोक मित्तल, राजेंद्र गुप्ता आणि विक्रम सहानी हे आपचे सात राज्यसभा सदस्य पक्षातून बाहेर पडले. आपमध्ये आता संजयसिंह, एन. डी. गुप्ता आणि बलबीरसिंह सिचेवाल असे इनमीन तीन सदस्य उरले आहेत. स्वाती मालिवाल आणि राघव चड्ढा हे आपवर नाराज असल्याची माहिती होती. त्यामुळे ते कोणत्याही क्षणी आप सोडतील, हे नक्की होते, पण खासदारकी टिकवण्यासाठी या दोघांनी पक्ष सोडणे पुरेसे नव्हते. त्यामुळे आवश्यक संख्याबळ गोळा करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यात आपचे आणखी पाच खासदार भाजपाच्या गळाला लागले. काही दिवसांपूर्वीच आपने राघव चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरुन हटवून त्यांच्या जागी अशोक मित्तल यांची नियुक्ती केली होती. गंमत म्हणजे चड्ढा यांच्यासोबत मित्तल यांनीही आपला रामराम ठोकला. मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर केजरीवाल दिल्लीत बेघर झाले होते. त्यांच्याजवळ राहायला घरही नव्हते. त्यामुळे दिल्लीत वणवण फिरत ‘कुणी घर देता का घर’ अशी याचना ते करत होते. अशोक मित्तल यांनी त्यांना राज्यसभा सदस्य म्हणून मिळालेला बंगला केजरीवाल यांना राहायला दिला होता. केजरीवाल यांचे आतापर्यंतचे वास्तव्य याच बंगल्यात होते. तर अशा या मित्तल यांनी आप सोडत केजरीवाल यांना चांगलाच ‘घरचा अहेर’ केला, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.



स्वाती मालिवाल तर बऱ्याच महिन्यांपासून आपपासून दूर झाल्या होत्या. केजरीवाल यांचे स्वीय सचिव विभवकुमार यांनी स्वाती मालिवाल यांना केजरीवाल यांच्या उपस्थितीत बदडून काढले होते, त्यांच्या अंगावर हात घातला होता. ही घटना तेव्हा खूप गाजली होती. कधी काळी केजरीवाल यांचे लाडके असलेले राघव चड्ढाही आपपासून फटकून राहत होते. पक्षांतर बंदी कायद्यानुसार किमान दोन तृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले तर सदस्यत्व रद्द होत नाही. राज्यसभेत आपचे दहा सदस्य होते. यातील दोन तृतीयांश म्हणजे सात सदस्य भाजपात आल्यामुळे पक्षांतर बंदी कायद्यातून या सर्वांची सुटका झाली. राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन् यांनी आप सदस्यांच्या या गटाच्या भाजपातील विलीनीकरणावर शिक्कामोर्तब केल्यामुळे हा विषय आता कायमस्वरूपी निकालात निघाला आहे. आपने या सात सदस्यांना पक्षांतर बंदी कायद्यानुसार अपात्र ठरवण्याची विनंती राधाकृष्णन् यांना केली होती, पण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असल्यामुळे त्यांनी ती फेटाळून लावली. त्यामुळे आपसमोर हात चोळत बसण्याशिवाय काही पर्याय उरला नाही. नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी आपल्या मास्टर स्ट्रोकने त्यांचे गर्वाचे घर खाली उतरवले आणि एकाच दगडात अनेक पक्षीही मारले. आपचे लोकसभेत फक्त तीन खासदार आहेत, हे सर्व पंजाबमधून निवडून आले आहेत. राज्यसभेपाठोपाठ आपच्या लोकसभेतील सदस्यांनीही केजरीवाल यांना नजीकच्या काळात रामराम केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. भाजपा नेत्यांच्या मनात येईल, त्या दिवशी लोकसभेतून आपचे नामोनिशाण मिटू शकते. लोकसभेत दोन तृतीयांश म्हणजे आपच्या तीनपैकी दोन खासदारांनीच पक्ष सोडण्याची गरज आहे. जे भाजपच्या नेत्यांसाठी दोन मिनिटांचेही काम नाही.

ऑपरेशन झाडूचा सर्वाधिक परिणाम पंजाबवर होणार आहे. सध्या देशातील एकमेव राज्यात म्हणजे पंजाबमध्ये आपचे सरकार आहे. राज्यसभेच्या सात खासदारांनी आप सोडल्यामुळे पंजाबमधील मान सरकार अस्थिर होण्याची शक्यता बळावली आहे. केजरीवाल आणि मान यांच्यासमोर पंजाबमधील आपले आमदार एकत्रित ठेवण्याचे, त्यातील कोणी फुटणार नाही, याची काळजी घेण्याचे आव्हान उभे झाले आहे. दिल्लीतही आपचे २२ आमदार आहेत. दिल्ली आपमधील आमदारांचा मोठा गटही आप सोडून भाजपात आला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यामुळेच आपच्या सदस्यांनी विश्वासघात केल्याची प्रतिक्रिया केजरीवाल यांनी, तर पक्ष सोडणारे आपचे खासदार गद्दार असल्याची प्रतिक्रिया पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी व्यक्त केली. पुढील वर्षी पंजाब आणि गुजरात विधानसभेची निवडणूक आहे. पंजाबमध्ये दुसऱ्यांदा आप सत्तेवर येण्याची शक्यता या ताज्या घटनाक्रमामुळे मावळण्याची स्थिती निर्माण झाली आहे. गोवा आणि गुजरातवर आपने लक्ष केंद्रित केले होते. भाजपासमोर आव्हान निर्माण केले होते. आता या दोन राज्यांत आप पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकत नाही. आपने आत्मविश्वास पूर्णपणे गमावला आहे. आपच्या नेत्यांचे मनोधैर्य पूर्णपणे खचले आहे. २०२२ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत आपमधील कर्तेधर्ते संदीप पाठक होते. आपचे उमेदवार निश्चित करण्यापासून प्रचारापर्यंतची सर्व व्यूहरचना पाठक यांनी आखली होती आणि यशस्वी करून दाखवली होती. राघव चड्ढा हे तेव्हा आपच्या प्रचाराचा केजरीवालांखालोखालचा मुख्य चेहरा होते. त्यामुळे पंजाबमध्ये आपला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदासाठी राघव चड्ढा यांच्या नावाचीही चर्चा झाली होती. पंजाबमधील आपचे सर्व आमदार संदीप पाठक यांच्या संपर्कात पहिलेपासून आहे. यावरून पंजाबमधील भगवंत मान यांचे सरकार कसे डायलिसिसवर आहे, याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. यामुळेच दुखावलेल्या मान सरकारने पक्ष सोडलेल्या आपच्या सहाही खासदारांची सुरक्षा काढून घेत त्यांना वाऱ्यावर सोडले. हरभजनसिंगच्या निवासस्थानासमोर निदर्शने करणाऱ्या आपच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखण्याचाही प्रयत्न केला नव्हता. या खासदारांच्या जिवाला धोका पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे या सर्व खासदारांना केंद्र सरकारला सीआरपीएफची वाय दर्जाची सुरक्षा उपलब्ध करून द्यावी लागली. आपचे सात राज्यसभा सदस्य भाजपात आल्यामुळे राज्यसभेतील भाजपाच्या सदस्यांची संख्या ११३ झाली आहे. तर राज्यसभेतील रालोआच्या सदस्यांची संख्या १४८ वर गेली आहे. यामुळे २४५ सदस्यांच्या राज्यसभेत भाजपाचे नसले तरी रालोआचे स्पष्ट बहुमत झाले आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य नितीन नवीन यांनीही राज्यसभा सदस्यत्वाची नुकतीच शपथ घेतली. बिहारमध्ये भाजपाच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेतली, तर राज्यसभेत भाजपाचे संख्याबळ वाढले, हा बिहारच्या असलेल्या नितीन नवीन यांचा पायगुण म्हणायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### भगवान नृसिंह अवतार म्हणजे अधर्मावर धर्माचा विजय



भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ३० एप्रिल रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं, मीच ईश्वर आहे. सर्वांनी माझंच नाव घ्यावं. त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त होता. जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी ईश्वर आहे, अशी त्याची श्रद्धा होती. हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो, तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो, असे श्रीकृष्ण वचन आहे. आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे. दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी हे ईश्वरा खरंच अवतार घे आणि तुझ्या वचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि नांदू दे शांती या भारत वर्षात...!

**रमा देशमुख**/नागपूर


### लहानपण देगा देवा...

पृथ्वीतलावर प्रत्येक व्यक्ती हा आपआपल्या परीने वेगवेगळ्या गोष्टींमध्ये आनंद शोधत असतो आणि तोच आनंद इतरांना वाटतो तर काही एकटेच आनंद घेऊन मनमुराद जगतात. माझ्यावर लहानपणापासून कौटुंबिक जबाबदाऱ्या पडल्याने बालपणाचा आनंद मी घेऊ शकलो नाही. पण आता मी प्रत्येक लहानग्यात माझे बालपण शोधून त्याचा मनमुराद आनंद घेतो. आम्ही राहतो त्या गृहनिर्माण सोसायटीमध्ये जवळपास ५० वेगवेगळ्या गटातील लहान मुले-मुली राहतात. प्रत्येक सुट्टी दिवशी ही लहानगे विविध प्रकारचे खेळ खेळत असतात. तेव्हा मीसुद्धा त्यांच्यामध्ये सहभागी होतो. त्यांचे सर्वांचे खेळून झाल्यानंतर प्रत्येक वेळेला माझ्याकडून काहीतरी गोड खाऊ त्यांना देत असतो तर कधी स्वतःच्या वयाचा विचार करता ते जेव्हा खेळत असतात, तेव्हा त्यांच्यामध्ये सहभागी न होता त्यांचे खेळणे - बागडणे यांचा आनंद वेचत राहतो. माझी व त्या सर्व लहानग्यांची मैत्री एवढी घट्ट झाली आहे. की, मला त्यांनी बाहेर कुठेही पाहिले तर ते धावत येतात आणि माझ्यापुढे हात करून हसतात. तेव्हा त्यांना जो खाऊ पाहिजे तो त्यांच्या हातावरती ठेवून मी पुढील कामासाठी सरसावतो. खरंच लहानपण छान असते. ना जबाबदारी, ना ताणतणाव, ना त्रास, ना जीवघेणी स्पर्धा; ज्यावेळी माझ्या नजरेस प्रत्येक लहान बालक पडते, तेव्हा माझा चेहरा आनंदून जातो. त्या वेळेला मी ईश्वरास प्रार्थना करून म्हणतो की, लहानपण देगा देवा...

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

### ग्रामविकासासाठी झटणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी भजन-कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ‘ग्रामगीता’ या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी-हिंदीमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे मुख्य वैशिष्ट्ये होते. ते आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज त्यांचे गुरू. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी देशभर आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन ते करीत. जपानसारख्या देशातही विश्वबंधूचा संदेश दिला. आते है नाथ हमारे हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते. भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उधार कसा होईल, याविषयी त्यांनी चिंता व्यक्त केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीचा त्यांना पुरेपूर कल्पना होती.



त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूत स्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे, त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. ग्रामगीता ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना ११७ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन।

**प्रा. मधुकर चुटे** /९४२०५६६४०४

# योजनांचा लाभ प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचवणार

### सभापती संस्कृती सातपुते यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल**



जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग गरीब, गरजू, वंचित घटक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच दिव्यांगांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीच्या समन्वय बैठकीत सभापती संस्कृती सातपुते यांनी दिली.

जिल्हा परिषद मुख्यालयातील शिवरत्न सभागृहात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी समाजकल्याण समिती सदस्य तथा जिल्हा परिषद सदस्य सुप्रिया गायकवाड, सिंधु आलदर, करुणा शिवशरण, सविता उंबरजे, श्रुती भोरगुंडे, तेजस्विनी बोराडे, शिवानी स्वामी, प्रशांत पाटील, नंदकुमार वाघमारे यांच्यासह प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, तसेच जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी उपस्थित सर्व सदस्यांचा सभापतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर विविध योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली.

बैठकीत २०२५-२६ या आर्थिक वर्षातील २० टक्के मागासवर्गीय कल्याण योजना व ५ टक्के दिव्यांग कल्याण योजना यांना २०२६-२७ या वर्षात मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच २०२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकानुसार विविध योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली. अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत काही कामांमध्ये बदल तसेच वस्ती बदल प्रस्तावांना मान्यता दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यासाठी जिल्हा परिषद सेस निधीतून आवश्यक तरतूद करण्यास मंजुरी दिली.

> समता सप्ताहाचे जिल्हास्तरीय बारकाईने नियोजन केल्याबद्दल सभापती सातपुते यांनी समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, कार्यालयीन अधीक्षक सचिन सोनकांबळे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले. तालुका स्तरावरही उत्कृष्ट वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्याचे नमूद केले. स्पर्धांचे व्हिडिओ, छायाचित्रे व यशोगाथा तातडीने सादर करण्याच्या सूचना दिली.

बैठकीदरम्यान शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित जाती वस्तीगृहे, वृद्धाश्रम, तसेच मागासवर्गीय व वंचित घटकांच्या वस्त्यांच्या विकासासंदर्भातील कामंचा आढावा घेण्यात आला. अधिकारी व सदस्यांनी सूचना मांडल्या. समता पंधरवडा कार्यक्रमांतर्गत सामाजिक समतेचा संदेश पोहोचवणार असल्याचे सांगण्यात आले. जिल्हास्तरावर इयत्ता ७ वी ते १२ वीमधील विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करणार असल्याचे सांगण्यात आले. बैठकीत जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी विषयपत्रिकेवरील सर्व बाबींचा सविस्तर आढावा सादर केला. योजना निहाय माहिती मनोज म्हेत्रे व स्वाती गायकवाड यांनी दिली.

## महत्वाचे...



### मोडनिंबमध्ये नियमित पाणीपुरवठा, पथदिवे सुरू ठेवण्याची मागणी

**मोडनिंब, दि. २९ एप्रिल-**

मोडनिंब (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ देवस्थान यात्रेमुळे गावात भाविक व पाहुण्यांची मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे पाण्याचा वापर वाढला असून नागरिकांना गैरसोय होऊ नये, नियमित वेळेवर पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच यात्रेदरम्यान रात्रीच्या वेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व पथदिवे सुरू ठेवावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात प्रथमेश शिंदे यांनी ग्रामपंचायतीकडे निवेदन देऊन प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी विनंती केली आहे. या संदर्भात ग्रामविकास अधिकारी कांबळे यांना निवेदन देण्यात आले असून प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी किरण तोडकरी, रोटरी क्लबचे अध्यक्ष निलेश आप्पा गिड्डे, ग्रा. प. कर्मचारी संघटनेचे अरुण सुर्वे, ईश्वर हगे उपस्थित होते.



### वक्तृत्व स्पर्धेत वैष्णवी इंगोले तालुक्यात प्रथम

**सांगोला, दि. २९ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती, सांगोला येथील शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेची इ.९ वीमधील विद्यार्थिनी वैष्णवी इंगोले हिने प्रथम क्रमांक मिळवत रोख ११ हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. तिला शिक्षक उन्मेश आटपाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चारुदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, प्रदीप धुकटे, काकासो नरुटे यांनी अभिनंदन केले.

### शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनांना प्राधान्य देण्याचा निर्धार : दीपक वैद्य

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

जिल्हा परिषदेअंतर्गत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त वैयक्तिक लाभाच्या योजना उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक विचार सुरू आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी दिली.शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. कृषी विकास, सिंचन सुविधा, शेतीपूरक व्यवसाय, पशुसंवर्धन, कृषी अवजारे तसेच आर्थिक मदत आदी योजनांच्या समावेशाबाबत नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील शेतकरी सक्षम व्हावा, उत्पादन खर्च कमी व्हावा आणि उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी जिल्हा परिषद स्तरावर ठोस पावले उचलली जात आहेत. पात्र लाभार्थ्यांना पारदर्शक पद्धतीने योजनांचा लाभ मिळावा यासाठीही कटिबद्ध असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषद शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय अग्रक्रमाने हाताळत असून आगामी काळात अधिकाधिक योजना राबविण्याचे संकेत वैद्य यांनी दिले.

## १५ मे रोजी झेडपीची पहिली सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल**

जिल्हा परिषद निवडणुकीनंतर नवनियुक्त सदस्यांची पहिली विशेष सर्वसाधारण सभा १५ मे रोजी आयोजित केली आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर विषय समिती सभापती तसेच सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता ही पहिली सर्वसाधारण सभा होत आहे..

जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच भारतीय जनता पक्षाने ३८ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले आहे. त्यामुळे बहुमताच्या जोरावर विकासकामे, प्रलंबित विषय तसेच विविध धोरणात्मक निर्णयांना गती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.या सभेत विविध विभागांतील कामकाजाचा आढावा, विकास आराखडे, निधी वितरण, प्रलंबित प्रस्ताव तसेच आगामी योजनांबाबत चर्चा होण्याची अपेक्षा आहे. नव्या सदस्यांची ही पहिली सभा असल्याने जिल्हा परिषद प्रशासनाची दिशा आणि आगामी कारभाराचे संकेत या बैठकीतून मिळणार आहेत.

## पंढरपूर येथे आजपासून धनश्री प्रवचनमाला

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. २९ एप्रिल-**

पंढरपूर येथे धनश्री, सिताराम व आष्टी परिवाराच्या वतीने धनश्री प्रवचनमालाचे आयोजन केले आहे. आज गुरुवार दि. ३० एप्रिल ते सोमवार दि. ४ मे रोजी सायं. ६ ते ८ या वेळेत आरती मंडप मनमाडकर, एलआयसी ऑफिस समोर, पंढरपूर येथे आयोजन केल्याची माहिती धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा.शिवाजीराव काळुंगे यांनी दिली.

प्रवचनमालेत श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री संत माणकोजी बोधले महाराज यांचे वंशज ह.भ.प.डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज बोधले (धामणगावकर) हे सखा माझा ज्ञानेशर या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. संत हे आपल्या





जीवनातील संस्काराचे, सात्त्विकेतचे, समन्वयाचे प्रतीक आहेत. मनाच्या मशागतीसाठी आणि धैर्यप्राप्तीसाठी संतांनी आपले विचारधन दिले. हा संतविचार आपला जीवनमार्ग झाला की जगणे सुसह्य आणि आनंदाचे होते. हाच संत विचारांचा श्रवणीय ठेवा अनुभवण्याचा योग माऊली संत ज्ञानेशर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्ताने येत आहे. सखा माझा ज्ञानेशर या विषयावर संत माणकोजी महाराज बोधले यांचे वंशज ह. भ. प. डॉ. श्रीगुरू जयवंत महाराज बोधले (धामणगावकर) यांच्या सुश्राव्य वाणीतून ५ दिवस प्रवचने ऐकण्याचा योग धनश्री परिवाराने घडवून आणलेला आहे. मानवाने आपल्या जीवनात संतांचे विचार अंगीकारावेत, त्यांचे साहित्य व अभंग मनापासून श्रवण करावे आणि त्यातून आत्मविकास साधावा, ही या कार्यक्रमामागची प्रेरणा आहे. तात्त्विक विचारांपासून ते जीवनाच्या सहज वास्तवाशी जोडणार्या या प्रवचनातून प्रत्येकाला नवी दिशा मिळणार आहे. तरी सर्वांनी या प्रवचनमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक धनश्री सिताराम व आष्टी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## वठारे यांच्याकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भुजबळ यांचा पदभार

### जिल्हा परिषदेचे सीईओंचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल**

जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे जिल्हा दिव्यांग अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार असलेले ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी दिव्यांग विभागाचा पदभार सोडताच या विभागाची जबाबदारी आता योजना शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी यासंदर्भात आदेश दिले.



समाज कल्याण विभागापासून दिव्यांग सक्षमीकरण विभाग वेगळा झाल्यानंतर पहिल्यांदा या विभागाचा अतिरिक्त पदभार तत्कालीन समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांच्याकडे देण्यात आला होता. त्यानंतर दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी काही काळ या विभागाचा कारभार पाहिला. दरम्यान, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी या विभागाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भुजबळ यांच्याकडे दिली होती. दिव्यांग विभागाच्या शाळांची पट पडताळणी, नोंदणी तपासणी आदी कामे भुजबळ यांनी पार पाडली आहेत.



सध्या मुख्यमंत्री समृद्ध ग्राम अभियानाची गुणवत्ता तपासणी सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील गावे तपासण्यासाठी लातूर जिल्हा परिषदेचे पथक येत आहे तर सोलापूरचे पथक लातूर जिल्ह्यातील गावांची तपासणी करण्यासाठी जाणार आहे. याची भुजबळ यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. यातून वेळ मिळणार नसल्याने जिल्हा दिव्यांग सक्षम अधिकारी या अतिरिक्त पदभारातून मुक्त करण्याची मागणी भुजबळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जैन यांच्याकडे केली होती. भुजबळ यांची ही मागणी मान्य करीत जैन यांनी जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार योजना शिक्षणाधिकारी वठारे यांच्याकडे देण्याचा निर्णय घेतला आहे. वठारे सध्या रजेवर असून येत्या सोमवारी त्या पदभार घेतील, असे सांगण्यात आले.

## जिल्ह्यात आशा सेविकांचे लॉगिन अभियान सुरू

### आयुष्मान मोहिमेला मिळाले नवे बळ

### आयुष्यमान भारत कार्ड सर्व लाभार्थ्यांना देणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थ्यांचे ई-केवायसी काम वेगाने पूर्ण करण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील आशा सेविकांचे ऑपरेटर लॉगिन सुरू करण्याची विशेष मोहीम हाती घेतली आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या दालनात झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार ही कार्यवाही सुरू आहे. आयुष्मान कार्ड आधिकाधिक लाभार्थ्यांना देण्यासाठी आशा सेविकांचा सहभाग निर्णायक ठरणार आहे. त्यामुळेच प्रत्येक गावात लाभार्थ्यांशी थेट संपर्क असलेल्या आशा सेविकांना ऑपरेटर आयडी उपलब्ध करून देणार आहेत. या लॉगिनद्वारे त्या लाभार्थ्यांचे आधार पडताळणीसह ई-केवायसी करून आयुष्मान कार्ड प्रक्रिया पूर्ण करू शकतील. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांना घराजवळच सेवा उपलब्ध होणार आहे.

तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व आशा सेविकांना याबाबत माहिती देऊन नियोजित वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यास सांगण्यात आले आहे. लॉगिन प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी आवश्यक नियोजन आणि मार्गदर्शन करण्याचे आदेशही दिले आहेत. प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करणार आहे. त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर भर देणार आहे. अडचण निर्माण झाल्यास तातडीने जिल्हा आरोग्य कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश फोपुरवाड यांनी या मोहिमेला प्राधान्य देत सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश दिले आहेत.

## अभियंता तरुणीची पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या

### मड्डीवस्ती येथील दुपारची घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका २४ वर्षीय अभियंता तरुणीने बेडरूम मधील छताच्या पंख्याला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानीपेठ परिसरातील मड्डीवस्ती येथे बुधवारी (दि.२९) ३ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. श्वेता जगदीश चव्हाण (वय २४ वर्ष रा.मड्डीवस्ती भवानी पेठ, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणीचे नाव आहे. तिने घरातील बेडरूममधे असलेल्या छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे बुधवारी दुपारी तीन वाजता घरच्यांना आढळून आले. हा प्रकार पाहिल्यानंतर तिच्या आई-वडिलांनी विळीने साडी कापून तिला फासातून सोडवले.आणि बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी पाच वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मयत श्वेता चव्हाणचे वडिल व्यवसाय करतात. घटनेच्या वेळी तिचे आई -वडील घराबाजूस बांधकामावर पाणी मारण्यास गेले होते. तिच्या पश्चात आई - वडील ,एक भाऊ , एक विवाहित बहीण असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली .



## आत्मशुद्धीच्या दिव्य तेजाने उजळलेली डब्ल्यूआयटी जैन टेंपलची पावन पहाट

### वीरसिन्धु ससंघांचा मंगल विहार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

अतिशय प्रसन्न सकाळ, पवित्रता आणि भावभक्तीने ओथंबलेली शुभ पहाट अशा मंगलमय वातावरणात वीरसिन्धु ससंघांचा डब्ल्यू. आय. टी. जैन टेंपल येथून बाहुबली मंदिर (विजापूर रोड) कडे बुधवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजत भक्तिभावाने पायी मंगल विहार झाला. भक्तिभावाने ओथंबलेल्या वातावरणात मुनिसंघाचा पवित्र विहार बाहुबली मंदिर, विजापूर रोडकडे प्रस्थान झाला. या मंगल विहारात वालचंद समूहातील शिक्षक, विद्यार्थी आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

संत शिरोमणि आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महाराज व आचार्यश्री १०८ समयसागरजी महाराज यांच्या परंपरेतील परम प्रभावक शिष्य, निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांच्या ससंघ सान्निध्यात हा आध्यात्मिक सोहळा पार पडला. स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षाच्या पावन निमित्ताने जैन मुनिश्रींचे ससंघ सलग २४ दिवस वालचंद शिक्षण समूहात वास्तव्य लाभणे, हे केवळ एक योगायोग नसून अत्यंत दुर्मीळ आणि परमभाग्यदायी आध्यात्मिक घटना मानली जाते.

पहाटे सहा वाजता डब्ल्यू. आय. टी. जैन टेंपल येथे भगवंताचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर शांतीधारा झाली आणि भक्तीमय वातावरणात अंतरात्म्याला स्पर्श करणारा आध्यात्मिक आनंदोत्सव अनुभवायला मिळाला. याच प्रसंगी परमपूज्य १०८ श्री धवलसागरजी महाराज यांचा २२ वा दीक्षा दिवस भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या २४ दिवसांच्या पावन कालखंडात डब्ल्यू. आय. टी. जैन मंदिर परिसरात साधना, संस्कार आणि शिक्षणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. मुनिसंघाच्या सान्निध्यात निर्माण झालेल्या या अध्यात्मिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मशुद्धी, शिस्त आणि मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी अधिक दृढ झाली.

वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी, भूषण शहा आणि पराग शहा यांनी महाराजांना श्रीफळ अर्पण करून मन, वचन आणि काया या त्रिविध मार्गांनी क्षमायाचना केली.

## दिवसांतून दोन वेळा पाणी पुरवठ्याने चर्चा

**सोलापूर** : सोलापूर शहरात रोज पाणीपुरवठ्याचा विषय अनेक वर्षांपासून आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रत्येकवेळी विरोधी पक्षातील नगरसेवकांकडून सत्ताधाऱ्यांना यावरुन लक्ष्य केले जाते. मात्र अशातच बुधवारी दि. २९ एप्रिल रोजी जुळे सोलापूर भागात काही ठिकाणी सकाळी व संध्याकाळी असा दोन वेळा पाणी पुरवठा करण्यात आल्याने नागरिकांमध्ये सुखद आश्चर्याचा धक्का दिल्याची चर्चा सुरु होती.


### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर जिल्हा तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे मजरेवाडी येथील लोकांना या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मजरेवाडी येथील प्लॉट नं.१ मधील ११७/२/४बी आश्रय अपार्टमेंट्स कंडोमिनियममधील सी विंग तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. सी-३०३ याचे कारपेट क्षेत्र ७९.९६ चौ.मी. सोबत ८.१० चौ.मी बाल्कनी तसेच टेरेस एरिया ८.५० चौ.मी. एकूण क्षेत्र ०.९७.०५ आर चौ.मी इतके आहे. याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस - फ्लॅट नं. सी-३०४, दक्षिणेस - साईड मार्जीन, पश्चिमेस साईड मार्जीन, उत्तरेस फ्लॅट नं. सी-३०१

सदर वर नमुद केलेली फ्लॅट जागा सौ क्रांती सागर दर्गोपाटील रा. सोलापूर यांनी आमचे अशिल सौ. लक्ष्मी अमित निलगार व गौरी अमित निलगार यांना मालकी व कब्जेवहिवाट हक्कासहीत कायमस्वरूपी खरेदी देण्याचे ठरवून तशी त्यांचेकडून इसारा रक्कम देखील स्विकारलेली आहे. वर नमुद सर्व शेतजमीनी त्यांनी निर्वेध व निजोखमीची असलेबाबत आमचे अशिल सौ. लक्ष्मी अमित निलगार व गौरी अमित निलगार यांना तशी हमी व खात्री दिलेली आहे.

तथापि वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा कागदोपत्री व आर्थिक हक्क, हितसंबंध, प्रलंबित न्यायालयीन वाद, गहाणखत, बोजा, टाच असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या कागदपत्रासहीत खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा तद्नंतर कोणाचीही तक्रार अगर हरकत आल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. २८/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. पंकज व्ही. कुलकर्णी**
**PITL, DCL, DIPL, PG-CCPD, LLM**
**मो.नं. ९१७५५५५७४३**
**रा. सी- ८०३, आश्रय अपार्टमेंट,**
**श्रीराम चौकजवळ, फ्लोरा कासा बिल्डींग शेजारी,**
**आय.एम.एस. शाळेजवळ, जुळे सोलापूर**



### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली ता. ०८/०५/२०२६
दि.कि.अ.नं. २०/२०२६ नि.नं.५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **कविता रमेश साठे,**
वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. मुंगशी (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर

२) **आनंद रमेश साठे**
वय ३२ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर

३) **संगीता महादेव गायकवाड,**
वय २८ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. रुम नं. २२७७/००० आंबेडकर रोड,
तुर्भे स्टोअर, नवी मुंबई, ठाणे

४) **अश्विनी स्वप्नील निकम,**
वय २६ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. शेळगांव (आर), ता. बार्शी,

— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** **- सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. २, ३, ४ ही अर्जदार नं. १ ची मुले असून अर्जदार नं.२, ३, ४ यांचे वडिल म्हणजेच अर्जदार नं. १ चे पती रमेश गुलाब साठे हे होते ते दि. ०८/०६/२०२१ रोजी गंगामाई हॉस्पीटल, सोलापूर येथे उपचारादरम्यान मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ च्या अर्जदार नं.३, ४ या विवाहीत मुली म्हणजेच अर्जदार नं. २ च्या विवाहीत बहिणी आहेत. मयत रमेश गुलाब साठे यांची आई जांबूबाई गुलाब साठे या दि. ०९/०५/२०१० रोजी मयत झालेल्या आहेत. यातील अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता अर्जदार हे रमेश गुलाब साठे यांचे कायदेशीर वारस असलेचे हेअरशिप (वारस) प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारानी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्राकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कातदस्त असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख ०८/०५/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होऊन आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे प्रीनिशी कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ताः २९/०४/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

# आयपीएलचा थरार



## महत्त्वाचे

### मुंबई इंडियन्स संघाने बांधल्या काळ्या फिती

**मुंबई** : बुधवारी वानखेडे स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्ध खेळल्या गेलेल्या इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेतील सामन्यादरम्यान मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंनी आपल्या सपोर्ट स्टाफमधील एका सदस्याच्या मुलीच्या अकाली निधनाबद्दल आदर आणि एकजुटीचे प्रतीक म्हणून हातावर काळ्या फिती परिधान केल्या होत्या. प्रिय सर्वांनो, आमच्या सपोर्ट स्टाफमधील एका सदस्याच्या मुलीच्या अकाली निधनामुळे, मुंबई इंडियन्सचे खेळाडू आज त्या कुटुंबाच्या स्मरणार्थ आणि त्यांच्याशी एकजूट दर्शविण्यासाठी हातावर काळ्या फिती परिधान करतील, असे मुंबई इंडियन्सने एका निवेदनात म्हटले आहे. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकली आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रोहित शर्मा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर आहे. संघाने आपल्या अंतिम एकादशमध्ये अनेक बदल केले आहेत; त्यांनी रायन रिकलटन, विल जॅक्स, रॉबिन मिन्झ आणि ट्रेंट बोल्ट यांना संघात स्थान दिले आहे, तर क्विंटन डी कॉक, शेर्फेन रदरफोर्ड, शार्दुल ठाकूरव कृष्ण भगतला या सामन्यासाठी वगळण्यात आले आहे.

### क्रिकेटपटू शपूर झद्रानला ए-पॉझिटिव्ह रक्ताची गरज

**नवी दिल्ली** : अफगाणिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शपूर झद्रान सध्या नवी दिल्लीतील एका रुग्णालयात आपल्या जीवनासाठी लढा देत आहे, त्याला रक्ताची अत्यंत निकड भासत आहे. झद्रानचे कुटुंब आणि नातेवाईकांनी ए-पॉझिटिव्ह रक्तगटाच्या रक्तदात्यांना मदतीचे आवाहन केले आहे. ३० वर्षीय शपूर हा हेमोफॅगोसिटिक लिम्फोहिस्टियोसायटोसिस (एचएलएच) या एका दुर्मिळ आणि जीवघेण्या रोगप्रतिकारक विकारामुळे उद्भवलेल्या आजाराशी झुंज देत आहे. २००९ ते २०२० या काळात अफगाणिस्तानसाठी ४४ वन-डे व ३६ टी-२० सामने खेळलेला झद्रान, सध्या एचएलएचच्या चौथ्या टप्प्यात असून अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे. झद्रानचा धाकटा भाऊ, घमाई झद्रान याने इन्स्टाग्रामवर एक भावूक संदेश पोस्ट करत सर्वांना मदतीचे आवाहन केले आहे. त्याने या माजी खेळाडूला मदत करावी आणि आवश्यक रक्ताचे दान करावे, जेणेकरून त्याला बरे होण्यास मदत होईल, अशी विनंती केली आहे.

### गोल्फपटू विजय कुमार यांचे निधन

**नवी दिल्ली** : वरिष्ठ भारतीय गोल्फपटू विजय कुमार यांचे त्यांच्या मूळ गावी, लखनौ येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते



५७ वर्षांचे होते. २००२ च्या इंडियन ओपन स्पर्धेचे विजेते आणि चार वेळा ऑर्डर ऑफ मेरिट विजेते ठरलेले विजय हे भारतीय व्यावसायिक गोल्फ क्षेत्रातील अत्यंत यशस्वी आणि आदरणीय नावांपैकी एक होते. विजय यांनी १९८८ मध्ये व्यावसायिक गोल्फ कारकिर्दीला सुरुवात केली. १९९० च्या दशकाच्या मध्यापासून ते पुढील दशकाच्या सुरुवातीपर्यंत, त्यांनी भारतीय देशांतर्गत गोल्फवर आपले वर्चस्व गाजवले; अनेक विजेतेपदांनी त्यांची ही गौरवशाली कारकीर्द गाजली. २००२ च्या इंडियन ओपन स्पर्धेतील विजय यांचा ऐतिहासिक विजय हा भारतीय गोल्फच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानला जातो. इंडियन ओपन स्पर्धा जिंकणाऱ्या मोजक्या नऊ भारतीय गोल्फर्सपैकी ते एक होते. तसेच, स्कॉटलंडमधील सेंट अँड्र्यूज येथे १९९९ मध्ये आयोजित अल्फ्रेड डनहिल कप स्पर्धेतही विजय यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

### भारतीय भारोत्तोलकांनी जिंकली ३ पदके

**नवी दिल्ली** - सामोआ येथील अपिया येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल युवा आणि कनिष्ठ भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धा व युनिव्हर्सल चषकामध्ये भारतीय भारोत्तोलकांनी आपली प्रभावी कामगिरी कायम राखली आहे. बुधवारी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी त्यांनी एक सुवर्ण व तीन रौप्यपदके पटकावली. राष्ट्रकुल युवा व कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेतील ६९ किलो वजनी गटात बेलना हरिका हिने १९७ किलो (८६ किलो + १११ किलो) अशा एकूण वजनाची उचल करत, त्या दिवसाचे एकमेव सुवर्णपदक आपल्या नावी केले. ६३ किलो वजनी गटातील स्पर्धां ध्ये करंगी तरंगिणी (१७९ किलो; ७९ किलो + १०० किलो) आणि भूमिका मोहिते (१९५ किलो; १०९ किलो + ८६ किलो) यांनी रौप्यपदके जिंकली. युनिव्हर्सल चषकामध्ये अभिषेक निपाणे याने ३२४ किलो (१४० किलो + १८४ किलो) अशा एकूण वजनाची उचल करत ८८ किलो वजनी गटातील रौप्यपदक पटकावले. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी भारतीय भारोत्तोलकांनी चार सुवर्णपदके जिंकली होती.

# रायन रिकेल्टनचे नाबाद शतक

## मुंबई इंडियन्स ५ बाद २४३




**◆ मुंबई, २९ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात बुधवारी वानखेडे स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या आयपीएल सामन्यात सलामीवीर रायन रिकेल्टनच्या बहारदार शतकाच्या बळावर मुंबई इंडियन्सने २० षटकांत ५ बाद २४३ धावा उभारल्या. मुंबईने हैदराबादला विजयासाठी २४४ धावांचे आव्हान दिले.

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून आपल्या घरच्या मैदानावर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सने आपल्या सलामीच्या जोडीबाबत सतत प्रयोग करीत संगीत खुर्चीचा खेळच मांडला होता. विल जॅक्स व रायन रिकेल्टनची जोडी ही या हंगामातील त्यांची चौथी सलामीची जोडी आहे. या जोडीच्या रूपाने त्यांना यशाचे अचूक सूत्र गवसल्याचे दिसून येत आहे. या दोघांनीही खेळपट्टीचा वेग आत्मसात केला आणि एकमेकांच्या तोडीस तोड फटकेबाजी केली, त्यामुळे मुंबई इंडियन्सला सामन्याची धडाकेबाज सुरुवात करता आली.

रायन रिकेल्टनने २३ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने अर्धशतक पूर्ण केले. या दोघांनी मुंबईला शंभर धावांच्या जवळपास आणले असतानाच नितीश कुमार रेड्डीने विल जॅक्सला ईशान किशनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. विल जॅक्सचे थोडक्यात अर्धशतक हुकले, त्याने २२ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ४६ धावांचे योगदान दिले. रिकेल्टनच्या साथीला आलेला सूर्यकुमार यादव ईशान मलिंगाच्या गोलंदाजीला बळी पडला. सूर्यकुमारने पाच चेंडूंत पाच धावा केल्या. तोपर्यंत मुंबईने ८.३ षटकांत २ बाद ११० धावांचा टप्पा गाठला होता.

रायन रिकेल्टनला नमन धीर व हार्दिक पांड्याची उत्तम साथ मिळाली. रिकेल्टनने (२२) नमनसोबत तिसऱ्या गड्यासाठी ५५ धावांची, तर हार्दिक पांड्या (३१) याच्यासोबत चौथ्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी केली व संघाला दोनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला.

**हिंगेच्या चेंडूवर धीर हर्ष दुबेकडून झेलबाद**

या सामन्यात विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगेने नमन धीनरला रोखताना पहिला बळी मिळविला. हिंगेच्या चेंडूवर नमनचा उडालेला झेल विदर्भाच्याच हर्ष दुबेने मिडविकेटवर पकडला. याचदरम्यान रिकेल्टनने आपले शतकही पूर्ण केले. तोपर्यंत मुंबईने १८.१ षटकांत ४ बाद २२१ धावांपर्यंत मजल मारली होती.

**हिंगे केले तिलक वर्माला बाद**

रायन रिकेल्टनची तिलक वर्माच्या साथीने फटकेबाजी सुरूच होती. हे दोघे मर्यादित २० षटकांपर्यंत नाबाद खेळी करेल असे वाटत असताना प्रफुल्ल हिंगेने तिलक वर्मा (७) याच्या रुपात आपला दुसरा बळी मिळविला. तोपर्यंत मुंबई इंडियन्सने १९.३ षटकांत ५ बद २३२ धावांर्यंत मजल मारली होती. पुढे रायन रिकेल्टनने रॉबिन मिंझच्या साथीने मुंबई इंडियन्सला २० षटकांत ५ बाद २४३ धावा रचून दिल्या.

रायन रिकेल्टनने अवघ्या ५५ चेंडूंत नाबाद १२३ धावांची शतकी खेळी केली, यात त्याने १० चौकार व ८ षट्कार ठोकलेत. रॉबिन मिंझ एका धावेवर नाबाद राहिला.

सनरायझर्स हैदराबादकडून प्रफुल्ल हिंगेने २ बळी टिपले, तर ईशान मलिंगा, साकीब हुसेन व नितीश कुमार रेड्डीला प्रत्येकी एक बळी टिपण्यातच यश मिळाले.

◀(वृत्तसंस्था)

# गुजरात मुसंडी मारण्यास उत्सुक

## बंगळुरूचे स्थान बळकट करण्यावर भर





रजत पाटीदार शुभमन गिल

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**

**स्थळ** : नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम, अहमदाबाद

**वेळ** : सायं. ७:३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**◆ अहमदाबाद, २९ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात विजय नोंदवून गुणतालिकेत अव्वल स्थान मिळविण्यास बंगळुरूचा संघ उत्सुक असेल, तर तिकडे गुजरातला जोरदार मुसंडी मारून अव्वल चार क्रमांकात स्थान मिळविण्यास उतावीळ झालेला असेल. त्यामुळे हा सामना चुरशीचा होईल, हे निश्चित आहे.

सातत्याच्या शोधात असलेल्या गुजरात टायटन्सला, सध्या जबरदस्त लयीत असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या कठीण आव्हानाचा सामना करावा लागणार आहे.

स्पर्धेचा अर्धा टप्पा पूर्ण होत असताना, गुजरात टायटन्स आठ सामन्यांत चार विजय आणि तितक्याच पराभवांसह गुणतालिकेत मधल्या स्थानावर अडकलेली दिसून येत आहे.

याउलट, गतविजेते असलेल्या आरसीबीने () सध्या अत्यंत बहारदार कामगिरी केली असून, आठ सामन्यांमध्ये त्यांनी सहा विजयांची नोंद केली आहे. सध्या गुणतालिकेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर गुजरात टायटन्स ८ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. बंगळुरूसह पंजाब किंग्स (१३), राजस्थान रॉयल्स (१२ गुण) व सनरायझर्स हैदराबादने (१०) अव्वल चार क्रमाकांत स्थान मिळविले आहे.

आरसीबीची नवीन चेंडूने गोलंदाजी करणारी जोडी भुवनेश्वर कुमार व जोश हेझलवूडने एकत्रितपणे कहर केला आहे. भुवनेश्वरने आपल्या स्विंगच्या कौशल्याने जुन्या काळाची आठवण करून दिली, हेझलवूडने कसोटी सामन्यांच्या लांबीच्या गोलंदाजीने फलंदाजांच्या बॅटची बाहेरील कड लक्ष्य करून त्यांना अडचणीत आणले आहे. मधल्या षटकांमध्ये कृणाल पांड्याने वैविध्यपूर्ण गोलंदाजीचा मारा करत प्रतिस्पर्ध्यांना आव्हान दिले होते.

गुजरात टायटन्सची फलंदाजी अव्वल फळीवर जास्त अवलंबून आहे. साई सुदर्शन, कर्णधार शुभमन गिल व जोस बटलरने बहुतांश धावा केल्या आहेत. वॉशिंग्टन सुंदरने मधल्या फळीत स्वतःला सिद्ध केले आहे. शाहरुख खान व राहुल तेवतियाने फिनिशर म्हणून अद्याप चमकदार कामगिरी केलेली नाही.

◀(वृत्तसंस्था)

# सूर्यवंशी पुन्हा ऑरेंज कॅप यादीत अव्वल स्थानी



**◆ नवी दिल्ली, २९ एप्रिल**

राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी या आयपीएल हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पुन्हा एकदा अव्वल स्थानी पोहोचला आहे. सूर्यवंशीने १६ चेंडूंत पाच चौकारांसह ४३ धावांची धडाकेबाज खेळी केली, या खेळीसह तो या हंगामात ४०० धावांचा टप्पा गाठणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे.

हंगामाची सुरुवात ५२, ३१, ३९ आणि ७८ अशा धावांच्या सातत्यपूर्ण मालिकेने केल्यानंतर सूर्यवंशीच्या कामगिरीत थोडीशी घसरण झाली होती. मात्र, त्याने जोरदार पुनरागमन केले आहे. अलीकडील सामन्यापूर्वीच्या आपल्या मागील तीन डावांपैकी दोन डावांत त्याने अनुक्रमे ४६ व १०३ धावा केल्या, त्यामुळे तो पुन्हा एकदा ऑरेंज कॅप यादीत थेट अव्वल स्थानी विराजमान झाला आहे.

त्याच्या पाठोपाठ अव्वल पाच फलंदाजांमध्ये सनरायझर्स हैदराबादचा अभिषेक शर्मा (३८० धावा), दिल्ली कॅपिटल्सचा केएल राहुल (३५८ धावा), रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा विराट कोहली (३५१ धावा) आणि हैदराबादचा हेनरिक क्लासेन (३४९ धावा) यांचा समावेश आहे. तसेच पंजाब किंग्सचा प्रभसिमरन सिंग ३४६ धावांसह सहाव्या क्रमांकावर आहे. कर्णधार श्रेयस अय्यर मंगळवारच्या सामन्यांनंतर दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे, त्याची एकूण धावसंख्या ३०९ पर्यंत पोहोचली आहे.

**पर्पल कॅप यादीत चार जण संयुक्त आघाडीवर**

राजस्थान रॉयल्सच्या जोफ्रा आर्चरची एकूण बळीसंख्या १४ वर पोहोचली असून, तो आता बंगळुरूच्या भुवनेश्वर कुमार, चेन्नई सुपर किंग्सच्या अंशुल कंबोज आणि हैदराबादच्या इशान मलिंगा यांच्यासह गुणतालिकेत संयुक्तपणे अव्वल स्थानी विराजमान झाला आहे.

आर्चरचा इकॉनॉमी रेट ८.२७ इतका आहे, तर भुवनेश्वरचा ७.६१, कंबोजचा ८.५६ आणि मलिंगाचा ९.४४ इतका आहे. त्यांच्या पाठोपाठ, प्रत्येकी १३ बळी आपल्या नावावर जमा करून, लखनौ सुपर जायंट्सचा प्रिन्स यादव आणि गुजरात टायटन्सचा कॅगिसो रबाडा हे खेळाडू दुसऱ्या क्रमांकावर आहेत. ◀(वृत्तसंस्था)

## श्रीलंका क्रिकेटच्या अंतरिम समितीच्या अध्यक्षपदी विक्रमरत्ने

**◆ कोलंबो, २९ एप्रिल**

श्रीलंकेचे माजी खासदार आणि गुंतवणूक बँकर एरन विक्रमरत्ने यांची श्रीलंका क्रिकेटच्या अंतरिम समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष शम्मी सिल्वा आणि त्यांच्या कार्यकारी समितीने राजीनामा दिल्यानंतर, या खेळाच्या प्रशासकीय संस्थेचा कारभार चालवण्याच्या उद्देशाने ही अंतरिम समिती स्थापन करण्यात आली आहे.

क्रीडामंत्री सुनील कुमारा गमागे यांनी गठीत केलेल्या या अंतरिम समितीमध्ये, राष्ट्रीय संघाचे माजी कर्णधार रोशन महानमा आणि कुमार संगकारा यांचा समावेश करण्यात आला आहे; तसेच संघाचा माजी सलामीवीर सिदाथ वेट्टिमुनी यालाही यात स्थान मिळाले आहे.

प्रशासक थुशिरा राडल्लग्ला, अवंती कोलंबेगे, प्रकाश शॅफ्टर आणि उपुल कुमारप्पेरुमा यांचाही या समितीत समावेश आहे.

◀(वृत्तसंस्था)

# पंजाब किंग्सला नवीन रणनीतीची गरज : होप्स

**◆ मुलानपूर, २९ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात पंजाब किंग्स संघाला पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. पंजाब किंग्जचे वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक जेम्स होप्स यांनी पुन्हा संघटित होण्याची आणि रणनीतीची नव्याने आखणी करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. या पराभवानंतरही गुणतालिकेत पंजाब किंग्सचा संघ अव्वल स्थानी कायम आहे.

मंगळवारी येथे झालेल्या अत्यंत चुरशीच्या आणि मोठ्या धावसंख्येच्या सामन्यात, राजस्थान रॉयल्सने २२३ धावांचे विशाल लक्ष्य यशस्वीरित्या गाठले व पंजाबच्या आतापर्यंतच्या अजिंक्य वाटचालीला पूर्णविराम दिला. ४ बाद २२२ अशी मोठी धावसंख्या उभारूनही, पंजाब किंग्जला या धावसंख्येचे रक्षण करण्यात अपयश आले; त्यामुळे आतापर्यंतच्या त्यांच्या वर्चस्वपूर्ण कामगिरीत हा एक दुर्मिळ धक्का ठरला.



पंजाब किंग्सला योग्यवेळी हादरा बसला आहे, हा एक वास्तवतेचा आरसा आहे. आम्ही सध्या अत्यंत जोमाने खेळत आहोत आणि सामने जिंकत आहोत, जे अर्थातच खूप छान आहे; परंतु आयपीएलच्या संपूर्ण प्रवासात संघाला एकाही पराभवाशिवाय पुढे जाता येत नाही. आता तर संघ स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करीत आहे, तेव्हा संघाने पुन्हा संघटितक होणे महत्त्वाचे आहे, असे होप्स म्हणाला. परिस्थिती अत्यंत निराशाजनक किंवा सर्व काही संपले असे अजिबात म्हणणार नाहीतर आता कामाला लागणे, त्रुटी दूर करणे संघ-संयोजन शोधणे, हेच उद्दिष्ट आहे. ◀(वृत्तसंस्था)

# तत्कालीन जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर निलंबित

**प्रस्ताव नसताना कुस्ती व कबड्डी मॅटची शिफारस करणे**

**खातरजमा न करता देयके अदा केली**

**सोलापुरातले २०२१-२२ या वर्षातील प्रकरण**

**सोलापूर दि.२९ एप्रिल-**

येथील तत्कालीन जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर यांना १६ एप्रिल २०२६ पासून क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी निलंबित केले आहे. सध्या ते साताराचे जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून



कार्यरत होते. सोलापुरात ते जिल्हा क्रीडाधिकारी असताना २०२१-२२ या वर्षात नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत लाभार्थी संस्थेचे प्रस्ताव नसताना अनुदान मंजुरीची शिफारस करणे. तसेच मंजुरीपूर्व प्रत्यक्ष संस्था अथवा शाळेच्या जागेची पाहणी न करता कुस्ती व कबड्डी मॅट करिता चार कोटी चार लाख पन्नास हजार रुपये मंजूर करून सदर कामाचे कार्यआदेश मे. झेनिथ स्पोर्टस् वाई, सातारा यांना देण्यात आले आहेत. तसेच साहित्याचा पुरवठा झाला की नाही याची खातरजमा न करताच संबंधित संस्थेस ९४ लाख ५१ हजार ९२० रुपये इतके देयक अदा केले असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

# सोलापूरचा 'समृद्धी' तर शेवतेचा 'आदर्श' संघ जिल्हा चॅम्पियन





**वाफळेतील भीमशक्ती चषक खो-खो स्पर्धा**

**पवित्रा नागलगाव, यश मोरे अष्टपैलू खेळाडू**

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

वाफळे (ता. मोहोळ) येथील भीमशक्ती तरुण मंडळ यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय निमंत्रित खो-खो स्पर्धेत सोलापूरच्या समृद्धी स्पोर्ट्स क्लबने किशोरी गटात, तर शेवते (पंढरपूर) येथील आदर्श खो-खो क्लबने किशोर गटात विजेतेपद पटकावले.

**वैयक्तिक पारितोषिकप्राप्त खेळाडू**

**किशोरी गटः** उत्कृष्ट संरक्षक - अक्षता गंगोंडा (समृद्धी स्पोर्ट्स), उत्कृष्ट आक्रमक - अमृता ढेरे (वीट, करमाळा), अष्टपैलू खेळाडू - पवित्रा नागलगाव (समृद्धी स्पोर्ट्स).

**किशोर गटः** उत्कृष्ट संरक्षक - वेदांत चव्हाण (मंद्रूप), उत्कृष्ट आक्रमक - वेदांत भोसले (शेवते), अष्टपैलू खेळाडू - यश मोरे (शेवते).

सोलापूर जिल्हा ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने या स्पर्धा वाफळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेत किशोरी गटातून १२ तर किशोर गटातून १६ अशा एकूण २८ संघांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धा असोसिएशनचे उपाध्यक्ष अजितकुमार संगवे, सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, तांत्रिक समिती सदस्य पुंडलिक कलखांबकर, पंच विजय आडगळे व लखन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. वाफळे येथील शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, मुख्याध्यापक रामेश्वर चव्हाण, विश्वजीत देशमुख, भीमशक्ती मंडळाचे अध्यक्ष अनिल माने, खजिनदार अण्णा नाईकनवरे, श्रीकांत जवंजाळ व राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ यांनी या स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. या स्पर्धेचे बक्षीस वितरण एक मे रोजी सकाळी १० वाजता वाफळे येथे होणार आहे.

किशोरी गटाचा अंतिम सामना समृद्धी स्पोर्ट्स क्लब (सोलापूर) विरुद्ध छत्रपती शिवाजी प्रशाला (वीट, करमाळा) यांच्यात झाला. समृद्धी स्पोर्ट्सने १ गुण आणि ३ मिनिटे ५० सेकंद राखून विजय मिळवला. समृद्धीच्या पवित्रा नागलगावने ४ गडी बाद करत २.३० व नाबाद २ मिनिटे संरक्षण करत अष्टपैलू कामगिरी केली. तिला अक्षता गंगोंडा (३ मि. व २.५० मि.) आणि सृष्टी हडपद (२.०० व २.१५ मि.) यांनी मोलाची साथ दिली. वीट संघाकडून आसावरी जाधव व अमृता ढेरे यांची झुंज अपयशी ठरली.

किशोर गटाचा आदर्श खो-खो क्लब (शेवते) विरुद्ध दीनबंधू खो-खो क्लब (मंद्रूप) यांच्यात झालेल्या सामन्यात शेवतेच्या संघाने १ डाव आणि २ गुणांनी एकतर्फी विजय मिळवला. शेवतेच्या यश मोरेने ४ मिनिटे संरक्षण व ३ गडी बाद केले, तर वेदांत भोसलेने ५ गडी बाद करत आक्रमक खेळ केला.

# सिध्देश्वर कन्या, मेहता व संगमेश्वर अव्वल

**क्रीडा स्पर्धेतील कामगिरीवर प्रोत्साहनात्मक अनुदान**

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर दि.२९ एप्रिल-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता हायस्कूल, सिद्धेश्वर कन्या प्रशाला व संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयास अनुक्रमे १४, १७ व १९ वर्षांखालील गटात जिल्हा क्रीडा कार्यालयाचे प्रोत्साहनात्मक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**राज्यात २ कोटी, सोलापूरसाठी ५ लाख**

राज्यातील ३६ जिल्हयातील १४, १७ व १९ वर्षांखालील गटातील प्रत्येकी ३ शाळांना प्रत्येकी १ लाख, ७५ व ५० हजार रुपयांचे अनुदान मंजूर आहे. परंतु निधीअभावी ही रक्कम अनुक्रमे ८९ हजार ८००, ६४ हजार ८०० व ३९ हजार ८०० रुपये मंजूर करण्यात आली आहे. यात राज्यातून २ कोटी १० लाख व सोलापूर जिल्ह्यासाठी ५ लाख ८३ हजार २०० रुपये मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम संबंधित शाळांनी कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधिक रक्कम ऑनलाईनने जमा करण्यात येणार असल्याचे श्री. हरनाळे यांनी सांगितले.

शालेय क्रीडा स्पर्धेतील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील क्रीडा स्पर्धेतील सांघिक व वैयक्तिक कामगिरीवर त्यांची निवड झाली असल्याचे जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी सांगितले.

**प्रोत्साहनात्मक अनुदान मिळालेल्या प्रथम तीन शाळा व गुणांकन**

**१४ वर्षांखालीलः** कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता हायस्कूल, सोलापूर (२३३), माईल स्टोन स्कूल चिंचगाव (ता. माढा, २०६), सिद्धेश्वर कन्या प्रशाला, सोलापूर (१४४).

**१७ वर्षांखालील :** सिद्धेश्वर कन्या प्रशाला, सोलापूर (३४०), कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता हायस्कूल, सोलापूर (२३८), सिद्धेश्वर स्कूल सोलापूर (२३६).

**१९ वर्षांखालील :** संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालय (१०३५), माईल स्टोन स्कूल चिंचगाव (३६६), बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले खुर्द (ता. माढा, २३२)

# सोलापूरच्या टेनिस खेळाडूंना शासनाच्या लक्षवेध उपक्रमाचा लाभ मिळणार

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाने कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील एम.एस. एल.टी.ए टेनिस सेंटरची निवड "लक्ष्यवेध" योजनेअंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र म्हणून केली असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरणाळे यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील २० मानांकित खेळाडूंना (१० ते २० वर्षे वयोगट) याचा लाभ मिळणार आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंना शासनाकडून क्रीडा साहित्य तसेच व्यावसायिक



प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.ही बाब सोलापूर क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद असून सर्व आवश्यक त्या औपचारिकता १५ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी दिली .

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### 'माझ्या हृदयात वसतो भगवंत' विजय थोरात यांच्या विसाव्या भजनाचे लोकार्पण

**बार्शी, दि. २९ एप्रिल-**

'माझ्या हृदयात वसतो भगवंत, माझ्या प्रत्येक श्वासात भगवंत...' या हृदयस्पर्शी शब्दांनी बार्शीनगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली. श्री भगवंत प्रगटदिनाच्या पूर्वसंध्येला भगवंत भक्त विजय कोरे (थोरात) यांच्या २० व्या भक्ती रचनेचा (भजन) भव्य लोकार्पण सोहळा सोमवारी सायंकाळी श्री भगवंत मंदिर परिसरात उत्साहात झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार राजेंद्र राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांनी भूषविले. पंचायत समिती अध्यक्षा रोगे, प्रशांत कथले, माऊली उद्योग समूहाचे अमृत राऊत, सचिन वायकुळे उपस्थित होते. सूत्रसंचालन शीतल कुलकर्णी यांनी केले. सोहळ्याचे आयोजन श्री भगवंत मंदिर समिती, डिजिटल मीडिया पत्रकार संघ आणि भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांच्यावतीने केले होते. पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यामध्ये जिल्हा पश्चिम अध्यक्ष विनोद ननवरे, उपाध्यक्ष विजय कोरे, सहसचिव बाबासाहेब शिंदे, खजिनदार अजय पाटील, शहराध्यक्ष गणेश शिंदे, ग्रामीण अध्यक्ष संतोष कानगुडे, उपाध्यक्ष अभिजित शिंदे, खजिनदार समाधान विधाते आणि बालाजी देवकते, गुरुदत्त कुलकर्णी, शेखर थोरात, केशव थोरात, बाळासाहेब पाटील यांचा सक्रिय सहभाग होता.



### न्यू भीम क्रांती मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

न्यू भीम क्रांती तरुण मंडळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दि. २१ ते २७ एप्रिलपर्यंत एक तास अभ्यास, निबंध स्पर्धा, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, रक्तदान शिबीर, महिलांसाठी तळ्यात मळ्यात व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना व महिलांना बक्षीस देण्यात आले. प्रथम क्रमांकाला एक हजार रुपये, द्वितीय पाचशे रुपये तर तृतीय तीनशे रुपयांचे बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमास वैशाली दुपारगुडे, रुपाली बाळशंकर, रोशनी सोनकांबळे, श्रीदेवी बाळशंकर, अनुराधा तूपसाखरे, आम्रपाली तूपसाखरे, भाग्यश्री बाळशंकर, शिल्पा बाळशंकर, नेहा बाळशंकर, सुवर्णा खंडाळे, मल्लूबाई बाळशंकर, मनीषा बाळशंकर, सोनी शिंगे, श्रृती शिंगे, प्रियंका बाळशंकर, सुनिता बाळशंकर, पूनम सोनकांबळे, उमा बनसोडे उपस्थित होते. दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी ९ वाजता भीम गीताचा कार्यक्रम पार पडला. दि. २८ एप्रिल रोजी सायं. ७ वाजता लिंबूनि बौध्द विहारपासून मिरवणुकीला सुरवात करण्यात आली.

### सोलापूरमध्ये 'ब्रँड इंटिग्रेशन' अल्बमचा पहिला यशस्वी प्रयोग होणार लॉन्च

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

मनोरंजन क्षेत्रात नवे प्रयोग करणाऱ्या चेतन गरूड प्रोडक्शन्सने सोलापूर शहरात 'ब्रँड इंटिग्रेशन'अल्बमचा पहिला यशस्वी प्रयोग साकारला आहे. शहरातील 'संकेत ज्वेलर्स'सोबत राबविण्यात आलेला हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाला असून, सोलापूरमध्ये अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम ठरल्याची माहिती आयोजक कमलेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रकल्पाचे चित्रीकरण आणि तांत्रिक बाजू डीओपी कमलेश शिंदे यांनी सांभाळली असून त्यांच्या कौशल्यपूर्ण कामगिरीमुळे संपूर्ण सादरीकरण आकर्षक आणि प्रभावी झाले आहे.या उपक्रमात 'ख्वाडा' चित्रपटातील अभिनेत्री रसिका चव्हाण तसेच 'असंच होतं मनात माझ्या' आणि 'नतरंगी नार'मधील अभिनेता महेश पिंपरीकर यांचा सहभाग लाभला. या दोन्ही कलाकारांनी आपल्या अभिनयाने प्रकल्पाला विशेष उंची दिली.या यशाबद्दल चेतन गरूड प्रोडक्शन्सने सोलापूरकरांचे आभार मानले असून स्थानिक स्तरावर मिळालेल्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाल्याचे नमूद केले. दरम्यान, या यशानंतर चेतन गरूड प्रोडक्शन्स भविष्यात आणखी नवनवीन व दर्जेदार प्रकल्प राबविणार असल्याची माहितीही शिंदे यांच्याकडून देण्यात आली. या पत्रकार परिषदेस रसिका चव्हाण, चेतन गरुड, संकेत आमडेकर आदी उपस्थित होते.

### महाराष्ट्र दिनानिमित्त उद्या गीतांचा कार्यक्रम

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

महाराष्ट्र दिनानिमित्त मधुर गीतांचा 'पसंत आपलीअपनी' हा विशेष कार्यक्रम दि. १ मे रोजी सायंकाळी ५ वाजता डफरीन चौकातील



आयएमए हॉल येथे होत आहे. अध्यक्षस्थानी समृद्धी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत असून प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष किरण लोंढे, सुमित फुलमामडी तसेच लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे उपस्थित असतील. मैफिलीत प्रमोद कानडे, राजकुमार कोकळगी, अशोक मैंदर्गीकर, शब्बीर विजापूरे, राजेश कुलकर्णी, अविनाश चिल्ला, रुक्मण दौलताबाद, श्रीकांत पाटील, किरण रंगरेज, अरुण लोंढे, दत्ता काळे, अनुराधा गंगुल, अश्विनी ढेरे, डॉ. अंजली शिरसी, शीतल नागराशी, वर्षा पगारे, मनीषा साबळे, ऋतुजा ढेरे, संगीता कोळी आदी कलाकार सहभाग होतील, असे प्रा. अनिल लोंढे यांनी सांगितले.

## निधन वृत्त...



### चंद्राम इंगळे

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

मद्रे (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी चंद्राम महादेव इंगळे वय ८६ यांचे दि. २७ एप्रिल रोजी निधन झाले. ते भारतीय दलित पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, नातू, मुली, जावई, सुन, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. अभियंता ऋतुराज इंगळे यांचे ते आजोबा होत.

# मोडनिंब येथील ग्रामदैवत वेताळ देवस्थान यात्रेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २९ एप्रिल-**



मोडनिंब (ता.माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ देवस्थानच्या यात्रेस बुधवार (दि.२९) एप्रिलपासून प्रारंभ झाला आहे. सलग सहा दिवस चालणाऱ्या या यात्रेत विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण गिड्डे आणि सचिव विजय खेलबुडे यांनी दिली. यात्रेच्या पहिल्या दिवशी दि.२९ एप्रिल रोजी सायंकाळी हभप कविराज महाराज झावरे (संगमनेरकर) यांचा कीर्तन सोहळा झाला.

दुसऱ्या दिवशी ३० एप्रिल रोजी सकाळी सात वाजता श्री नरसिंह जयंती निमित्त महाअभिषेक पार पडेल. दुपारी ४ वाजता तोरण्यात देवस्थानकडे प्रस्थान, सायंकाळी ७ वाजता देव आणण्याचा कार्यक्रम होईल. रात्री ८ वाजता ह.भ.प. ज्ञानसिंधू सागर महाराज बोराटे यांचे कीर्तन होणार आहे. तिसऱ्या दिवशी १ मे रोजी पहाटे ४ वाजता महाअभिषेक होईल. सायंकाळी श्रींचा छबिना व भाकणूक कार्यक्रम पार पडणार आहे. सोंगाच्या गाड्या, पौराणिक देखावे आणि शोभेचे दारूकाम होईल. चौथ्या दिवशी २ मे रोजी सकाळी ८ वाजता श्रींच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. नऊ वाजता भेदिक गाणी व कलगीतुरा यांचा शिवशक्ती सामना रंगणार आहे.

सायंकाळी सोंगाच्या गाड्या, डिजिटल देखावे आणि शोभेचे दारूकाम होईल. कोमल करण पाटोळे यांचा सदाबहार गाण्यांचा कार्यक्रम याच दिवशी होईल. यात्रेच्या सांगतेला जंगी कुस्त्याचे मैदान होणार आहे. सायंकाळी सोंगाच्या गाड्या, आधुनिक देखावे आणि शोभेचे दारूकाम सादर केले जाईल. रात्री ९ वाजता एम आर्ट इंटरनॅशनलच्या वतीने शैलेश लोखंडे प्रस्तुत बारा गावच्या बारा अप्सरा हा विशेष कार्यक्रम होणार आहे.

यात्रेचा समारोप ४ मे रोजी रात्री नऊ वाजता सुभाष शिंदे निर्मित 'वैभव म्युझिकल नाईट' कोल्हापूर या कार्यक्रमाने आहे. यात्रेनिमित्त दररोज भाविकांसाठी राजवाडा हॉल येथे महाप्रसादाची व्यवस्था आहे. मोडनिंब येथील यात्रोत्सवासाठी भाविक भक्तांनी सहभागी व्हावे. असे आवाहन वेताळ देवस्थान ट्रस्टकडून करण्यात आले आहे.

**सोंगाच्या गाड्या १०० स्वयंसेवक सज्ज**

मोडनिंब येथील श्री वेताळ देवस्थान यात्रेत बालरूपी गणेश, शंकर-पार्वती, १५ फूट मोर, १५ फूट नरसिंह अवतार व २४ फूट डायनासोर हे देखावे आकर्षण ठरणार आहेत. अघोरी व कथकली सोंगांमुळे रंगत वाढणार असून २० फूट कोंबड्यांची झुंजही विशेष ठरणार आहे. सुमारे १०० स्वयंसेवक व २०० ते २५० कलाकारांच्या सहभागातून २५ ट्रॅक्टर व ३० बैलगाड्यांसह यात्रा होणार आहे.

# कोळेगावच्या सरपंचपदी सुषमा दुपडे

## विरोधी उमेदवाराला १२८२ मतांनी धोबीपछाड

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि २९ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील कोळेगांव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत जय बिरोबा ग्रामविकास युती पॅनलच्या उमेदवार सुषमा दुपडे यांनी दणदणीत यश मिळवले आहे. त्यांनी सुनीता सावंत यांचा १२८२ मतांच्या फरकाने मोठा पराभव केला.



कोळेगांव ग्राम पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक २०२२ मध्ये पार पडली होती. त्यावेळी माजी उपसरपंच धनंजय दुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील दोन्ही पॅनेलने एकत्रित येऊन निवडणूक लढवली होती. या प्रक्रियेत थेट जनतेतून रजनी दुपडे सरपंचपदी विराजमान झाल्या होत्या. मात्र, स्थानिक पातळीवर ठरल्याप्रमाणे अडीच वर्षांच्या कालावधीनंतर दुपडे यांनी राजीनामा दिला. रिक्त झालेल्या याच जागेसाठी ही पोटनिवडणूक घेण्यात आली. निवडणुकीत सुषमा दुपडे यांना २२८५ मते मिळाली, तर सुनीता सावंत यांना १००३ मते मिळाली. २२ मते 'नोटा'ला मिळाली. एकूण १२८२ मताधिक्य मिळवत सुषमा दुपडे यांनी सरपंचपदावर मोहोर उमटवली. तसेच प्रभाग क्रमांक दोन मधील सदस्य पदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत ओमराजे सावंत यांनी बाजी मारली. त्यांना ४७१ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी सिद्धनाथ दुपडे यांना १६६ मते मिळाली. १३ मते नोटाला मिळाली. ३०५ मताधिक्याने सावंत विजयी झाले. निकालानंतर नवनियुक्त सरपंच सुषमा दुपडे आणि सदस्य ओमराजे सावंत यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आ. उत्तम जानकर यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी आ.उत्तम जानकर यांनी दोन्ही विजयी उमेदवारांचा सत्कार केला.

**कोळेगांवच्या पाचव्या महिला सरपंच**

कोळेगांव ग्रामपंचायतीचा महिला सक्षमीकरणाचा समृद्ध वारसा यंदाही कायम राहिला आहे. सुषमा दुपडे या कोळेगावच्या पाचव्या महिला सरपंच म्हणून कारभार पाहणार आहेत. यापूर्वी लतिका बेंद्गुडे आणि संगीता बेंद्गुडे यांनी सदस्यांमधून, तर प्रमिला दुपडे आणि रजनी दुपडे यांनी थेट जनतेतून सरपंच म्हणून गावचा विकास साधला आहे.

# अणूशास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर शनिवारी 'स्वेरी'त येणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ एप्रिल -**

अणुशास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर शनिवारी दि. २ मे रोजी गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये येणार आहेत. त्यांच्या हस्ते सकाळी ०९.३० वाजता अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर-स्वेरीचे (ए.सी.आय.सी.-स्वेरी) उदघाटन होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार समाधान आवताडे हे राहणार आहेत. आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार राजू खरे आणि आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पंढरपूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक प्रशांत डगळे, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे, पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूरच्या पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांची उपस्थिती राहणार आहे. दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरच्या स्थापनेसाठी नीती आयोगाबरोबर सामंजस्य करार झाला होता. हे केंद्र हे ग्रामीण भागातील उद्योजकता आणि रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करणार आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सोबस इनसाइट फोरमचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिग्विजय चौधरी व अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर-स्वेरीचे आशिष भूतडा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

# सुट्टीच्या दिवशीही सीईओ कुशल जैन यांची पानगावला धाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल**

बार्शी तालुक्यातील पानगाव येथे रविवारी सुट्टीच्या दिवशीही जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी अचानक भेट देत गावातील विविध विकासकामांचा आणि नागरिकांसाठी सुरू असलेल्या मूलभूत सुविधांचा सखोल आढावा घेतला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढत्या तापमानामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी विशेषतः पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी केली.



यावेळी सीईओ जैन यांनी गावातील उपलब्ध पाण्याचे स्त्रोत, विहिरी, बोअरवेल तसेच जलसाठा स्थितीची माहिती घेतली. तसेच सुरू असलेल्या पाण्याच्या टाकीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गती वाढविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. गावकऱ्यांना उन्हाच्या तीव्रतेपासून संरक्षण मिळावे, यासाठी आवश्यक जनजागृती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. ग्रामस्थांनी कडक उन्हाळ्यात पुरेसे पाणी पिणे, दुपारच्या वेळेत अनावश्यक बाहेर न पडणे, वृद्ध व लहान मुलांची विशेष काळजी घेणे, तसेच आरोग्याशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत सूचना करण्यात आल्या.यानंतर त्यांनी गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य सुविधा, औषधसाठा, कर्मचारी उपस्थिती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती घेतली. अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी सेवा अधिक प्रभावीपणे देण्याचे निर्देश दिले. उपअभियंता वाघमारेंनी गावातील पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, सुरू असलेली कामे आणि भविष्यातील नियोजनाबाबत सविस्तर माहिती सादर केली. सुट्टीच्या दिवशीही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावपातळीवर येऊन समस्या जाणून घेतल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. सीईओंच्या या भेटीमुळे प्रशासन गावकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचा संदेश नागरिकांमध्ये गेला.

# 'हर घर योद्धा' उपक्रम अंतर्गत युवतींना स्वसंरक्षणाचे धडे

**सोलापुरात युवतींचा स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**



वाढत्या महिला अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर युवतींना सक्षम व आत्मनिर्भर बनवण्यासाठी हिंदू जनजागृती समिती यांच्या 'हर घर योद्धा' अभियानांतर्गत सोलापूरमध्ये विविध ठिकाणी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सहभागी युवतींना कराटे, लाठी-काठी, निःशस्त्र युद्धकला, नानचाकू, विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रशिक्षण दिले.

शारीरिक प्रशिक्षणासोबतच समाजात सुरक्षित वावर कसा ठेवावा, प्रसंगी तत्परतेने कसा प्रतिसाद द्यावा आणि हिंदु धर्माचरणाचे महत्त्व याविषयीही मार्गदर्शन करण्यात येत आहे. या उपक्रमांना समाजातील अनेक युवती व महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुढील २ महिन्यांच्या कालावधीमध्ये सोलापूर शहरातील अनेक भागात अश्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. आज पर्यंत जुने घरकुल, नीलम नगर आणि आकाशवाणी केंद्र परिसर याभागात हे शिबिर यशस्वी पार पडले आहे.

यामध्ये ७५ हुन अधिक युवतींनी सहभाग नोंदवला आहे. शिबिराच्या शेवटी सर्व सहभागी युवतींना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. यावेळी युवतींचे पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. तसेच नगरसेवक बसवराज केंगनाळकर, नगरसेविका कलावती गदगे, नगरसेविका सारिका खजूरगी, हिंदू समाज संघटनेचे शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते पवन देसाई यांनीही उपस्थिती दर्शवली.

शिबिराकरिता हिंदु जनजागृती समितीचे प्रशिक्षक शिवलीला गुब्याड, शैलजा सामलेटी, अविनाश त्रिमल, धनंजय बोकडे, यश मुगड्याल, लिंगराज हुळ्ळे इत्यादी प्रयत्न करत आहेत.

# पीरिपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दिले सामूहिक राजीनामे

**सर्वांचा रिपब्लिकन सेना पक्षात सामूहिक प्रवेश**

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात पीपल्स रिपब्लिकन पार्टीला मोठा धक्का बसला आहे. युवक प्रदेशाध्यक्ष सोमनाथ भोसले व जिल्हाध्यक्ष अमित कांबळे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत. सर्वांनीच सामुहिक रित्या रिपब्लिकन सेना पक्षात प्रवेश केला आहे.



महिला आघाडी जिल्हाध्यक्ष आशा रिकीबे, युवक जिल्हाध्यक्ष विश्वजीत सरवदे, सोलापूर शहराध्यक्ष शरणु हजारे, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख मेहबूब शेख, सोलापूर मीडिया प्रमुख सद्दाम पठाण, बारामती तालुकाध्यक्ष आनंद लोंढे, माळशिरस तालुकाध्यक्ष विश्वास उगाडे, तालुका कार्याध्यक्ष संतोष गायकवाड, युवक तालुकाध्यक्ष विकी लोंढे, तालुका सरचिटणीस दयानंद कांबळे, संपर्कप्रमुख राजू बागवान, अकलूज शहराध्यक्ष शिवाजी खडतरे, शहर उपाध्यक्ष साजिद बागवान, अकलूज शहर महिला आघाडी तालुकाध्यक्ष पुष्पा भडंगे, तालुका संघटक अभिषेक पवार, तालुका प्रसिद्धी प्रमुख योगेश ढावरे, तालुका युवक प्रसिद्धी प्रमुख स्वप्नील उगाडे, तालुका सहप्रसिद्धीप्रमुख बॉबी उगाडे, तालुका युवक सरचिटणीस सतीश उगाडे, तालुका युवक सहसरचिटणीस प्रकाश उगाडे, तालुका कार्यकारणी सदस्य मारुती भोरे, विजय मलमे, अकलूज शहर सरचिटणीस मन्सूर काझी, पंढरपूर तालुकाध्यक्ष सचिन जाधव, पंढरपूर तालुका संपर्कप्रमुख सावता नवगिरे, पंढरपूर तालुका सरचिटणीस गणेश गायकवाड, इंदापूर तालुका प्रभारी संतोष गायकवाड, इंदापूर तालुका संपर्कप्रमुख श्रीमंत नरुटे, रवी कोळी, अरुण कोळी, अर्जुन कोळी, सचिन चव्हाण, मुनाफ कुरेशी, आदेश थोरात, अर्जुन जाधव, सागर कोळी यांच्यासह अनेक पदाधिकारी व समर्थकांनी पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्याकडे राजीनामे पाठवले. राजीनामे दिल्यावर सर्वांनी रिपब्लिकन सेना पक्षात अधिकृत प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, ॲड.अमन आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष डॉ.सुशिल सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी सोमनाथ भोसले यांची रिपब्लिकन सेनेच्या फादर बॉडीच्या राज्य सचिवपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. नियुक्तीनंतर भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.



# छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्तीच्या अध्यक्षपदी नलवडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळ अध्यक्षपदी रोहित नलवडे यांची निवड करण्यात आली. २०२६ सालच्या जयंती उत्सवासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली.

उपाध्यक्षपदी करण मोरे व दिपक डोंगरे, कार्याध्यक्षपदी समर्थ बिराजदार, तर नियोजन प्रमुखपदी वीरेश कलशेट्टी यांची निवड करण्यात आली.यावेळी सोमनाथ राऊत, श्याम कदम, मल्लू सलगर यांनीही आपले विचार मांडले.

बैठकीस राजाभाऊ आलुरे, बंटी रोडगे, विक्रांत जाधव, महेश जगदाळे, पंकज काटकर, गणेश कदम, अमोल झाडगे, निलेश शिंदे तसेच विश्वस्त अभिजीत बंटी सोनके, निशांत सावळे, राहुल दहिहंडे, अजिंक्य पाटील, हरिभाऊ सावंत, राजाभाऊ गेजगे, पवन आलुरे, संदीप चेळेकर, नागेश भोसले, सूरज पाटील, राज पवार, राज शिंदे, अजय देवकर, अजिंक्य शिंदे, सोहम शेळके आदींसह असंख्य शिव-शंभू भक्त उपस्थित होते.

# सोलापूरच्या विकासासाठी मुख्यमंत्र्यांकडून महापौरांना शुभेच्छा

## महापौर विनायक कोंड्याल यांचा केला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

सोलापूर महापालिका निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजयी झालेले आणि महापौरपदी निवड झालेले विनायक कोंड्याल यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी सोलापूरच्या विकासासाठी महापौर कोंड्याल यांना शुभेच्छा दिल्या. सोलापूर शहराच्या राजकारणात म हत्त्वाची नोंद ठरलेल्या घडामोडीत, महापालिका निवडणुकीत सर्वाधिक मतांनी नगरसेवक म्हणून विजयी ठरलेले आणि महापौरपदी बिनविरोध निवड झालेले विनायक कोंड्याल



यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोंड्याल यांच्या नेतृत्वगुणांचे आणि जनतेप्रती बांधिलकीचे कौतुक केले. सन्मानामुळे सोलापूरच्या विकासासाठी बळ मि ळाल्याचे मानले जात आहे. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख यांच्यासह महापालिका पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. महापौरपदी बिनविरोध निवड होणे ही केवळ राजकीय कामगिरी नसून जनतेचा विश्वास आहे. सोलापूर हे ऐतिहासिक आणि औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचे शहर असून शहराच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य घेऊन पारदर्शक आणि गतीमान कारभार करणार असल्याचे महापौर कोंड्याल यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांनी १३७८ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा महाप्रकल्पास मंजुरी दिल्याबद्दल आभार मानले.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि नागरी सोयीसुविधा यावर विशेष भर देण्याचा विश्वास महापौर कोंड्याल यांनी व्यक्त केला. स्थानिक पातळीवर सातत्याने विकासकामे राबवणे, नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडवणे आणि सर्वसामान्यांशी थेट संवाद ठेवणे ही महापौर कोंड्याल यांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैली राहिली आहे. याच कामाच्या जोरावर त्यांनी सोलापूरकरांचा विश्वास जिंकत विक्रमी मतांनी विजय संपादन केला.

# गोरक्षकाकडून ५ हजारांची खंडणी; तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धम की देऊन एका गोरक्षकाकडून ५ हजार रुपये उकळण्यात आले. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा नोंद केला आहे. प्रताप डावरे, शशिकांत फाटके व सुरज गायकवाड (सर्व रा.) असे गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत.

विशाल उपासे (वय २४, रा. प्लॉट नं. २७१, किसान नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार मंगळवारी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यासमोर घडला. २७ एप्रिल रोजी रात्री सुमारास मोहोळ येथून गाडीमध्ये (क्र. एमएच १२ टीडी २५५५) गाई भरून सोलापूरकडे येत असल्याची माहिती फिर्यादीने त्याचे मित्र अनिकेत गोरटयाल व सौरभ कुलकर्णी यांना फोन करून सांगितली होती. मंगळवारी दुपारी फिर्यादी व त्याचे मित्र संबंधित वाहनाचा शोध घेत असताना संशयित वाहन सोलापूर टेक्सटाईलसमोर दिसल्यानंतर चालक गाडी सोडून पळून गेला. फिर्यादी व त्यांचे मित्र यांनी गाडी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आणली. तेव्हा तिघा आरोपींनी त्यांना अडवले आणि तुम च्या गोरक्ष मित्रांनी आमच्या गल्लीतील महिलांची छेडछाड केली आहे असे सांगत शिवीगाळ केली. तसेच तुमच्या विरोधात तक्रार देऊ, अन्यथा १५ हजार रुपये द्या अशी मागणी केली. तेव्हा खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवल्याने फिर्यादीने घाबरून आरोपींना ५ हजार दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## महत्वाचे...



### करजगी येथे ग्रामीण रुग्णालयास जागा उपलब्ध करून देणार : पालकमंत्री

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

मौजे करजगी, ता. अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावाचा आज मंत्रालयात सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद मालकीचे प्राथमिक आरोग्य केंद्र, जनावरांचा दवाखाना तसेच जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेची जागा ग्रामीण रुग्णालयासाठी वापरण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच, ग्रामीण रुग्णालयासाठी जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याच्या पर्यायाचाही विचार करण्यात आला. या निर्णयामुळे करजगी परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम व दर्जे दार आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. संबंधित प्रस्तावावर आवश्यक ती मंजुरी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रशासनाला निर्देश देण्यात आले.



### पोतू परिवाराचे सांत्वन

**सोलापूर, दि.२९ एप्रिल-**

सोलापूर शहरातील एनटीआर अभिमान संघमचे रामुलू पोतू यांचे चिरंजीव शंकर पोतू यांचे निधन झाल्याने त्यांचे घरी जाऊन त्यांच्या कुटुंब सदस्यांना तेलुगु देशम पार्टीचे तेलंगणा येथील माजी आम दार बक्कनी नरसिंहमलू, अखिल भारतीय एनटीआर संघमचे अध्यक्ष एस.सतीशकुमार, जनरल सेक्रेटरी बी.प्रविणकुमार, तसेच स्थानिक नेते तिपण्णा गणेरी, जनार्दन इंजामुरी त्यांचे कुटुंबीय गणेश पोतू, श्रीहरी बिल्ला आदींनी श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यात आले. सहानुभूती व्यक्त करण्यात आली.

### अटलबिहारी धर्मादाय हॉस्पीटलचा प्रारंभ

**सोलापूर, दि.२९ एप्रिल-**

शांतीदुत शेतकरी राजा सेवाभावी संस्था संचलित अटलबिहारी धर्मादाय हॉस्पीटलचा अक्षयतृतीयेच्या मुहुर्तावर १९ एप्रिल रोजी प्रारंभ करण्यात आला. उद्घाटन समारंभाला उपमहापौर देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, शिंदे सेनेचे अर्जुन सलगर, माजी प्राचार्य सुरेश पवार, ॲड. प्रकाश कुलकर्णी, म्हमाणे, लक्ष्मीकांत पुजारी, हणमंत काळे, भारती कोळी, डॉ. सचिन चौधरी, डॉ. जागृती चौधरी, शुभम कांबळे, संस्थेचे चेअरमन शेषेराव राठोड आदी उपस्थित होते. यावेळी रुग्णांचे विशेष शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा, शेषेराव राठोड, सचिव मीनाक्षी राठोड यांनी केले. सुत्रसंचालन लक्ष्मीकांत पुजारी, तर आभार प्रदर्शन गोविंद ढावणे यांनी केले.

### सारसबागेत भगवंत जन्मोत्सव साजरा

**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

श्री भगवंत महोत्सव मंडळ पुणेच्या वतीने मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी सारसबाग येथे श्री भगवंत जन्मोत्सवाचा कार्यक्रम म पार पडला. मंडळाचे हे पुण्यातील दुसरे वर्ष आहे. श्री भगवंत महोत्सवाचे कार्यक्रमास पहाटे साडेपाच वाजले पासून शोभा कोल्हे (श्रीवास्तव), पुणे यांच्या जन्मोत्सव किर्तनाने सुरुवात झाली. त्यानंतर बार्शी येथील नगरसेवक व उद्योजक विजय राऊत यांचे हस्ते श्रींच्या पादुकांवर अभिषेक केला. पादुका पुजनानंतर श्री महाविष्णुयाग, पादुकांवर तुळशीपत्र, पुष्प अर्पण व विष्णुसहस्त्रनाम झाले. कार्यक्रमाचे अशोक कुलकर्णी व त्यांच्या संपूर्ण टिमने पौरहित्य केले. महानैवेद्यानंतर अभिनेता समिर परांजपे (बार्शीकर), धनंजय बुडूख सराफ, परंडकर व येळाई उभयंताचे हस्ते महाआरती झाली. महाआरतीनंतर पुणेस्थित बार्शीकर भगवंत भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर देवा मोरे, शुभांगी काळे यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम झाला. याच कार्यक्रमात वेदपाठक यांनी पेन्टींगची कला श्रींच्या चरणी सादर केली. पुणेस्थित बार्शीकर या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्रित येतात. त्यासाठी सदरचा कार्यक्रम मंडळाने पुण्यात भरविण्याचे ठरविले आहे. महोत्सवसाठी मंडळाचे उपाध्यक्ष अरुण उन्हाळे, निवृत्त अधिकारी, ॲड. कैलास बडवे, प्रविण शिरसीकर, संजय जगदाळे, चिन्मय कुलकर्णी, प्रशांत जाधव, सुनंदा परांडकर, उज्वला धर्माधिकारी, सुनिता पाटील, अतुल दिक्षित, उल्हास कंधारकर, उत्तम लुंगारे, आरती देशपांडे, अभय देशपांडे यांनी परिश्रम घेतले.

# ‘लोकमंगल’ मध्ये ‘ए.आय.’ वापरावर राचर्ला यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीसंलग्नित महाविद्यालयात शेती व कृत्रिम बुद्धिमत्ता वापर याविषयी नेहा राचर्ला यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शाश्वत शेती व त्यासाठी कृत्रिम बुद्धिम त्तेचा वापर याविषयी सांगितले.

कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. वर्षा मानेदेशमुख यांनी केले. कार्यक्रमास लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

नेहा राचर्ला यांनी शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्याने संसाधनांची बचत, पर्यावरणाचे रक्षण आणि उत्पादनात



वाढ होते. अचूक सॅटेलाईट इमेज आणि ड्रोनच्या मदतीने मातीचा दर्जा, ओलावा आणि पिकांची वाढ तपासली जाते. यामुळे जिथे गरज आहे तिथेच निविष्ठांचा वापर करता येतो, असे सांगितले.

एआय सेन्सर्स जमिनीतील ओलावा आणि हवामानाचा अंदाज घेऊन पिकांना नक्की कधी आणि किती पाण्याची गरज आहे हे ठरवतात. यामुळे २५ टक्क्यांपर्यंत पाण्याची बचत होते. कीटकनाशकांचा कमी वापर, नेमकी कोणती खते किती प्रमाणात वापरावीत याचे अचूक मार्गदर्शन एआय तंत्रज्ञानामुळे मिळते, असेही त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि सोलापूर मनपा स्थापनादिनाचे औचित्य**

# इंद्रभुवनवर आकर्षक तिरंगा विद्युत रोषणाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ एप्रिल-**

महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि सोलापूर महापालिका स्थापनादिना निमित्ताने सोलापूर महापालिकेचे इंद्रभुवन, प्रशासकीय इमारत आणि कौन्सिल हॉल विद्युत रोषणाई नटले आहे. राष्ट्रध्वजातील तिरंगी रंगात विद्युत रोषणाई केली आहे.

आकर्षक मनोहारी अशा विद्युत रोषणाईने अवघा महापालिका परिसर उजळून गेला आहे. महापालिकेची इंद्रभुवन इमारत, कौन्सिल हॉल आणि प्रशासकीय इमारतींसह महापालिकेच्या परिसरातही आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. परिणामी अवघा परिसर नटलेला दिसून येतोय. सोलापूर महापालिकेच्या सर्व इमारतींवर एलईडी लाईटद्वारे आकर्षक अशी ही विद्युत रोषणाई सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार



विद्युत विभाग कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अभियंता महादेव इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम केले आहे. विद्युत रोषणाईमुळे इंद्रभुवन इमारतीचा फोटो घेण्यासाठी बुधवारी रात्री अनेकांना सेल्फी घेण्याचा मोह आवरला नाही.




अकलूज : नीरा नरसिंहपूर (ता.इंदापूर) येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिरात नवरात्र उत्सवानिमि त्त आज आम्रबनातील श्रींची सालंकृत महापुजा करण्यात आली. या महापुजेसाठी आंब्याची आकर्षक पुजा करण्यात आली होती. महापुजा पाहण्यासाठी भक्तांनी गर्दी केली होती.

# सोलापूरच्या बांधकाम कामगार कार्यालयात एजंटाना नो एन्ट्री

**▸▸पारदर्शक कारभारावर भर : झोले**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२९ एप्रिल -**

सोलापूर बांधकाम कामगार कार्यालयात एजंटांना बंदी केली आहे. परिणामी भ्रष्टाचार विरहीत पारदर्शक कारभार सुरू असल्याची माहिती इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे जिल्हा कार्यकारी अधिकारी मंगेश झोले यांनी दिली.

कार्यालयात यापूर्वी खासगी एजंटांचा सुळसुळाट होता. यामुळे कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. भांडी वाटप, शिष्यवृत्ती अनुदान व वैद्यकीय उपचार बिल यामध्ये भ्रष्टाचार सुरु होता. बांधकाम कामगार हा सामान्य व गरीब कुटुंबातील सदस्य असतो . एजंट त्यांच्याकडून भरमसाठ पैसे घेऊन कार्यालयात चुकीची कामे करत होते. पदभार घेतल्यानंतर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने एजंटांना कार्यालयात बंदी केला आहे. कोणत्याही प्रकारच्या संघटना प्रतिनिधींना बांधकाम कामगारांच्या संदर्भात चौकशी करण्यासही मनाई केली आहे. त्यामुळे बांधकाम काम गारांनी प्रत्यक्ष बांधकाम नोंदणी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून स्वतःची कामे करून घ्यावीत असे आवाहन झोले यांनी केले आहे.




> बांधकाम कामगारांनी कार्यालयाशी संपर्क साधावा
> नोंदणी केलेल्या अथवा नूतनीकरणासह बांधकाम कामगार कार्यालयाशी संबंधित कामे असणाऱ्या कामगारांनी बांधकाम कामगार कार्यालयातील नोंदणी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कामे करून घ्यावीत. एजंटाची मदत घेऊ नये .
> **- मंगेश झोले,**
> प्रभारी सहायक आयुक्त, बांधकाम कामगार




# महिला व मुलींच्या सक्षमीकरणाला चालना देणार

**● सभापती अमृता वाघे; जि.प. महिला-बालकल्याण समितीची पहिली बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ एप्रिल-**

ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या सक्षमीकरणाला चालना देण्याचा निर्धार जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे यांनी व्यक्त केला.

महिला-बालकल्याण समितीची पहिली बैठक सभापती ॲड. वाघे यांच्या अध्यक्षतेखाली शिवरत्न सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बुधवारी पार पडली. सभेत चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषद सेस निधीतून राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांवरही सखोल चर्चा झाली. महिलांसाठी उपयुक्त साहित्य खरेदी, इयत्ता पाचवी ते दहावीतील मुलींना सायकल वितरण तसेच उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या योजना राबविण्यावर भर दिला. सभापती ॲड. अमृता वाघे यांनी महिला व बालकांसाठी नाविन्यपूर्ण योजना राबविण्याचा मानस व्यक्त केला.त्यासाठी सर्व सदस्य व अधिकाऱ्यांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन केले.

समितीच्या सर्व नूतन महिला सदस्यांची उपस्थिती यावेळी विशेष लक्षवेधी ठरली. बैठकीस कल्याणी तळेकर, भारती दराडे, सुजाता डोईफोडे, चेताली मुळे, दुर्गा अंकशराव, मयुरी बागल, मिनाक्षी सरतापे आणि करुणा शिवशरण उपस्थित होत्या. जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले आणि जिल्ह्यातील सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रसाद मिरकले यांनी जिल्हा परिषद स्वउत्पन्न निधी, जिल्हा वार्षिक योजना तसेच महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. प्रधानमंत्री मातृवंदन योजना, लेक लाडकी योजना आदी योजनांचा सविस्तर आढावा मांडला.

**उपक्रम, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर**

बैठकीत एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या प्रकल्पांवर चर्चा झाली. अंगणवाडी सेवांची गुणवत्ता वाढविणे, लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा प्रभावी पोहोच, पोषण आहार वितरण आणि माता-बाल आरोग्य उपक्रमांची अंमलबजावणी यावर विशेष भर दिला. डीबीटी योजनांच्या अंम लबजावणीचा आढावा घेऊन निधी वितरणात पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी सकारात्मक चर्चासत्रे, विकासाभिमुख निर्णय आणि नव्या संकल्पांसह बैठक यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# लग्नासाठी अल्पवयीन मुलीच्या वडील, बहिणीस मारहाण

**सोलापूर :** घरासमोर बेकायदा जमाव जमवून अल्पवयीन मुलीशी लग्न लावून देण्याच्या कारणावरून तिचे वडील, बहिण व नातेवाईकाला मारहाण केल्याप्रकरणी ५ जणांविरूद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ईश्वर रमेश पाटील, प्रदीप कल्लूर, ओम नागणसुरे, राहुल बडगू, मंजूनाथ व अन्य तिघांवर (सर्व रा. सोलापूर) गुन्हे दाखल केले आहेत. ईश्वर पाटील हा अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून माझ्याशी लग्न कर नाही तर मी जीव देतो असे म्हणत होता. मंगळवारी तो व अन्य आरोपी फिर्यादीच्या घरासमोर जमा झाले. ईश्वर पाटील माझे तुमच्या मुलीसोबत लग्न लावून द्या असे मुलीच्या वडिलांना म्हणू म्हणाला. तेव्हा वडीलांनी ती लहान आहे, तिचे वय पुर्ण झाल्यानंतर विचार करू असे सांगितले. तेव्हा ईश्वर पाटीलसह वरील आरोपींनी तुम्हाला समजत नाही का? असे म्हणत शिवीगाळ करीत वडिलांना लाथाबुक्यांनी मारहाण सुरू केली.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गोपाळवाडीत घरफोडी : ७७ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ एप्रिल -**

धाराशिव तालुक्यातील गोपाळवाडी येथे एकट्या वृद्ध महिलेच्या घरात घुसून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.



फिर्यादी हनुमंत धोंडीराम मोटे (वय ५३, रा. गोपाळवाडी, ता. जि. धाराशिव) यांच्या आई घरी एकट्याच होत्या. त्या घराचा दरवाजा पुढे करून झोपल्या असताना अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश केला.

चोरट्याने कपाट उघडून त्यामधील सुमारे ८ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने आणि ३०,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ७७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या घटनेप्रकरणी हनुमंत मोटे यांनी दि.२८ एप्रिल रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### उमरगा पं.स. सभापतींची जिल्हाधिकाऱ्यांशी भेट

**उमरगा, दि.२९ एप्रिल -**

उमरगा पंचायत समितीच्या सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी धाराशिव येथे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची भेट घेऊन तालुक्यातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी सभापती चौगुले यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा वृक्षरोप देऊन सत्कार केला. तसेच ज्ञानज्योती फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या सामाजिक उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. जलसंवर्धनासाठी शासनाच्या 'जलतारा' प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी ज्ञानज्योती फाउंडेशन व पंचायत समितीच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली. या भेटीदरम्यान निवासी जिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांचीही उपस्थिती होती.



### 'सेवा हक्क दिन' निमित्त शंकरराव पाटील महाविद्यालयात शपथविधी

**भूम, दि.२९ एप्रिल -**

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन' निमित्त दि.२८ एप्रिल रोजी शंकरराव पाटील महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या निर्देशानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सेवा हक्काबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शपथविधी कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी एकत्रितपणे सेवा हक्क दिनानिमित्त प्रतिज्ञा घेतली. शासकीय सेवा नागरिकांना पारदर्शक, वेळेत व प्रामाणिकपणे देण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच सेवा वितरण प्रक्रियेत कोणताही विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होऊ नये यासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही देण्यात आली. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.



### डॉ. आंबेडकर साखर कारखान्यास विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट

**धाराशिव, दि.२९ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साखर कारखाना येथे तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. प्राचार्य डॉ.व्ही.व्ही. माने व विभागप्रमुख डॉ.डी. डी. दाते यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सहलीत विद्यार्थ्यांनी साखर निर्मिती, को-जनरेशन, डिस्टिलरी तसेच सौर ऊर्जा प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली. कारखान्याचे इंजिनिअर अनिकेत भोरे, सुरवसे व जगदाळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्यांनी अपारंपारिक ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयात सौर ऊर्जा प्रकल्प व स्टार्टअपसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णयही व्यक्त करण्यात आला.

### इमारत उभारली, पण पक्षकारांसाठी बसण्याचीही व्यवस्था नाही; उन्हात नागरिकांची कुचंबना...

# तुळजापूर न्यायालयाच्या नव्या इमारतीत सुविधांचा अभाव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ एप्रिल -**

शहरापासून सुमारे साडेतीन ते चार किलोमीटर अंतरावर उभारण्यात आलेल्या नव्या भव्य न्यायालयीन इमारतीत मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. काही महिन्यांपूर्वीच या इमारतीचे उद्घाटन झाले असून, न्यायासाठी येणाऱ्या पक्षकारांना मात्र प्राथमिक सोयींसाठीही त्रास सहन करावा लागत आहे.









न्यायालयात येणाऱ्या नागरिकांसाठी साधी आसन व्यवस्था देखील उपलब्ध नसल्याने अनेक पक्षकार इमारतीबाहेरील व्हरांड्यात जमिनीवर बसलेले दिसतात. भव्य इमारतीच्या तुलनेत पक्षकारांसाठी स्वतंत्र वेटिंग रूमची अपेक्षा असताना ती व्यवस्था करण्यात आलेली नाही. वकिलांसाठी सुसज्ज बैठक व्यवस्था उपलब्ध आहे; मात्र पक्षकारांकडे दुर्लक्ष झाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. तालुक्याच्या विविध भागांतून नागरिक उन्हातान्हात न्यायालयात येतात. त्यामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी असते. वकिलांच्या कक्षाबाहेर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली तरी त्याची योग्य देखरेख होत नसल्याची तक्रार आहे. तसेच वॉशरूम व पाण्याच्या ठिकाणांसाठी दिशादर्शक फलक नसल्याने नागरिकांना सुविधा शोधताना अडचणी येतात.

इमारतीत पुरेशा कचरापेट्यांचीही कमतरता असून, काही ठिकाणी ठेवलेल्या तात्पुरत्या खोक्यांचा गैरवापर होत असल्याने परिसर अस्वच्छ दिसत आहे. 'न्याय मंदिर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणीच घाणीचे साम्राज्य वाढल्याने नाराजी व्यक्त होत आहे. तसेच, साऊंड सिस्टिम किंवा माईकद्वारे पुकारा करण्याची व्यवस्था नसल्याने नागरिकांना कामकाजाबाबत माहिती मिळण्यात अडचणी येतात. डिजिटल युगातही न्यायालयीन कामकाज जुन्याच पद्धतीने सुरू असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

नव्या इमारतीत पक्षकारांसाठी वेटिंग रूम, पंखे-एसी, बसण्याची व्यवस्था आणि साऊंड सिस्टिम उभारल्यास नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, अशी मागणी होत आहे.

#### उन्हाच्या पार्श्वभूमीवर सुविधांची गरज...

सध्या उन्हाचा पारा ४० अंश सेलसेस्स च्या पुढे गेला असून प्रशासनाकडून 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. सकाळी आठ वाजल्यानंतरच कडक ऊन पडत असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत न्यायालयाने पक्षकारांसाठी वेटिंग रूम, पिण्याचे पाणी, पंखे व अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## तिळगुळाच्या बहाण्याने जाळ्यात ओढलं! : शेतातून पळवून नेऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार; धर्मांतरासाठी दबाव

**पारगावच्या अरबाज शेखविरुद्ध गुन्हा दाखल... आरोपी पोलिसांच्या ताब्यात...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ एप्रिल -**

वाशी तालुक्यात तिळगुळ देण्याच्या बहाण्याने अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवत तिला जाळ्यात ओढून शेतातून पळवून नेऊन अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पारगाव येथील अरबाज शेख याच्याविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार आणि फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपीने सुरुवातीला तिळगुळ देण्याच्या बहाण्याने मुलीशी ओळख वाढवत तिचा विश्वास संपादन केला. या विश्वासाचा गैरफायदा घेत, शेतात एकटी असताना तिला फसवून नेऊन जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. यावेळी तिचे फोटो व व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी देत तिला गप्प ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे समोर आले आहे.

घटनेनंतर आरोपीने वारंवार संपर्क साधत मुलीवर दबाव टाकला. नकार दिल्यास सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी देऊन तिला भीतीच्या छायेत ठेवण्यात आले. पुढे जबरदस्तीने चारचाकी वाहनातून बाहेरगावी नेऊन काही दिवस एका खोलीत ठेवत अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या काळात मारहाण, उपाशी ठेवणे तसेच धर्मांतर करून लग्न करण्यासाठी दबाव टाकल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

पीडितेने पोलिसांकडे धाव घेतल्यानंतर हा संतापजनक प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतल्याची माहिती मिळत असून या प्रकरणाचा पुढील तपास वाशी पोलीस करत आहेत.

## खा. निंबाळकर यांना 'कार्यक्षम खासदार पुरस्कार'



### भूममध्ये सत्कार..

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ एप्रिल -**

नाशिक येथे ज्येष्ठ पत्रकार व समाजवादी विचारवंत स्वर्गीय आमदार माधवराव लिमये यांच्या स्मृतिपित्यर्थ दिला जाणारा 'कार्यक्षम खासदार पुरस्कार' खा. ओमराजे निंबाळकर यांना प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा भूम येथे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख डॉ. चेतन बोराडे यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला.

धाराशिव लोकसभा मतदारसंघात त्यांनी जनतेशी कुटुंबातील सदस्याप्रमाणे नाळ जपली असल्यामुळेच त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून धाराशिव जिल्ह्यातील जनतेचा गौरव असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

सत्कार प्रसंगी डॉ. चेतन बोराडे यांच्यासह अविनाश बोराडे, योगेश बोराडे उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्राम पंचायत पोटनिवडणूकीतील विजयी उमेदवारांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ एप्रिल -**

तालुक्यातील येणेगुर व सुंदरवाडी ग्राम पंचायत पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विजयी उमेदवारांचा दि.२९ रोजी उत्साहात सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक विक्रमबापू बिराजदार, शहराध्यक्ष सुशील दळगडे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नेताजी कवठे यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

येणेगुर ग्रामपंचायतीत विजयी झालेल्या अश्विनी हिप्परगे यांचा तसेच सुंदरवाडी ग्राम पंचायतीत विजयी उमेदवार सुमन बाबुराव कुंभार व अंजना महादेव पवार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश दाजी बिराजदार, युवक जिल्हाध्यक्ष दिग्विजय शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष भीमा स्वामी, तालुकाध्यक्ष बाबा जाफरी, लोहारा तालुका अध्यक्ष सुनील साळुंखे, युवक उपाध्यक्ष शमशोद्दीन जमादार यांनी विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी रमेश बिराजदार, मोहन शिंदे, अप्पू हिप्परगे, राम शिंदे, प्रदीप कांबळे, फैय्याज पठाण, नितीन सुरवसे, महादेव पवार, बाबुराव कुंभार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## परंडा पोलिसांची मोठी कारवाई : १४ जर्शी गायींची बेकायदेशीर वाहतूक उघड, दोन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ एप्रिल -**

वारदवाडी ते भुम रोडवरील वांगी बु. येथील नायरा पेट्रोलपंप परिसरात परंडा पोलिसांनी मध्यरात्री मोठी कारवाई करत गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक उघडकीस आणली. या प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

दि.२८ एप्रिल रोजी पहाटे १२.१५ वाजताच्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला. यावेळी आयशर ट्रक (क्र. एमएच २५ बी ९१९०) अडवून तपासणी केली असता त्यामध्ये १४ जर्शी गायी निर्दयतेने कोंबून वाहतूक केली जात असल्याचे आढळले. या जनावरांची एकूण किंमत सुमारे ११ लाख २० हजार रुपये असून, वाहनासह एकूण मुद्देमाल १५ लाख ४० हजार रुपये इतका आहे. या प्रकरणी आरोपी साजीद अब्दुल रहीम कासार (वय ३६, रा. वाढवना बु., ता. उदगीर, जि. लातूर) आणि फारुक कुरेशी (रा. अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपींनी जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता अत्यंत क्रूरपणे कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. यावरून परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस पुढील तपास करत असून, या प्रकरणामागील मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## तरुणाला लुटले : २ तोळ्याची सोन्याची अंगठी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ एप्रिल -**

तुळजापूर ते लातूर रोडवरील आरणी पाटी परिसरात तरुणाला अडवून मारहाण करत त्याच्याकडील सोन्याची अंगठी व रोख रक्कम लुटल्याची घटना घडली. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आदित्य शाम शिंदे (वय २३, रा. एल.आय.सी. कॉलनी, लातूर) हे आपल्या मित्रासह प्रवास करत असताना दि. २८ एप्रिल रोजी आरणी पाटी जवळ आले होते. त्यावेळी आरोपी तौशीफ बशीर बागवान, चेतन गजेंद्र आदटराव आणि अतिश बाळू लोहार (सर्व रा. करजखेडा, ता. जि. धाराशिव) यांनी त्यांना अडवले. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मित्राला लाथाबुक्यांनी मारहाण करत फिर्यादीच्या हातातील सुमारे दोन तोळ्यांची सोन्याची अंगठी व १,००० रुपये रोख जबरदस्तीने हिसकावून घेतले आणि तेथून पसार झाले.

या घटनेबाबत बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## मुरूममध्ये बसव जयंतीनिमित्त मिरवणूक; 'कांतरा' पथकाचे थरारक सादरीकरण

**जय बसवेश्वरच्या घोषणांनी शहर दुमदुमले; हजारो भाविकांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२९ एप्रिल -**

मुरूम येथे महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने बसव जयंतीनिमित्त सोमवारी (दि.२७) सायंकाळी भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. शहरभर दुमदुमलेल्या या मिरवणुकीत सातारा येथील 'कांतरा' पथकाने सादर केलेल्या थरारक नृत्याने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या मिरवणुकीत शहर व परिसरातील बसवप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. बसवेश्वर चौक ते साठे चौक, टिळक चौक, किसान चौक मार्गे हनुमान चौक असा मार्ग पार करत रात्री उशिरापर्यंत मिरवणूक उत्साहात सुरू होती.



'जय बसवेश्वर'च्या घोषणांनी संपूर्ण शहरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.

मिरवणुकीतील प्रमुख आकर्षण ठरलेल्या 'कांतरा' पथकाच्या कलाकारांनी पौराणिक वेशभूषेत सादर केलेले नृत्य प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले. त्यांच्या सादरीकरणाला नागरिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.





कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शिवा दुर्गे, उपाध्यक्ष गौरीशंकर बोंगरगे, सचिव बाळासाहेब गव्हाणे, सहसचिव महादेव मुलगे यांच्यासह निखिल वाले, गौरी मुदकणा, साहिल निंबरगे, नागेश मुदकणा, सिद्धार्थ चिलोबा, प्रताप गिरीबा, ओंकार कुंभार, पृथ्वीराज गव्हाणे, धनंजय मुदकण्णा, सागर खुणे, नमन मुदकणा, गुरुराज शेळके, राहुल घुरघुरे, ओमकार मुदकण्णा, वैभव मुदकण्णा, कैलास ख्याडे, राजकुमार वाले, सागर कंटेकुरे, प्रदीप गव्हाणे, दत्ता हुळमुजगे, नंदकुमार उपासे, महेश निंबरगे, शरद स्वामी, अप्पू सगरे, नागेश शिंदे, श्रीशैल्य चिलोबा, मनोज कटारे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दरम्यान, मुरूमचे पोलिस अधिकारी संदीप दहिफळे यांनी आपल्या पथकासह मिरवणुकीदरम्यान चोख बंदोबस्त ठेवला. या मिरवणुकीमुळे शहरात उत्साह, भक्ती आणि सामाजिक एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### अतुल माने पाटील यांची बिनविरोध निवड



तभा वृत्तसेवा
**शिरूर अनंतपाळ दि. २९ एप्रिल :** तालुक्यातील मौजे लक्कडजवळगा येथील भुमीपुत्र माजी सरपंच व तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते,एक अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे कोणाच्याही संकटात धावून जाणारे एक दिलदार वैक्तीमत्व असलेले राजकीय व सामाजिक व तसेच सहकार क्षेत्रात कार्यरत असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुरज दादा चव्हाण यांचें अतिशय विश्वासू असलेले,अतुल सुभाषराव माने पाटील यांची महाराष्ट्र नागरी बैंकेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल शिरूर अनंतपाळ तालुक्यातील त्यांच्या चाहत्यांकडुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.यात धनंजय पाटील चेअरमन थेरगाव, अब्दुल अजीज मुल्ला सरपंच साकोळ, रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव पेठे तसेच विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, राजकीय पक्ष, कार्यकर्ते यांनी त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या.

### रेणापूर येथे जनगनना प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण संपन्न



तभा वृत्तसेवा
**रेणापूर दि.२९ एप्रिल :** जनगनना २०२६ अंतर्गत प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण दि २७ एप्रिल ते २९ एप्रिल २०२६ दरम्यान . रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे संपन्न झाले प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन रेणापूर नगर पंचायतचे मुख्याधिकारी अजित कुमार डोके यांच्या हस्ते व प्रशासकीय अधिकारी प्रदिप पाटिल , ज्ञानदेव दहिफळे . केंद्रिय मूख्याध्यापक गोपाळ पडीले , फिल्ड ट्रेनर बाबासाहेब इंगळे , संजय राउत यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या जनगणने अंतर्गत पहिल्या टप्यात घर यादी,घरगणना व दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्या जनगनना होणार आहे .१ते १५ मे दरम्यान होणाऱ्या स्वगणनेत सर्व नागरीकांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा व जनगननेच्या कार्यात सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन करून मुख्याधिकारी अजितकुमार डोके यांनी जनगणनेचे महत्व सांगून उपस्थितांना या राष्ट्रीय कार्यासाठी शुभेच्छा दिल्या .या प्रशिक्षण सत्रास ३८ प्रगणक ७ पर्यवेक्षकांनी प्रशिक्षण घेतले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्र्वर स्वामी यांनी केले . याप्रसंगी पर्यवेक्षक , प्रगणक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते .

### पोलिस मुख्यालय येथे राष्ट्रध्वज वंदन

तभा वृत्तसेवा
लातूर **दि. २९ एप्रिल :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ८ वाजता पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होणार आहे. या मुख्य शासकीय समारंभाचे आयोजन बाभळगाव रोडवरील पोलिस मुख्यालय प्रांगणावर करण्यात आले आहे. याप्रसंगी राष्ट्रध्वज वंदन आणि भव्य संचलन (परेड) पार पडणार आहे. या कार्यक्रमाला लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी राष्ट्रीय किंवा समारंभीय पोषाख परिधान करावा. तसेच, सर्व निमंत्रितांनी सोहळा सुरू होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी आसनस्थ व्हावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### खड्डेमय रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २९ एप्रिल : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाच नंबर चौक रेल्वे लाइनच्या समांतर रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक कमी झाली आहे. परिणामी, मुख्य रस्त्याने वाहतूक कोंडी होत आहे. खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.

### हवामान विभागाच्या अंदाजानंतर जलसंधारणाच्या कामाला गती

## अभियानाला निधी कमी पडणार नाही; आ. अभिमन्यू पवारांचे आश्वासन




तभा वृत्तसेवा
**औसा दि.२९ एप्रिल :** भारतीय हवामान विभागाने या वर्षी कमी पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आसून व्यापक, सखोल व दुरदृष्टी ठेवून यावर्षी मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचबरोबर जलसमृद्ध अभियानांला व या अंतर्गत निवडण्यात आलेल्या सात गावांच्या एकात्मिक आणि सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. असा ठाम विश्र्वास आ. अभिमन्यू पवार यांनी औसा पंचायत समितीत झालेल्या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत संबंधित प्रशासनाला दिला आहे.
औसा पंचायत समितीत आढावा बैठक झाली. त्यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते.माजी न्यायमुर्ती आंबादास जोशी,तहसिलदार घनशाम अडसुळ,लघू पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, पंचायत समितीच्या सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती आमोल पाटील, विधानसभा प्रमुख संतोष मुक्ता, सदाशिव जोगदंड उपस्थित होते.
या जलसमृध्द अभियानांतर्गत निवडलेल्या सात गावांमध्ये सर्व शासकीय योजनांचा प्रभावी लाभ पोहोचवण्यासोबतच आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विकास आराखडा तयार करताना निधीची कोणतीही अडचण लक्षात न घेता व्यापक, सखोल आणि दूरदृष्टी ठेवून नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत.यावेळी संभाव्य पाणीटंचाई आणि हवामान खात्याने वर्तविलेल्या कमी पावसाच्या अंदाजाच्या पार्श्र्वभूमीवर औसा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला. जलसमृद्ध अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सात गावांचा आदर्श विकास केल्यानंतर, तालुक्यातील आवर्षणग्रस्त सुमारे ७० गावांमध्येही याच धर्तीवर विकास योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
या बैठकीत प्रशासनाला स्पष्ट सूचना देताना या सात गावांमध्ये सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देत प्रत्येक शासकीय योजनेचा लाभ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यावर भर देण्यात आला. तसेच, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या गावांना भेट देणार असून ही गावे राज्यासाठी आदर्श मॉडेल म्हणून उभी राहावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी सिल्क आणि मिल्क या संकल्पनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण करण्याचा मानसही आमदार पवार यांनी व्यक्त केला. आधुनिक शेती, बाजारपेठेचा अभ्यास आणि शेतीपूरक उद्योगांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर इतर गावांमध्येही हीच संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.
या बैठकीस सात गावांचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अन्नसुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक म्हणजे पशुवैद्यक : डॉ. अनिल भिकाने

तभा वृत्तसेवा
**उदगीर दि.२९ एप्रिल :** पशुवैद्यक हे केवळ जनावरांवर उपचार करणारे डॉक्टर नसून अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक आहेत, असे प्रतिपादन माफसूचे माजी विस्तार संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी केले. जिव्हाळा ग्रुपच्या वतीने जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष विश्र्वनाथराव माळेवाडीकर होते. व्यासपीठावर डॉ. रमेश बिरादार आणि डॉ. शिवकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.
डॉ. भिकाने पुढे म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत पशुवैद्यकांचे मोलाचे योगदान आहे. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ७५ वर्षांत देशातील दूध उत्पादनात तब्बल १४ पट वाढ झाली असून ते १७ दशलक्ष टनांवरून २४८ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले आहे. मांस उत्पादनात दहापट वाढ होऊन ते १ दशलक्ष टनांवरून १०.५ दशलक्ष टनांपर्यंत गेले, तर अंडी उत्पादनात सुमारे ७० पट वाढ होऊन ते २ अब्जांवरून १४९ अब्जांपर्यंत पोहोचले आहे.
देशाची लोकसंख्या चारपट वाढूनही दूध, मांस आणि अंडी यांची दरडोई उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढली आहे. दुधाची प्रतिदिन दरडोई उपलब्धता १२४ ग्रॅमवरून ४८५ ग्रॅमपर्यंत, मांसाची प्रतिवर्ष उपलब्धता ३.५ किलोवरून ७.५ किलोपर्यंत, तर अंड्यांची उपलब्धता ५ अंडी प्रतिवर्षावरून १०६ अंडी प्रतिवर्ष इतकी वाढली आहे. ही प्रगती पशुवैद्यकीय सेवेच्या योगदानामुळेच शक्य झाली.
हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर जनावरांमध्ये आढळणाऱ्या सुमारे ७५ टक्के उदयोन्मुख आजारांचा संबंध प्राणीजन्य (झुनोटिक) रोगांशी असल्याचे सांगून डॉ. भिकाने यांनी रेबीज, ब्रुसेलोसिस, क्षयरोग, बर्ड फ्लू यांसारख्या रोगांच्या प्रतिबंधात पशुवैद्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले.

## उदगीर येथे तात्काळ अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे : आ. संजय बनसोडे



तभा वृत्तसेवा
**उदगीर दि.२९ एप्रिल :** लातूर जिल्ह्यातील उदगीर शहर व परिसराचा वेगाने वाढणारा विकास, लोकसंख्या आणि प्रशासकीय कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता उदगीर येथे तात्काळ अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी शासनाकडे केली आहे.
याबाबत बोलताना आ. संजय बनसोडे यांनी सांगितले की, उदगीर हे लातूर जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर असून येथे मोठ्या प्रमाणावर शासकीय कामकाजासाठी नागरिकांना लातूर येथे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना विविध प्रशासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.
उदगीर, जळकोट या तालुक्यांतील नागरिकांना महसूल, निवडणूक, आपत्ती व्यवस्थापन, तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित कामांसाठी सुलभ सेवा मिळावी यासाठी उदगीर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
तसेच, या कार्यालयामुळे स्थानिक पातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल, निर्णय प्रक्रियेला गती मिळेल आणि नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लागतील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाचा विस्तार करणे ही काळाची गरज असून शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असेही आ.संजय बनसोडे यांनी म्हटले आहे.
उदगीरला तात्काळ अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी आ.बनसोडे यांनी महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची भेट घेतली.
दरम्यान, या मागणीमुळे उदगीर व परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रवाशावरील कर, दरवाढीचे ओझे कमी करा; अन्यथा महाराष्ट्र दिनी आंदोलनाचा इशारा



तभा वृत्तसेवा
**औसा दि. २९ एप्रिल :** सर्वसामान्य माणूस आर्थिक संकटात सापडला असतानाच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने १०% तिकीट दरवाढ करीत दोन टक्के करवाढीचे ओझे प्रवाशावर लादले आहे.याचा तीव्र निषेध करीत तात्काळ करा आणि दरवाढ रद्द करावी.अन्यथा महाराष्ट्रदिनी आंदोलन करण्याचा इशारा एमआयएमचे औसा प्रमुख सय्यद मुजफ्फरअली इनामदार यांनी मुख्यमंत्री व परिवहन मंत्री यांना निवेदनाद्वारे दिला आहे.
महामंडळाकडून करण्यात आलेल्या तिकीट दरवाढीचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे.
गेल्या काही दिवसांपासून परिवहन महामंडळाने बस तिकिटांवर सुमारे १० टक्के दरवाढ केली असून स्वच्छतेच्या नावाखाली अतिरिक्त २ टक्के शुल्क आचानकपणे आकारले जात आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता अचानकपणे केलेल्या दरवाढीमुळे सामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याचे या निवेदनात एमआयएमचे म्हटले आहे.
राज्यातील अनेक बसस्थानकांची स्वच्छता समाधानकारक नसताना अशा प्रकारचे शुल्क आकारणे चुकीचे आहे.
अनेक ठिकाणी अस्वच्छता व पाण्याचे साचलेले डबके दिसून येतात, त्यामुळे स्वच्छतेच्या नावाखाली घेतला जाणारा अतिरिक्त भार नागरिकांवर अतिरेक करीत आहे.त्यामुळे तिकीट दरवाढ व स्वच्छता शुल्क तात्काळ रद्द करून सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा. अन्यथा, येत्या १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने औसा बसस्थानकावर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी निवेदन देताना शेख अलीम, शेख मुशीर, अझहर कुरेशी, शेख जैनुऊल्ला आदि उपस्थित होते.

## अहमदपूर तालुक्यात सर्व कृषी केंद्र चालकांचा बेमुदत संप




तभा वृत्तसेवा
अहमदपूर **दि. २९ एप्रिल :** शहरासह तालुक्यातील सुमारे १२५ कृषी सेवा केंद्र चालकांनी शासनाच्या जाचक अटींच्या निषेधार्थ सोमवारपासून बेमुदत संप पुकारला असून, सर्व औषधे व रासायनिक खते विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात आली आहेत. राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाला प्रतिसाद देत अहमदपूर तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.
महाराष्ट्र कृषी निविष्ठा विक्रेते संघटनेच्या आवाहनानुसार हा संप सुरू करण्यात आला आहे. तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालकांनी एकजूट दाखवत आपली दुकाने बंद ठेवली असून, यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना खते व किटकनाशके उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या शेतीकामांना वेग आला असून, औषध फवारणी व खत व्यवस्थापनासाठी आवश्यक साहित्याच्या तुटवड्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.
दरम्यान, कृषी सेवा केंद्र मालक असोसिएशनच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शासनाने लागू केलेल्या नियमांमुळे व्यवसाय करणे कठीण होत असल्याची भावना विक्रेत्यांनी व्यक्त केली. नियमांमध्ये वारंवार होणारे बदल, तांत्रिक अडचणी आणि वाढलेली प्रशासकीय कटकट यामुळे व्यापारी वर्ग अडचणीत सापडल्याचे त्यांनी सांगितले.

### बोरोळ,देवणी रस्ता खराब झाल्याने अपघात होण्याची भिती



तभा वृत्तसेवा
**देवणी दि. २९ एप्रिल :** तालुक्यातील बोरोळ हे गाव जिल्हा परिषदेचे सर्कलचे मोठे गाव आसून जिल्ह्यातील कर्नाटक राज्याच्या सिमेवरील महत्त्वाचे गाव आहे.या रस्त्यावरुन कर्नाटक राज्यातील भालकी तालुक्यातील येणारे गाव आणि सिंधीकामठ गाव या सर्व गावातुन येणाऱ्या गाड्या मोठ्या प्रमाणावर रहदारी आहे. परंतु येथून तालुक्याला जाण्यासाठी आसणारा मुख्य रस्ता अक्षरशः चाळण झाला आसून छोटे-मोठे अपघात वाढले आहेत.
सदर रस्त्याचे खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले होते. परंतु खड्डे बुजनही गिट्टी उघडी पडल्याने खड्डे चुकविण्याच्या नादात दूचाकीस्वारांचे अपघात होण्णाची शक्यता नाकारता येत नाही. माघे जड वाहतूक म्हणजे कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे गाड्या रस्त्यावरून जात असताना संपूर्ण डांबरचा थर निघून जाऊन खड्डे पडले आहेत या खड्ड्यामुळे गाडी चालवताना गाडी पंक्चर होणे गाड्यांचे शौक्पजर खराब होणे आदी हाल होत आहेत.त्यामुळे ग्रामीण रूग्णालयातील पेशंटला ये जा करताना मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.त्याच बरोबर शेतकऱ्यांचा माल मार्केटला नेण्यासाठी रस्ता आसून आडचन निर्माण झाली आसल्याचे शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.
याकडे संबंधित आमदार आणि अधिकारी लक्ष देत नसल्याने हा रस्ता लवकर होत नाही. बोरोळ ते देवणी जाणाऱ्या रस्त्याचे काम लवकर व दर्जेदार व्हावे अशी बोरोळ ग्रामस्थांची व वाहनधारकांकडून मागणी होत आहे.

## जनगणना डिजिटल प्रक्रियेत सहभागी व्हा : उज्वला पांगरकर



तभा वृत्तसेवा
अहमदपूर **दि. २९ एप्रिल :** भारत सरकारच्या वतीने जनगणना २०२७ ची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबवण्यात येत असून, महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणना प्रक्रियेदरम्यान नागरिकांसाठी 'स्व-गणना' (SELF-ENUMERATION) ही अभिनव सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, अचूक नियोजनासाठी आणि भविष्यातील धोरणनिर्मितीसाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील स्व-गणना (SELF ENUMERATION) मोहीम १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांनी घरी बसून ऑनलाइन पद्धतीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहमदपूरच्या तहसीलदार उज्वला पांगरकर यांनी केले आहे.
'आमची जनगणना, आमचा विकास' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाने स्वतःहून स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी स्वतःची, कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदविल्यास शासनाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, उद्योग, परिवहन, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी योग्य योजना आखण्यास मोठी मदत होणार आहे. आपण भरलेले माहिती हे गोपनीय व सुरक्षित राहिल.
नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळ SE.CENSUS.GOV.IN ला भेट द्यावी. त्यानंतर मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून OTP द्वारे लॉग-इन करून राज्य, जिल्हा व स्थानिक तपशील निवडावेत. डिजिटल नकाशावर स्वतःच्या घराचे स्थान चिन्हांकित करून घर व कुटुंबाशी संबंधित ३४ प्रश्नांची माहिती भरून अर्ज सादर करावा. अर्ज यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना डए खऊ प्राप्त होईल.
सदरील मिळालेला SE ID हे क्रमांक सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.१५ मे ते १४ जून या दरम्यान प्रत्यक्ष प्रगणक आपल्या घरी घर गणना करण्यासाठी येतील तेव्हा त्यांना हा डए खऊ क्रमांक दाखवावा. प्रगणक आपण दिलेल्या आयडी वरुन घर गणना करतील. आवश्यक वाटल्यास आयडी मधील भरलेल्या माहितीची खात्री करतील. स्व-गणनेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून शासनापर्यंत अधिक अचूक माहिती पोहोचेल. माहिती संकलन व प्रक्रिया अधिक जलदगतीने होईल. डिजिटल माध्यमामुळे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक, सोपी आणि सुलभ ठरणार आहे.
जर एखाद्या नागरिकाला ऑनलाइन माहिती भरता आली नाही, तरी चिंता करण्याचे कारण नाही. प्रशासनाने नियुक्त केलेला अधिकृत ओळखपत्रधारक प्रगणक नियोजित कालावधीत घरी भेट देऊन आवश्यक माहिती नोंदवून घेणार आहे.
नागरिकांनी दिलेली सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यात येणार असून ती केवळ शासकीय कामकाजासाठीच वापरण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.
तहसील प्रशासनाच्या वतीने नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्रपरिवाराला तसेच सामाजिक माध्यमे, व्हॉट्सअ‍ॅप गट, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि युवक मंडळांच्या माध्यमातून जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तालुका खत असोसिएशनची नवी कार्यकारिणी बिनविरोध



तभा वृत्तसेवा
निलंगा **दि. २९ एप्रिल :** निलंगा खत असोसिएशनच्या अध्यक्षपदी मारुती शिंदे यांची, तर उपाध्यक्षपदी माधव मारकंड आणि दिलीप तापडिया (निटूर) यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. वृंदावन मंगल कार्यालय, निलंगा येथे झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली असून संघटनेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
सचिवपदी रविपंत कुलकर्णी यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. सदस्यपदी अमर भैया गवारे, दत्ता सूर्यवंशी, विनोद गुंजोटे व तुकाराम मुगळे यांची निवड करण्यात आली. तसेच सल्लागारपदी विलास पाटील, शिवाजी शिंदे, सिद्राम चाकोते व सुभाष सोमाणी यांची नियुक्ती करण्यात आली.
या बैठकीस निलंगा शहरासह औराद, का. शिरशी, मदनसूरी, निटूर, तुपडी, पानचिंचोली, केळगाव, माकणी, बसपूर, हंगरगा, अंबुलगा तसेच परिसरातील ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनेबद्दलचा विश्र्वास आणि एकजूट दर्शविली.
नवीन कार्यकारिणीकडून खत व्यवसायातील विविध समस्या सोडविणे, व्यापाऱ्यांचे हित जपणे आणि संघटनेची प्रगती साधणे यासाठी ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.
नवीन कार्यकारिणीला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या असून, बैठकीस उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कृषी सेवा केंद्रांचा बेमुदत बंद; शेतकऱ्यांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ एप्रिल -**

महाराष्ट्र फर्टीलायझर्स, पेस्टीसाईड्स ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनच्या वतीने राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि. २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.




गेल्या चार ते पाच वर्षांपासून कृषी विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही ठोस निर्णय न झाल्याने हा कठोर निर्णय घेतल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बंद ठेवल्यामुळे खते, बियाणे व कीटकनाशके खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.


अनेक ठिकाणी शेतकरी दुकानांसमोर प्रतीक्षा करत बसले असून, केंद्रे कधी सुरू होणार याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

खरीप हंगामाच्या तोंडावर निर्माण झालेली ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे.

---

कळंबमध्ये वारंवार वीज खंडित... नागरिक त्रस्त, अधिकारी मस्त म्हणत खुर्चीलाच निवेदन...

## अधिकाऱ्यांसह कर्मचारी मुजोर; नेमका वरदहस्त कोणाचा?



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ एप्रिल -**

शहरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचा संयम अखेर संपला असून प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सकाळपासून दिवसभरात अनेक वेळा वीज खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प होत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचेही मोठे नुकसान होत आहे.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिकारी उपलब्ध नसल्याने तसेच लोकप्रतिनिधींकडूनही प्रतिसाद न मिळाल्याने नागरिकांचा रोष वाढला. ना आमदार, ना खासदार-कोणीही फोन उचलत नाही अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, नागरिकांनी संबंधित विभागाच्या कार्यालयात धाव घेतली असता अधिकारी अनुपस्थित असल्याचे आढळले. निष्क्रिय प्रशासनाचा निषेध म्हणून संतप्त नागरिकांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन करत थेट खुर्चीलाच निवेदन देऊन आपला संताप व्यक्त केला. नागरिक त्रस्त आणि



अधिकारी मस्त अशी जोरदार घोषणा देत प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र टीका करण्यात आली. वीजपुरवठा ही मूलभूत गरज असताना प्रशासनाकडून होणारे दुर्लक्ष असह्य असल्याचा आरोप करण्यात आला.

कळंबमधील वीज समस्या तात्काळ मार्गी लावली नाही, तर आगामी काळात तीव्र व व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

या आंदोलनावेळी उपनगराध्यक्ष लखन बळीराम गायकवाड, गटनेते हर्षद अंबुरे, पाणीपुरवठा सभापती भूषण करंजकर, शितल कुमार चोंदे, प्रशांत लोमटे तसेच योजना वाघमारे आदी उपस्थित होते.

---

## मंगरुळमध्ये उन्हाचा कहर; तापमान ४२ अंश सेल्सिअस पार

**नागरिकांनी दुपारी घराबाहेर पडणे टाळावे; आरोग्य विभागाचा सतर्कतेचा इशारा...**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२९ एप्रिल -**

मंगरुळ व परिसरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून तापमानाने अक्षरशः कहर माजवला आहे. अंगाची लाही लाही करणाऱ्या या उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना याचा अधिक त्रास जाणवत आहे.

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ परिसरात यंदा तापमानाने आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडले असून जवळपास ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. बदलत्या हवामानामुळे यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र झाला आहे. पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.



> शेतकरी व शेतमजुरांनी सकाळी व सायंकाळीच कामे करावीत, दुपारी बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, डोक्यावर सुती कापड किंवा टोपी वापरावी, हलका व सकस आहार घ्यावा, फळे व भाजीपाल्याचा आहारात समावेश करावा, शक्यतो सावलीत किंवा मोकळी हवा असलेल्या ठिकाणी थांबावे.
>
> **- डॉ. वडणे,** वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरुळ

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शक्यतो अनावश्यक घराबाहेर पडू नये, विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर जाणे टाळावे, तसेच झाडाखाली किंवा मोकळी हवा येईल अशा ठिकाणी थांबावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## वाशी तालुक्यात कृषी सेवा केंद्रांचा संप; शेतकरी हैराण

**खरीप हंगामाच्या तोंडावर खते-बियाण्यांचा तुटवडा...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ एप्रिल -**

राज्यभर कृषी सेवा केंद्र चालकांनी २७ एप्रिलपासून पुकारलेल्या बेमुदत संपाचा फटका वाशी तालुक्यातही बसला असून बहुतांश दुकाने बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना खते, बियाणे आणि कीटकनाशके मिळत नाहीत. परिणामी शेतीची कामे अडकली असून शेतकरी हैराण झाले आहेत.




खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकरी पेरणीपूर्व तयारीत व्यस्त होते. मात्र दुकाने बंद असल्याने अनेकांना आवश्यक साहित्य न मिळता रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. वेळेवर खते व औषधे मिळाली नाहीत, तर पिकांचे नुकसान होईल, अशी चिंता शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. विक्रेत्यांच्या मते, खत कंपन्यांकडून बियाण्यांसोबत जबरदस्तीने 'लिंकिंग' केली जाते, ती तातडीने बंद करावी. तसेच अवैध कीटकनाशके व खते एजंटमार्फत थेट शेतकऱ्यांना विक्री होऊ नये, यावर नियंत्रण आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे. 'साथी' पोर्टलवरून बियाणे विक्री सक्तीची करण्यालाही त्यांनी विरोध दर्शवला आहे.

याशिवाय किरकोळ विक्रेत्यांवर जाचक नियम असल्याने व्यवसाय करणे कठीण झाल्याचे सांगण्यात आले. कीटकनाशक कंपन्यांनी मुदतबाह्य (एक्सपायरी) माल परत घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. विक्रेते सांगतात की, या मागण्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असून शासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे संपाचा मार्ग स्वीकारावा लागला.

दरम्यान, या आंदोलनाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांनाच बसत आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अन्यथा शेतीची कामे आणखी मागे पडतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

---

## मुख्याधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे भूम न.प.ची सर्वसाधारण सभा रद्द; नगरसेवकांचा संताप

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ एप्रिल -**

भूम नगर परिषदेत शहरातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी सोमवारी (दि. २७ एप्रिल) सकाळी ११ वाजता सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

घनकचरा व्यवस्थापन, लाड-पागे समितीमार्फत अनुकंपाधारकांना नोकऱ्या, कर्मचाऱ्यांची प्रलंबित वैद्यकीय बिले तसेच इतर तातडीचे विषय अजेंड्यावर होते.

मात्र, जबाबदारीच्या पदावर असलेले मुख्याधिकारीच सभेला गैरहजर राहिल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

मुख्याधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे संतप्त नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाच्या बेजबाबदार व निष्काळजी कारभाराचा निषेध केला. वाढत्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर अखेर सभा रद्द करण्याची वेळ आली.

दरम्यान, भूम नगर परिषदेचा मुख्याधिकारी पद सध्या प्रभारी असून, त्याची जबाबदारी नायब तहसीलदार प्रवीण जाधव यांच्याकडे आहे. मात्र, नगर परिषद प्रशासनाचा अनुभव नसल्यामुळे शहरातील कामे ठप्प झाल्याची टीका होत आहे. त्यातच सभेच्या दिवशीही प्रशासनाने निष्काळजीपणा दाखवल्याने नागरिकांच्या प्रश्नांकडे सर्रास दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे.

या घटनेमुळे भूम नगर परिषदेच्या कारभारावर नाराजीचे सावट पसरले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

यावेळी नगरसेवक अनिल शेंडगे, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड यांच्यासह इतर नगरसेवक, नागरिक उपस्थित होते.

> आम्हा सर्व नगरसेवकांना दि.१६ एप्रिल रोजी पत्रव्यवहार करून दि.२७ रोजीच्या सभेसाठी उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले होते. आम्ही सर्व उपस्थित राहिलो, मात्र मुख्याधिकारीच गैरहजर होते.
>
> **- यशवंतराजे थोरात**
> (स्वीकृत नगरसेवक, भूम)

---

## मोहम्मद शफी काझी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ एप्रिल -**

भूम तालुक्यातील ईट येथे रविवारी (दि. २६) महाराष्ट्र काझी सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष मोहम्मद शफी गुलाम नबी काझी यांचा मुस्लीम समाज बांधव व ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

सत्कारानंतर त्यांनी ईट येथील जामा मस्जिदला भेट देत समाज बांधवांशी संवाद साधला. यावेळी गफूर तांबोळी, अब्दुल्ला काझी, मोहम्मद हनीफ तांबोळी, युनूस शेख, सरदार पठाण, कामिल काझी, मैनु पठाण आदींसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## लांजेश्वर येथे 'शाळा पूर्वतयारी मेळावा' संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ एप्रिल -**

लांजेश्वर (ता. भूम) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पूर्वतयारी मेळावा क्रमांक १ उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडला. नव्याने शाळेत येणाऱ्या चिमकल्यांना शालेय वातावरणाशी जुळवून घेता यावे, शिकण्याची गोडी निर्माण व्हावी आणि सर्वांगीण विकास साधता यावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

माझे नाव, माझी आवड या ओळख परेडमधून मुलांना स्वतःची ओळख करून देण्याची संधी देण्यात आली.

कथाकथन, क्रियागीते, रंग ओळखा, आकार जुळवा, पझल्स, चित्रकला व मुक्त खेळ यांसारख्या उपक्रमांमुळे मुलांनी आनंदाने




सहभाग नोंदवला. या प्रक्रियेमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढून मित्रमैत्रिणींसोबत संवाद साधण्याची सवय निर्माण झाली.

शिक्षकांनी प्रेमळ व संयमी वर्तन ठेवत प्रत्येक मुलाचे बारकाईने निरीक्षण केले. मुलांमधील भीती दूर करून त्यांच्यात विश्वास निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. खेळावर आधारित व अनुभवाधारित शिक्षण पद्धतीचा प्रभावी वापर करण्यात आला.

या मेळाव्यात पालकांचाही सक्रिय सहभाग पाहायला मिळाला. पालकांना शाळेचे नियम, विविध उपक्रम तसेच मुलांच्या अभ्यासाची सवय कशी लावावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्यामुळे पालक-शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण झाला.

---

## टोल-फ्री हेल्पलाईन ठरतेय शेतकऱ्यांसाठी वरदान; सेरेंटिकाचा संवादप्रधान उपक्रम यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ एप्रिल -**

सेरेंटिका रिन्यूएबल्स कंपनीने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेली टोल-फ्री हेल्पलाईन ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांसाठी प्रभावी वरदान ठरत आहे. जमीन मोबदला व इतर गुंतागुंतीच्या प्रश्नांचे पारदर्शक आणि वेगवान निवारण होत असल्याने आंदोलनांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे.

कंपनीच्या सकारात्मक, संवादप्रधान आणि संवेदनशील दृष्टीकोनामुळे शेतकऱ्यांचा विश्वास वाढताना दिसत आहे. काही महिन्यांतच १८००-२०२-८७३५ हा टोल-फ्री क्रमांक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झाला असून, तो केवळ एक संपर्क क्रमांक नसून शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात ठरत आहे. सुरुवातीला कंपनीशी थेट संपर्क साधण्याचे कोणतेही माध्यम उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. मध्यस्थांमुळे गैरसमज आणि अडचणी वाढत होत्या. मात्र, कंपनीने पुढाकार घेत हा टोल-फ्री क्रमांक सुरू केल्याने शेतकऱ्यांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळू लागला. आतापर्यंत ५० हून अधिक शेतकऱ्यांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.



शेतकऱ्यांच्या तक्रारी व चौकशीस तत्काळ प्रतिसाद, जमीन मोबदल्यासाठी स्पष्ट धोरणे व न्याय्य परतावा, संवादातून गैरसमज दूर; आंदोलनांऐवजी समन्वयाला चालना शेतकरी, प्रशासन व कंपनी यांच्यात त्रिसूत्री सहकार्य होणार आहे. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी ही हेल्पलाईन सुरू केली आहे. पारदर्शकता, वेळेवर प्रतिसाद आणि न्याय्य मोबदला या तत्त्वांवर आम्ही ठाम आहोत, असे कंपनीचे असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट सुरजीत नारायण यांनी सांगितले. तसेच ही सेवा अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जागरूकता मोहिमा राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

योग्य मोबदला आणि स्पष्ट प्रक्रियांमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हेल्पलाईनमुळे तक्रार निवारणाची प्रक्रिया अधिक मजबूत झाली असून, धाराशिव जिल्हा हरित ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

सेरेंटिका रिन्यूएबल्सचे ध्येय केवळ प्रकल्प उभारणे नसून समुदाय सशक्त करणे, पारदर्शकता राखणे आणि राष्ट्रीय प्रगतीला हातभार लावणे हेच असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

---

### तहसील कार्यालय, तुळजापूर
**(भूसुधार विभाग)**
Email id-tahtuljapurgmail.com ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**जा.क्र. २०२५/महसूल/भुसुधार/कावि-१३३** **दि.- स्वाक्षरी खालील**

**जाहिर प्रगटन**

प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे मौ. किलज ता. तुळजापुर जि. धाराशिव येथील सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार हिराचंद झुंबर गवळी यांनी मौजे किलज येथील जमीन गट नंबर ५०० मध्ये एकूण क्षेत्र ४.३८ हे.आर, शेतजमीन असून या जमीनीच्या ७/१२ वरील इतर अधिकार मध्ये साधे कुळ सोना आप्पा क्षे. १.६४ वर ८.६.५८ ही नोंद कमी करणे बाबत अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी उक्त जमीनवरील क्षेत्राला इतर अधिकार मध्ये साधे कुळ सोना आप्पा क्षे. १.६४ वर ८.६.५८ ही नॉद कमी करणे वावत कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेली आहेत. सदर जमिनी वावत या कार्यालयास कुळ नोंद कमी करणे वावत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा काही अक्षेप, उजर, तक्रार, इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात तहसील कार्यालय तुळजापूर येथे कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

अन्यथा विहीत मुदतीत कोणाचा आक्षेप, उजर, तक्रार नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर, तक्रार, विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**अरविंद बोळंगे,**
तहसीलदार, तुळजापूर

### तहसील कार्यालय, कळंब
**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३५१** दिनांक ०१/०४/२०२६

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी मोहा ता. कळंब यांचे मार्फत **तोफिक शब्बीरखाँ पठाण रा. कळंब ता. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **तोफिक शब्बीरखाँ पठाण रा. कळंब** यांचे गाव कळंब ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मोहा ता. कळंब जि. धाराशिव या ठिकाणी **दि.०५/०६/१९८७** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी मोहा ता. कळंब यांनी **दि.२६/०२/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

### तहसील कार्यालय, कळंब
**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३५९** दिनांक ०८/०४/२०२६

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **अमीर युसुफ मोमीन रा. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **अमीर युसुफ मोमीन रा. कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि.धाराशिव या ठिकाणी **दि.०८/०३/१९४८** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.२९/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

### तहसील कार्यालय, कळंब
**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३८१** दिनांक १७/०४/२०२६

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **इस्माईल इलियास तांबोळी रा. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **इस्माईल इलियास तांबोळी रा. कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि.धाराशिव या ठिकाणी **दि.०६/१०/१९८०** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.१२/०२/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

### तहसील कार्यालय, कळंब
**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-२८७** दिनांक १७/०४/२०२६

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **खुरेशी जहांगीर युसुफ रा. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **खुरेशी जहांगीर युसुफ रा. कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि. धाराशिव या ठिकाणी **दि.११/०४/१९६९** रांनी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.१२/०२/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

### तहसील कार्यालय, कळंब
**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३८०** दिनांक १७/०४/२०२६

**जाहिर प्रगटन**

समस्त गावंकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **साजेद गौस कुरेशी रा. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **साजेद गौस कुरेशी, रा.कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि. धाराशिव या ठिकाणी **दि.१०/०८/२००३** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.०२/०४/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनपाच्या प्रत्येक विभागावे सुरु असलेल्या कामकाजाचा आ. अमित देशमुख आढावा घेणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ एप्रिल : मनपाच्या प्रत्येक विभागावे सुरु असलेल्या कामकाजाचा आ. अमित देशमुख आढावा घेणार आहेत. यामध्ये नगररचना विभागव केंद्रस्थानी असणार आहे. हद्दवाढ, नवीन लेआऊट आणि इमारत परवानग्यांचा आढावा घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे रिंगरोडवरील अतिक्रमण काढून रस्ते वाहतुकीसाठी खुली करणे हा देखील बैठकतील मुद्दा असणार आहे. तर रेकॉर्ड उपलब्ध नसताना कोणत्या आधारे नगररचना विभागाने बांधकाम परवाने दिले हे मुद्दे राहणार आहेत. अधिकारी तसेच पदाधिकारी बैठकीला हजेरी लावणार आहेत.



# विविध वृत्त...

## 'नीट' परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाय योजना करा : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** लातूर जिल्ह्यातील ३४ परीक्षा केंद्रांवर आगामी ३ मे २०२६ रोजी नीट युजी २०२६ परीक्षा पार पडणार असून, सुमारे १६ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. वाढते तापमान आणि उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक सज्जता आणि उपाययोजना ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले आहेत. जिल्हा प्रशासनाने या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक घेतली असून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विविध पावले उचलली जात आहेत.

वाढत्या उष्णतेचा विचार करता प्रत्येक परीक्षा केंद्रावर आरोग्य पथके तैनात केली जाणार आहेत. या पथकांकडे उष्माघातावरील उपचारासाठी आवश्यक औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील, तसेच वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिकांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांसाठी सावलीची व्यवस्था आणि दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, शहरात विद्यार्थी आणि पालकांची होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाला चोख बंदोबस्ताचे आदेश दिले आहेत.

**गतिशील तपासणी प्रक्रिया आणि दंडाधिकारी नियुक्ती**

परीक्षा केंद्रांवर होणारी विद्यार्थ्यांची तपासणी आणि बायोमेट्रिक हजेरीची प्रक्रिया अधिक गतिशील करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना विनाकारण विलंब होणार नाही. सुरक्षेच्या आणि नियोजनाच्या दृष्टीने प्रत्येक केंद्रावर कर्तव्य दंडाधिकारी म्हणून महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, भरारी पथकेही गठीत करण्यात येणार आहेत.

## ७० लाखांसाठी विवाहितेचा छळ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** 'तु आम्हाला पसंद नाही, तुझ्या आई-वडिलांनी मनासारखे लग्न करुन दिले नाही' आता शेत घेण्यासाठी माहेरहून ७० लाख घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्या प्रकरणी सासरच्या ५ जणांवर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

विवाहानंतर काही महिन्यातच फिर्यादी रेश्मा (वय ३१) यांना सासरच्या मंडळीकडून शारीरिक आणि मानसिक त्रास सुरु झाला. नांदेड येथे शेत घेण्यासाठी माहेरहून ७० लाख रुपये घेऊन ये म्हणत मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी फिर्यादीचे पती दत्तप्रसाद ज्ञानेश्वर महामुने, सासू शोभा ज्ञानेश्वर महामुने, सासरे ज्ञानेश्वर महामुने, नणंद शिल्पा वसंत पंडीत, दीर सुधीर महामुने (रा. तरोडा नगर, नांदेड) यांनी शिवीगाळ करुन मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी ५ जणांविरोधात सोमवार (दि. २७) रोजी गुन्हा दाखल केला आहे. पोनि संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार आर.ए. गुंडरे हे अधिक तपास करीत आहेत.

## चिमणी,पाखरांसाठी केली पाण्याची सोय

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** औसा एम.आय.डी. सी. येथील मुंदडा सिमेंट प्रॉडक्ट या ठिकाणी पक्षी मित्र महेबूब चाचा यांच्या मदतीने अजय मुंदडा यांनी चिमणी पाखरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. या परिसरात विविध प्रकारची, फळझाडे, फुल झाडे वृक्ष आणि वेली, लावली असुन, त्यांची योग्य ती देखभाल केल्यामुळे हा परिसर आज अत्यंत सुशोभीत आणि, निसर्गरम्य दिसत आहे. झाडे, वृक्ष, वेली, निसर्ग निर्मीत, अडचळणीच्या जागा, अशा ठिकाणी वन्य जिव, पशु पक्ष्यांची, निवास्थाने आणि वास्तव्ये असतात. या निसर्ग रम्य बागेत पशु पक्ष्यांचा राबता वाढलेला दिसुन येत आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'डॉ. वाघमारे अध्यासन केंद्र' स्थापन करा; आ. रोहित पवार यांची राज्यपालांकडे मागणी

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे संस्थापक कुलगुरू तसेच थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या नावाने विद्यापीठात 'अध्यासन केंद्र' स्थापन करण्यात यावे, तसेच विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार रोहितदादा पवार यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीचे निवेदन देताना लातूर येथून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे उपस्थित होते.

राज्यपालांना देण्यात आलेल्या निवेदनात डॉ. जनार्दन वाघमारे सरांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करण्यात आला आहे. डॉ. वाघमारे हे केवळ विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरूच नव्हते, तर मराठी भाषा, साहित्य, समीक्षा, शिक्षण, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. मराठवाड्यासारख्या भागातील उच्च शिक्षणाचा पाया त्यांनी मजबूत केला. ग्रामीण आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले दूरदर्शी आणि पुरोगामी शैक्षणिक नेतृत्व कायम स्मरणात राहील, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे यांचे साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अफाट आहे. त्यांचे वैचारिक मार्गदर्शन आणि वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या उद्देशाने त्यांच्या स्मरणार्थ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'डॉ. जनार्दन वाघमारे अध्यासन केंद्र' तातडीने स्थापन करावे व याबाबत सर्व संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती आ. रोहित पवार यांनी केली आहे.

अध्यासन केंद्रासोबतच, डॉ. वाघमारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी विशेष मागणीही यावेळी करण्यात आली. या महत्त्वाच्या मागणीच्या वेळी लातूरचे प्रतिनिधी म्हणून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे हे समवेत उपस्थितीत होते.

## सरकारी कार्यालय परिसरात घाणीचे साम्राज्य



तभा वृत्तसेवा

**लातूर दि २९ एप्रिल :** येथील गांधी चौकात असलेली विभागीय शिक्षण उपसंचालक आणि जिल्हा परिषद चे आरोग्य विभाग हे कार्यालय परिसरात सध्या केर कचरा आणि घाण जमा झाल्याचे पाहायला मिळते. परिसराच्या स्वच्छतेची मागणी वाढीस लागली आहे.

असून या ठिकाणी कार्यरत आहेत म्हटले तर अतिशयोक्ती ठरूनये कारण त्या परिसरात केर.कचरा साठा मोठ्या प्रमाणात जमा असल्याचे दिसत असून बाजूला हातगाडे दिसत आहे.

बरेच व्यापारी आपल्या दुकानातील कचरा तेथेच टाकत असल्याने कचरा दिवसादिवस वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो याकडे गांर्भियाने शासकीय यंत्रणेने घ्यावे . अशी मागणी होत आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात तीन जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते येत असल्यामुळे हा परसिर साप करुन होणाऱ्या रोगराई पासून मुक्त करावा अशी मागणी होत आहे.

## शिक्षकांचे समायोजन व पदोन्नती तात्काळ स्थगित करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा




**लातूर दि. २९ एप्रिल :** येत्या १६ मेपासून जनगणना सुरु होणार असून, त्या पार्श्र्वभूमीवर सध्या शिक्षकांचे भर उन्हात प्रशिक्षण सुरु आहे. शासनाने समायोजन, पदोन्नती व बदली करु नये, असे परिपत्रक जारी करुनही स्थानिक प्रशासनाने समायोजन व पदोन्नतीवर अडून बसले आहे. त्यामुळे जनगणेच्या कामात मोठा व्यत्यय निर्माण होणार असून, हा राष्ट्रीय कार्यक्रमात खोडा घालण्याचे काम प्रशासनाकडून केले जात आहे.

त्यामुळे तात्काळ समायोजन व पदोन्नती स्थगित करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने जिल्हाधिकाऱ्यांकडे मंगळवारी एका निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा ४२ शी ओलांडात आहे. अशा परिस्थितीही शिक्षकांचे प्रशिक्षण सुरु आहे. राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून सर्वजण सहकार्य करीत आहेत. परंतु, स्थानिक प्रशासन समायोजन व पदोन्नतीवर अडून बसले आहे. केंद्र व राज्य शासनाने यापूर्वी बदली करु नये, असे सूचित केलेल असताना समायोजन व पदोन्नती म्हणजे एक प्रकारची बदलीच होय. तरीही प्रशासन या बाबीवर अडून बसले आहे. जर पदोन्नती व समायोजन

झाले तर जनगणेच्या कामाचा बट्ट्याबोळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तात्काळ समायोजन व पदोन्नती स्थगित करावे. तसेच जनगणना करणाऱ्या शिक्षकांना मोबाईल, टॅब द्यावा, उन्हाची तीव्रता लक्षात घेता प्रशिक्षणाची वेळ सकाळी ७ ते १२ करावी, २०११ जनगणने प्रमाणे सुट्टीचा कालावधीत केलेल्या कामाबद्दल २०११ च्या संदर्भानुसार /शासन निर्णयानुसार अर्जित रजेची मान्यता मिळावी, जनगणनेच्या मानधनात वाढ करावी, प्रगणक / पर्यवेक्षकांना विमा संरक्षण कवच द्यावे, उष्माघाताची लाट असल्यामुळे बचावात्मक साहित्य कर्मचाऱ्यांना द्यावे, महिलांना जनगणनेच्या कामातून कार्यमुक्त करण्यात यावे आदींसह मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यातवीने जिल्हाधिकाऱ्यांना मंगळवारी देण्यात आले.

या मागण्यांचा विचार न केल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही संघाने दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष विजयकुमार गुत्ते, जिल्हा सरचिटणीस केशव गंभीरे, जिल्हा उपाध्यक्ष नागेश पाटील, शहराध्यक्ष राहुल देशमुख व नंदकुमार कांबळे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## लातुरात कामगार दिनानिमित्त मेळावा

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने ३ मे रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील दयानंद कॉलेज सभागृहात लातूर जिल्ह्यातील कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात केंद्र सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केले आहेत. या कायद्याचे कामगारांवर काय विपरीत परिणाम होणार आहेत, केंद्र व राज्य सरकारची कामगारविषयक भूमिका, जिल्हा व राज्य पातळीवरील कामगारांच्या प्रश्नांची चर्चा करून ठराव करण्यात येणार आहेत. या मेळाव्याला केरळचे माजी सनदी अधिकारी कन्नन गोपीनाथन, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील शिंदे, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार, कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. उपस्थितीचे आवाहन संयोजकांनी केले.

## आ. अमित देशमुख यांनी साधला नागरिकांशी संवाद



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २९ एप्रिल :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री त'ा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि. २८ एप्रिल २६ रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्याशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन त्यांची निवेदने व निमंत्रनाचा स्वीकार करीत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधितांना सूचना केल्या.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशेल उटगे, लातूर शहर महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी महापौर दीपक सुळ, उत्तर नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश पावडे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील, पत्रकार बशीर शेख, पृथ्वीराज गोरे, राजेसाहेब सवई, उमेश बेद्रे, बादल शेख, विष्णुदास धायगुडे, अरफात खान, भालचंद्र येडवे, रफिक पटेल, व्यंकटेश पुरी, इसरार सगरे, अशोकराव सूर्यवंशी, नागनाथ साळुंके, अमर खानापुरे, प्रल्हाद जाधव, हकुमचंद कलंत्री, ईश्र्वरप्रसाद डागा, आदी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा हक्क दिन' उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा




**लातूर दि. २९ एप्रिल :** प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणून नागरिकांना विनासायास शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आज लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा हक्क दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नूतनीकरण करण्यात आलेल्या 'आदर्श सेतू केंद्रा'चे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते करण्यात आले. हे केंद्र नागरिकांना अधिक जलद आणि सुलभ सेवा देण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाने सज्ज करण्यात आले असून, उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते उपस्थित नागरिकांना विविध शासकीय दाखल्यांचे व प्रमाणपत्रांचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले.

या निमित्ताने आयोजित मुख्य कार्यक्रमात मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले, ज्यामध्ये जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सभेत उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी उपस्थित सर्वांना 'लोकसेवा हक्क हमी'ची शपथ दिली. नागरिकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा देण्याचा निर्धार यावेळी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेने व्यक्त केला. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'सेवा हक्क दिना'चा हा उपक्रम केवळ जिल्हा मुख्यालयापुरता मर्यादित न राहता, लातूर जिल्ह्यातील सर्व ५ उपविभागीय अधिकारी कार्यालये आणि १० तहसील कार्यालयांमध्येही एकाच वेळी प्रभावीपणे राबविण्यात आला. सर्व कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा हमीची शपथ घेऊन नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा वेळेत पुरवण्याबाबत कटिबद्धता दर्शवली.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ७५ फुटी स्मारक हैदराबादच्या धर्तीवर भव्य करावे

### बौद्ध समाजाची आ. अमित देशमुख यांच्याकडे मागणी

### स्मारकाचा आराखडा जाहीर करून निधी वाढवण्याबाबत निवेदन

तभा वृत्तसेवा



**लातूर दि. २९ एप्रिल :** शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे उभारण्यात येत असलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा आणि स्मारकाच्या संदर्भाने भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या नेतृत्वात बौद्ध समाजाच्या शिष्टमंडळाने बाभळगाव निवासस्थान येथील झालेल्या या भेटीत स्मारकाच्या उभारणीबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

यावेळी हैदराबाद येथील स्मारकाप्रमाणे हे स्मारक भव्य दिव्य करावे, प्रशासन या स्मारकाच्या संदर्भाने पारदर्शकता आणि स्पष्टता पाळत नाही, त्यामुळे समाजासमोर या स्मारकाचा प्रारूप आराखडा प्रस्तुत करण्यास सांगावे, स्मारकाचा विस्तार करून त्यासाठी अधिकचा निधी मंजूर करून घ्यावा आदी मागण्या असलेले निवेदनही या शिष्टमंडळाने यावेळी माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्याकडे सुपूर्द केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य दिव्य स्मारक लातूरात होत आहे याचा आम्हाला आनंद आहे, मात्र, मंजूर १० कोटी निधी मधून कोणती कामे होणार आहेत? एकूण प्रकल्प किती रकमेचा आहे? या संदर्भात शासनाकडून कोणतीही माहिती जाहीर केली जात नाही, ती माहिती जाहीर करायला सांगावी. सध्या काम चालू असलेली जागा अत्यंत अपुरी आहे ती वाढवून घ्यावी, चबुतऱ्याची उंची २० फुटापर्यंत वाढवावी, भव्य दिव्य पुतळ्या सोबतच स्मारक परिसराच्या विकासाचा एकत्रित प्रकल्प आराखडा तयार करून त्यासाठी आवश्यक निधी मंजूर करावा, त्यानंतरच हे काम होईल हे पहावे, कोणत्याही परिस्थितीत निधीअभावी हे काम अर्धवट राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी पाठपुरावा करावा आदी मागण्या निवेदनाद्वारे यावेळी आमदार अमित देशमुख यांच्याकडे करण्यात आल्या आहेत.

या शिष्टमंडळातील सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आपलीही शिष्टमंडळाच्या सूचनेप्रमाणेच भूमिका आहे असे त्यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणी सोबतच या संपूर्ण परिसराचा एकत्रित विकास आराखडा तयार करावा, या परिसरात असलेल्या सर्व व्यवस्थांचे पुनर्नियोजन करावे, या परिसरात पुन्हा पाणी साचणार नाही यासाठी ड्रेनेजची व्यवस्था करावी, आदी सूचना आपण यापूर्वीच दिल्या असल्याची माहिती शिष्टमंडळाला यावेळी त्यांनी दिली.

प्रारंभी भिक्खू पय्यानंद थेरो यांचे बाभळगाव निवासस्थानी यथोचित सन्मान करून त्यांचे आशीर्वाद घेतले. या शिष्टमंडळात माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, चंद्रकांत चिकटे, सुशिल चिकटे, यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.